
माणूस
१७ फेब्रुवारी १९६८
एक रुपया
श्रीकैलास
ते
सिंधुसागर

सहकाराचा एक आदर्श !

# दि डेक्कन को-ऑपरेटिव्ह
# स्पिनिंग मिल्स लि.

इचलकरंजी जि.– कोल्हापूर

*पॉवरमाग, हातमाग, विणकर व त्यांच्या संस्थानी सहकारी तत्त्वावर उभारलेली महाराष्ट्रांतील अग्रगण्य सूतगिरणी.*

★ मूळ प्रकल्पाप्रमाणे प्रथम व द्वितीय विस्ताराच्या एकूण २७,००० चात्या तीन पाळीने अहोरात्र चालू आहेत.

★ येथे तयार होणाऱ्या सुताचा दर्जा, प्रकार व किंमत इतरांनी अनुकरण करावी, आदर्श मानावी इतकी स्फूर्तिदायक.

★ संचालक मंडळावर, " लेबर पार्टिसिपेशन इन मॅनेजमेंट " तत्त्वाप्रमाणे कामगारांचे प्रतिनिधित्व.

★ सहकारी सूतगिरण्यांचे प्रश्न राष्ट्रीय पातळीवरून हाताळता यावे या उद्देशाने या गिरणीच्या विद्यमाने अखिल भारतीय सहकारी सूत गिरणी संघ लि. (दि ऑल इंडिया फेडरेशन ऑफ को-ऑपरेटिव्ह स्पिनिंग मिल्स)ची सन १९६४ मध्ये स्थापना !

वर्ष : सातवे : अंक : छत्तीस ते आडतीस
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : चाळीस रुपये

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

स. न. ३१-१-६८

हल्ली 'माणूस'ची उंची अधिकच वाढू लागली आहे. यामागे नव-विचारांची बठक निश्चितच आहे. जरी 'उच्च' म्हणता आले नाही; तरी 'काहीतरी करावे' या भावनेने झपाटलेल्या विद्यार्थ्यांना योग्य मार्ग दाखविण्याचे सामर्थ्य त्यांत निश्चितपणे आहे. माझ्यासारख्या विद्यार्थ्यांना 'माणूस' आवडतो याचे खरे व मुख्य कारण हेच आहे, असे मला वाटते.

'श्रीकैलास ते सिंधुसागर' संचलनाची भूमिका वाचून इतका भारावून गेलो की, (माणूस २७ जाने.) लगेच पत्र लिहायला घेतले. या अत्यंत थोडक्या भूमिकेतील प्रत्येक शब्द तरुण रक्तात आशावाद पेरणारा-आहे. उगाचच वाटले की, 'संचलनात सामील न होऊन मोठा गुन्हा करीत आहोत!' पण कॉलेज सोडून (शिवाय परीक्षा आ वासून उभ्याच!) जाणे शक्य नाही. तेव्हा प्रेमळ व आग्रहाची विनंती : सुटीत एखादी 'चला' अशी हाक आमच्या कानावर येईल तर बरे!'

राजेंद्र शेंडे

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

मूल्य १ रुपया
४१९ नारायण
पुणे २
दूरध्वनी : ५७३५९

# प्रतिपच्चंद्ररेखेव



दि. २६ जानेवारी. औरंगाबाद. शुभारंभ ! कुठले माजगावकर आणि कुठले देवडाजी ! सहज ओळख झाली, आणि ऋणानुबंध जमले. निघण्यापूर्वी भेट घ्यावी म्हणून सहज सकाळी सात वाजताच स्टेशनजवळच्या त्यांच्या बंगल्यावर घाईघाईत गेलो. तेवढ्या घाईतही चहापानाचे नेहमीचे आदरातिथ्य झाले आणि एकीकडे त्यांची थोरली कन्या कु. चंदा हिने तबकातली जुळवाजुळव करण्यास सुरुवात केली.

'असे काय आपण अटकेपार झेंडे रोवायला निघालो आहोत? कशासाठी ही आरती, हा समारंभ !'

पण माणिकभाई देवडाजी, सौ. भाबी, कु. चंदा यांच्या भावनांचा अनादर करणे शक्य नव्हते; चूकही ठरले असते.

आरतीचा मधुरमंगल सोहाळा पार पडला आणि निघण्यापूर्वी देवडापरिवारासह बंगल्याबाहेर पुन्हा एकदा कॅमेऱ्यासमोर....

[ डावीकडून ] पंढरीनाथ रानडे, श्री. ग. मा., सौ. भाबी, श्री. दामोदरदासजी मुंदडा व श्री. माणिकचंद देवडा.
[ मागील बाजूस ] संजीव देशपांडे, आत्माराम पाटील, कु. चंदा.



साडेदहा-अकराला वेरुळ गावी पोहोचलो. 'कैलासट्रस्ट'चे दोन-चार स्वयंसेवक बसपाशी आले आणि विचारू लागले....



'संचलनासाठी आलात का? सामान द्या. ताईंनी पाठवलं आहे.
.... ताई बस्तीकर. एक बडे काम. मुंबईत सामाजिक कार्याचा प्रदीर्घ अनुभव. नारायण पुराणिक यांच्या आग्रहाखातर मुंबई सोडून या गावात कार्य करण्यासाठी येऊन राहिलेल्या आहेत. सध्या 'टाटा ट्रस्ट'तर्फे एक दवाखाना सुरू आहे. 'स्वस्तिक रबर प्रॉडक्ट्स'तर्फे एक रबरी उपकरणांचा कारखाना चालू आहे. ताई आणि या कारखान्यात काम करणाऱ्या महिला.

पूर्वतयारीसाठी आलेले 'विद्यार्थिपरिषदे'चे कार्यकर्ते 'ताईंनी फार मदत केली. आम्ही आता पन्नास विद्यार्थ्यांचे शिबिरच येत्या मे महिन्यात येथे भरवू.' असे सांगत होते.

नारायण पुराणिक यांनी ताईंसाठी हे गाव का निवडले असावे! समोर 'श्रीकैलास' आहे. आंतरराष्ट्रीय महत्त्वाचे ठिकाण. देशो-देशीचे बडे पाहुणे सारखे येत-जात आहेत. त्यांच्यासमोर वेरुळ गावचे चित्र निदान कैलास लेण्याला साजेसे नसले, तरी शोभेसे असावे. ....गावात संडास असावेत. किमान स्वच्छता....
साहेबाच्या मोटारीभोवती निदान या गावच्या पोरांनी तरी हात पसरण्यासाठी जमू नये....



↑ तरी मुले जमतातच.

आणि असंख्य स्वाभिमानी भारतीयांना आपल्या माना शरमेने खाली घालण्याची वेळ येतच राहते.

अशा असंख्यापैकी एक –
श्री. भा. ल. तथा राजाभाऊ कुळकर्णी –
नागपुरातील एक प्रसिद्ध पुस्तकविक्रेते.

↓ संचलन-कार्यक्रमाच्या जागेची सफाई.





←
धड्याळाचा काटा
तीनच्या पुढे सरकला
आणि कामाला वेग चढला.
ध्वजाची जागा निश्चित झाली.



बाबासाहेब पुरंदरे विद्यार्थिस्वयंसेवकांना सूचना देऊ लागले.

→

मिरासदारांना कसली
तरी आठवण झाली.
कोणती तरी वस्तू
विसरली असावी. आता
कोणाला आणि कुठे
पाठवावे ?

पण वेळच नव्हता.
मंडळी जमू लागली.
प्रथम आले समारंभाचे
मुख्य पाहुणे
*श्री. नानासाहेब गोरे*,
त्यांच्यासमवेत मराठ-
वाडा विद्यापीठाच्या
अर्थशास्त्र विभागाचे
प्रमुख डॉ. बोरकर


↓







'मराठवाडा 'चे संपादक
श्री. अनंतराव भालेराव
कॉम्रेड चंद्रगुप्त चौधरी
श्री. ग. मा. आणि
प्रा. पंढरीनाथ रानडे



←

पायाचे दुखणे असतानाही
देगलुरहून कार्यक्रमासाठी
खास उपस्थित असलेले
ह. भ. प. श्री. धुंडामहाराज
समारंभस्थानी
पोहोचताच ...

वेळ झाली.
ठीक चार वाजता कार्यक्रमास सुरुवात झाली.
बाबासाहेब पुरंदरे यांनी मंडळींना व्यवस्थित बसण्याची विनंती केली.
'विक्रम वैराग्य जेथ एक नांदती'...असा हा एक लहानसा जनसमुदाय. ... राजकारणाला स्पर्शही न करणारे साहित्यिक, विचारवंत, भगवद्भक्त आणि या आखाड्यातच ज्यांचा जन्म गेला असे विविध पक्षांचे प्रमुख.





पण वातावरणात
एकदम मंत्र घुमू
लागले.

‘ *संगच्छध्वम्,*
*संवदध्वम्,*
*सं वो मनांसी*
*जानताम्* ’

पुण्याच्या ‘ फ्रेंड्स
म्युझिक सेंटर ’चे
चालक
*श्री. बाळासाहेब*
*केतकर*
यांनी या समारंभा-
साठी वेदमंत्र टेप
करून आणले होते.

→



वेदघोषानंतर सुरू
झाले *श्री. पद्माकर*
*गोवईकर* यांचे
‘ *बलसागर*
*भारत होवो* ’
सारे कशासाठी येथे
जमले हे या गीताने
प्रभावीपणे सूचित

केले. मिरासदारांचा सारखा आग्रह 'गीता-साठी कुणी चांगली व्यक्ती असावी.' बाबूजी सुधीर फडके येतील असे वाटले होते. पण ते येऊ शकले नाहीत. मग आदल्या दिवशी औरंगाबादेहून पुण्याला तार गेली आणि गोवईकर आले.

*विद्याधर पुंडलिक* आणि वि. *ग. कानिटकर* त्यांना आपल्याबरोबरच घेऊन आले.
येणाऱ्या याच गटात होते, *श्री. ज. जोशी*; *दि. बा. मोकाशी*, *जयवंत दळवी*.

पार*गावकर*-*बेहेरे*-*काकतकर* हे त्रिकूट पुण्याहून उशीरा निघूनही सर्वांच्या अगोदर वेरुळला उपस्थित होते.

गीत झाले. गीतानंतर या संचलनामागील भूमिकेचे *माजगावकरांनी* निवेदन केले.




आणि शेवटी समारंभाचे मुख्य पाहुणे *श्री. नानासाहेब गोरे* पुरस्कारासाठी उभे राहिले.
'मी कशाबद्दलच खोटा अभिमान बाळगणारा माणूस नाही. पण हिंदुस्थानात कुठेही नाही ते दृश्य येथे आज दिसते आहे, याचा अभिमान जरूर वाटतो.
काय चाललं आहे दक्षिणेत !
या पार्श्वभूमीवर तर हे चित्र मला अधिकच उठावदार दिसते.

...पण या संचलनातून उद्भवणाऱ्या किचकट व गुंतागुंतीच्या समस्यांचेही भान राखले पाहिजे.'
नानासाहेबांमधील सावध माणूस हाही इशारा देण्यास विसरत नव्हता.

पण ही वेळ होती निघण्याची
पुढचे पाऊल पुढे टाकण्याची
इशारे लक्षात ठेवण्याची
पण त्यावर लगेच फारसा जोर न देण्याची
म्हणून सगळे निघाले....

## स्वातंत्र्याचे स्वदेशीकरण
## स्वदेशाचे एकीकरण
## या विचारांच्या प्रचारासाठी
## एका अस्मितेच्या जागरणासाठी






पाऊण तासाचा हा कार्यक्रम आटोपला
वेरुळ गावात सभा झाली.
बाबासाहेब पुरंदरे आणि विद्याधर पुंडलीक
यांची भाषणे झाली,

शेवटी अध्यक्षीय समारोपासाठी उभे राहिले
श्री. अनंतराव भालेराव.

सभा संपली. निरोपांचे देणेघेणे सुरू झाल. जुन्या ओळखी निघाल्या. संगम प्रेसचे पमासाहेब पटवर्धन, जयहिंद प्रेसचे बडदापूरकर आणि दामोदरदासजी मुंदडा चर्चेत रंगले.

बरीचशी मंडळी परतली. उरलेल्यांनी एकत्र बसून जेवण केले.
सुंदर गव्हाच्या पोळ्या.
उत्तम दूध
विद्यार्थिपरिषदेच्या कार्यकर्त्यांनी गेले ४-८ दिवस खपून ही सगळी व्यवस्था जमवली होती. स्थानिक सहकार्यही खूप होते.

दोन तास या गप्पाटप्पात, जेवण्या-खाण्यात गेले. मध्येच नारायण पुराणिक यांनी काही प्रमुख मंडळींना बाजूस घेऊन 'कैलास ट्रस्ट'च्या कार्याची माहिती दिली.






आणि रात्रीचा हा शेवटचा कार्यक्रम.

बुवांनी

ह. भ. प. श्री. धुंडामहाराज यांनी
प्रवचनासाठी श्लोक अचूक निवडला.

उद्धरेत् आत्मदात्मानम्.....
जळो जिणे लाजिरवाणे.....

# संचलन कार्यक्रम

दिनांक १८ फेब्रुवारी ते ९ मार्च १९६८

## जिल्हा नगर

| | | |
|---|---|---|
| दि. | १८ फेब्रुवारी | नेवासे |
| दि. | १९ फेब्रुवारी | नेवासे |
| दि. | २० फेब्रुवारी | बेल-पिंपळगाव |
| दि. | २१ फेब्रुवारी | भानटाकळी |
| दि. | २२ फेब्रुवारी | भोकरे |
| दि. | २३ फेब्रुवारी | श्रीरामपूर |
| दि. | २४ फेब्रुवारी | श्रीरामपूर |
| दि. | २५ फेब्रुवारी | खंडाळा |
| दि. | २६ फेब्रुवारी | ममदापूर |
| दि. | २७ फेब्रुवारी | बावळेश्वर |
| दि. | २८ फेब्रुवारी | प्रवरानगर |
| दि. | २९ फेब्रुवारी | लोणी |
| दि. | १ मार्च | जाळी-पिंपळगाव |
| दि. | २ मार्च | कोकणगाव |
| दि. | ३ मार्च | वडगाव |
| दि. | ४ मार्च | संगमनेर |
| दि. | ५ मार्च | नांदूर |

## जिल्हा नाशिक

| | | |
|---|---|---|
| दि. | ६ मार्च | मांळवाडी |
| दि. | ७ मार्च | दोडी |
| दि. | ८ मार्च | गुरेवाडी |
| दि. | ९ मार्च | सिन्नर |

# पहिला दिवस

२६ जानेवारी हा दिवस नुसताच येतो आणि जातो. सतरा वर्षांपूर्वी याच दिवशी आम्ही भविष्याची भेट घेतली होती आणि प्रजासत्ताकाची एक सनद लिहिली होती. खरे म्हणजे, त्या सनदेतील स्वातंत्र्य, सार्वभौम, न्याय, समानता हे शब्द शस्त्रासारखे लखलखीत करून घेण्याचा हा दिवस. पण एकएक वर्ष उलटत जाते आहे आणि आपल्या सर्वांचे हे शब्द मात्र गंजत चालले आहेत.

त्या मानाने, यंदाची २६ जानेवारी मात्र आमच्यापैकी काही जणांना चांगली गेली, म्हणजे फार विलक्षण किंवा अद्भुत असे त्या दिवशी घडले असे नाही. आम्ही मोठी तलवार गाजविली अशातलाही प्रकार नाही. घडली ती एक लहानशीच साधी गोष्ट. दहा माणसांचा एक लहानसा जथा वेरूळ येथील कैलास देवळापासून निघाला आहे. या सामान्य माणसांनी अडीच-तीन महिन्यांसाठी एक संचलन आपल्या पायांत ठोकून घेतले आहे. " स्वतंत्र आहोतच. आता स्वयंपूर्ण होऊ या. स्वातंत्र्याचे स्वदेशीकरण करू या " असे म्हणत म्हणत ती मुंबईच्या दिशेने निघाली आहेत. आम्ही दुसरे काहीच केले नाही. फक्त चार पावले त्यांच्या बरोबर चालत गेलो. त्यानेही थकलो. म्हणून वेरूळच्या वेशीपाशी थांबलो. तेथूनच निरोपाचे, शुभेच्छेचे हात



प्रा. विद्याधर पुंडलिक

हलविले. रुमाल फडफडविले. हिरव्यागार शेतांच्या काठाकाठाने चालू लागलेल्या त्या दहा माणसांकडे आम्ही डोळे ताणून-ताणून पाहिले. पाहता-पाहता, आजूबाजूच्या त्या हिरव्यात, त्यांचे लहानसे पांढरे ठिपके झाले. तेही दिसेनासे झाले. तरी-सुद्धा आम्ही काही क्षण तिथेच घुटमळलो आणि मग पुनः मागे परतलो.

सुमारे एक-दीड महिन्यापूर्वी माजगावकरांनी आपल्या अन्न-स्वतंत्रता-संचलनाची कल्पना मला सांगितली. ती ऐकल्या-बरोबरच हा "चार पावलांचा वायदा" मी केला होता. माझ्याबरोबर आणखीही काही जणांनी. तो पुरा करण्यासाठी आम्ही, आदल्या दिवशी – म्हणजे गुरुवारी २५ ला पुण्याहून निघालो. आम्ही म्हणजे– श्री. ज. जोशी, दि. वा. मोकाशी, जयवंत दळवी, 'सोबत'कार ग. वि. बेहेरे, वि. शं. पारगावकर, बाबासाहेब पुरंदरे, वि. ग. कानिटकर, ल. ना. गोखले, पद्माकर गोवईकर आणि मी. सर्वांनाच माजगावकरांचे सगळेच मान्य होते असे नाही. कुणाकुणाचे संचलनाच्या मार्गा-बद्दल मतभेद होते. त्याची व्याप्ती आणि त्याचे पुढचे नेमके रूप काय राहील, याबद्दलही कुणाकुणाच्या मनात शंका होत्या. पण सर्वजणांना मान्य होते ते या संचलनामागचे नैतिक आवा-

हून. ते मात्र शुद्ध होते. फार सरळ होते.

अशा एखाद्या नैतिक आवाहनाची आवश्यकताही होती. राष्ट्रवाद ? नेतृत्व ? आर्थिक प्रगती ? सार्वजनिक चारित्र्य ? अशा अनेक प्रश्नचिन्हांच्या गराड्यात आपण गेली कित्येक वर्षे आहोत. या प्रत्येक प्रश्नचिन्हामागे 'पुढे काय होणार ?' चीही एक लांबलचक सावली आहे. अशा अनेक सावल्या आपल्या राष्ट्रीय जीवनावर पडल्या आहेत. माझ्यासारख्याच्या मनात यायचे — ही प्रश्नचिन्हांची अंधाऱ्या सावल्यांची, वैफल्याच्या, परवलीच्या शब्दांचीही भाषा आपण किती वर्षे काढतो आहोत ? पुरे झाली की ती आता. पुरे म्हणून ती थांबणार नसली, तरी तीसुद्धा इतक्या अविरतपणे कशाला काढावयाची ? आपल्यामध्ये कुणाला तरी एखादी वेगळी भाषा, का सुचू नये ? आठवू नये ? निराशेच्या, आक्रोशाच्या, चिडीच्या, जाळपोळीच्या, घोषणांच्या प्रचंड गोंगाटात बाकी काही नसले, तरी बदल म्हणून एखादा वेगळा सूर का निघू नये ?

माजगावकरांनी तो सूर काढला होता. एखाद्या प्रचंड जत्रेच्या गलक्यात लहान मुलाच्या सुरासारखाच तो लहान होता. पण तो वेगळा होता. सच्चा होता. आम्हा सर्व मंडळींना त्याचे वेगळेपण, आणि सच्चेपण आवडले होते.

आम्ही सर्व गुरुवारी रात्री औरंगाबादला पोहोचलो. दुसऱ्या दिवशी सकाळी उठलो आणि गावाची चाहूल घेतली. गावातील स्थानिक वर्तमानपत्रांत संकल्पित मोर्च्याची बातमी आली होती. ती छापलीही होती मुखपृष्ठावर. पण बाकी सगळीकडे सामसूम होते. आपला राष्ट्रीय स्वभाव नाही तरी "निवांत" हाच आहे ! त्यानुसार की काय, नऊ वाजले तरी हे गाव अजून आळोखे-पिळोखे देतच होते. मोर्च्याबद्दल फारसे कुतूहल किंवा औत्सुक्य कुठे दिसले नाही. सगळीकडे नगरपालिकेच्या निवडणुकांचे फतवे आणि फलक झळकत होते. मला त्याचे विशेष वाटले नाही. वाईटही वाटले नाही. त्यात काय वाटायचे ? माजगावकर आणि मुंदडा ही काही सत्ताधारी माणसे नव्हती. त्यांचे व्यासपीठही पक्षाचे नव्हते. कर्णे, भोंगे,


जी. एस्. बापट ॲण्ड सन्स

बिल्डिंग कॉन्ट्रॅक्टर्स

(स्थापना १९३१)

उस्मानपुरा — औरंगाबाद (द.)

महाराष्ट्र राज्य.

इ. आवाज करणारी साधनेही त्यांच्याजवळ नव्हती. माणूसबळही तुटपुंजे होते. होते-नव्हते ते मात्र प्रा. रानडे आणि द. मा. मिरासदार यांनी एकवटल्यासारखे दिसत होते. विद्यार्थी-परिषदेची तरुण, तरतरीत आणि कोवळ्या चेहऱ्याची पंचवीस-तीस मंडळींची धावपळ चालू होती. त्यांच्याकडे पाहिले आणि निर्धास्त वाटले. अन्न-स्वतंत्रता-संचलन यशस्वी होणार याबद्दल त्या क्षणी कुठलीही शंका राहिली नाही.

दुपारी बारा-साडेबाराच्या सुमारास आम्ही वेरुळला पोहोचलो. समारंभाचे अध्यक्ष ना. ग. गोरे हे तिथे आमच्याही आधी पोहोचले होते. आमच्या भात-पिठल्याच्या पंक्तीत तेही गप्पा-टप्पा करण्यासाठी सैपाकघरात आले. त्या अंधाऱ्या, शेणाने सारवलेल्या सैपाकघराच्या मधल्या दरवाजाशी जो एक पाटा होता त्याला टेकून आपले धोतर वर करून त्यांनी जमिनीवरच बैठक मारली होती ! अखिल भारतीय प्रजा-समाजवादी पक्षाच्या अध्यक्षाची मनमोकळी बैठक पाहून फार बरे वाटले. आम्हा सर्व लेखकमंडळीत एकमेव कृतिशूर असा हा लेखक फार दूरवर नाही, आपल्या जवळच आहे असा दिलासा त्यामुळे एकदम मिळाला. (अखिल भारतीय असा हा माणूस शेवटी कुठेतरी आपला आळीकरही आहे हे नाते व्यक्तिश: माझ्याही मनात जरा ठसले !) जयवंत दळवींकडे पाहून त्यांनी हसतहसत विचारले–

"काय दळवी, तुम्ही इथे कसे ?"

युनायटेड स्टेट्स इन्फर्मेशन सर्व्हिसमध्ये काम करणाऱ्या दळवींनी उत्तर दिले–

"प्रेसिडेंट जॉन्सन यांचाही अन्न-स्वतंत्रता-संचलनाला पाठिंबा आहे, असा 'संदेश' घेऊन आलो आहे."

"त्यामुळे संचलनाला आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा आली आहे–" पारगावकर म्हणाले !

"मग आम्ही घोषणा कुणाविरुद्ध करायच्या ?" श्री. ज. जोश्यांनी खोट्या संतापाने विचारले.

आम्ही सारे हसलो. वातावरण आणखीनच खेळकर अन् प्रसन्न झाले.


**भारताचा भीकबळी होऊ नये म्हणून आरंभिलेले**
**अन्न-स्वतंत्रता-संचलन यशस्वी होवो**

*यासाठी*

**अकराणीतील गिरिजन बांधवांच्या**
**शुभकामना**


**श्री ग्रामस्वराज्य सहकारी शेतकरी संघ, लि.,**
**धडगाव ( धुळे ).**

त्याच प्रसन्न वातावरणात सारेजण कैलास लेण्यासमोरच्या पटांगणात जमले. माझ्या अंदाजाप्रमाणे दोनशे–एकच मंडळी असावीत. पण होती ती सर्व वयांची, थरांची आणि पेशांची. प्राध्यापक, लेखक, पुढारी, मुद्रक, पत्रकार, सुशिक्षित स्त्रिया, तरुण विद्यार्थी – अशी सर्व. पण त्यांत, माझे लक्ष वेधून घेतले ते वेरुळमधल्या शाळेच्या मुलांनी. स्वच्छ निळी चड्डी आणि पांढरा सदरा या वेषात ती आली होती. मोठ्या रुबाबात त्यांनी आपला बँडही आणला होता. खेडेगावच्या शाळेतील ती मुले आमच्या शाळांतील मुलांइतकीच चपळ आणि चुणचुणीत होती. प्रत्यक्ष वेरुळची खेडूत जनता आपल्या गावाहून इथे आली नव्हती. पण त्यांचे प्रतिनिधित्व ही मुले करीत होती !

'आमच्या सर्वांची मने एक होवोत,' अशा काहीतरी अर्थाच्या वेदमंत्रांनी कार्यक्रमाला सुरुवात झाली. एरवी त्या वेदमंत्रांचे काही वाटले नसते. पण प्राचीन आणि पुराण अशा जगाच्या एका आतल्या कोपऱ्यासारख्या वाटणाऱ्या त्या परिसरात ते मंत्र ऐकताना बरे वाटले. अर्थ काहीच समजत नव्हता. पण तो नाद स्वच्छ आणि सनातन वाटला. मंत्र संपले आणि पद्माकर गोवईकर पुढे आले. त्यांनी 'बलसागर भारत' हे गीत म्हटले. गोवईकरांचा आवाज खोल. त्याला एक गंभीर, किंचित कातर असा घुमारा आहे. शब्दावर थांबण्याची त्यांची समजही चांगली आहे. त्यांच्या गाण्याने वातावरण आणखी शांत झाले.

त्याच वातावरणात माजगावकर उठले आणि त्यांनी आपले निवेदन वाचून दाखवायला सुरुवात केली. "यापुढे आर्थिक, सामाजिक व नैतिक यांपैकी कोणत्याही भूमिकेवरून फुकटच्या मिळणाऱ्या अन्नमदतीचा आपण स्वीकार करणे असमर्थनीय आहे...लहानसहान प्रगतीसाठी किंवा प्रगतीच्या आभासासाठीही आपण परक्यांवर अवलंबून राहू लागलो आहोत...जो देश अन्नासारख्या प्राथमिक गरजेबाबत दुसऱ्यावर विसंबून राहतो, त्याच्या राष्ट्रीय गर्जनांनाही फारसा अर्थ नसतो...आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रांत बोकाळलेला ऐतखाऊ मिंधेपणा आपण नाहीसा करू या–" साधे, पण रोखठोक शब्द. एका संथ लयीत ते वाचत होते. कुठे ढंग नाही, की आवेश नाही. आवाजात चढउतारांचे नाटकी हेलकावे नाहीत. पण त्या उच्चारामागे शांत आत्मविश्वास होता. सुजाण श्रद्धा होती. त्यांचे निवेदन संपल्यावर नानासाहेब गोरे बोलले. संकल्प आणि त्यामागची भूमिका त्यांना पूर्णपणे मान्य होती. माथेफिरू विध्वंसनाच्या, राष्ट्रवादाच्या विच्छेदनाच्या या दिवसांत असा एक विधायक कार्यक्रम सुचावा आणि त्याची मुहूर्तमेढ महाराष्ट्रातच व्हावी याचा आनंद त्यांनी खुलेपणाने व्यक्त केला. "राष्ट्रीय जिद्दीच्या अशा हिंमतीच्या कार्यक्रमाला आशीर्वादाची गरज नाही. पण तुम्ही मागताच आहात म्हणून तो देतो – तोसुद्धा महापौर या नात्याने असेही त्यांनी निखळ स्पष्टपणाने सांगून टाकले. "अन्न बाहेरून आणू नका हे कोणताही पक्ष मान्य करील पण हा प्रश्न शेवटी न्याय्य वाट-







मुलींचे लग्न, मुलाचे शिक्षण
किंवा स्वतःचे घर यापैकी कोणतीही
समस्या असो; तिचे सोपे उत्तर म्हणजे
**संचित मुदतीच्या ठेवीचे खाते.**

१. टपाल कचेरीत दरमहा ठराविक रकमेची (पाचाने विभाज्य) रु. ३०० पर्यंत, ५, १०, अथवा १५ वर्षे ठेव ठेवीत चला. तुम्हांला पाहिजे असलेली ठोक रक्कम त्यापासून मिळेल (ठेवी व करमुक्त व्याज मिळून).
२. १० व १५ वर्षे मुदतींच्या खात्यांतील ठेवी कर आकारणी करताना एकूण करपात्र उत्पन्नांतून वजा केल्या जातात.
३. ह्या ठेवींवर संपत्तीकरही माफ असतो.

**समस्या सुटली...**

**संचित मुदतीच्या ठेवीचे खाते**

आजच नजीकच्या टपाल कचेरीत उघडा

राष्ट्रीय बचत संघटना

davp 67/395

पाचाही आहे. अशा वाटपाला सरकार उत्सुक नाही. सधन शेतकरी राजी नाहीत. धान्याची प्रांतबंदी आणि राज्यबंदी उठवायला राज्य-सरकारेही तयार नाहीत. त्यामुळे हा प्रश्न शेवटी काही व्यापक अशा सामाजिक आणि आर्थिक प्रश्नांशी जाऊन भिडतो हे विसरू नका." असा इशाराही त्यांनी दिला. नानासाहेब सात-आठच मिनिटे बोलले असतील. पण त्यात सारे काही येऊन गेले — त्यात जागरूक विवेक होता. एखाद्या प्रश्नाची सर्व बाजू हेरण्याची दृष्टी होती. ठेकेदार नेत्याचे जे सवंग भावना-प्रदर्शन असते त्याचा मागमूसही नव्हता आणि तरीही पुढच्या वाट-चालीला हुरूप यावा इतका भावनेचा ओलावाही होता.

हा समारंभ चालू असताना डोळे अधूनमधून समोरच्या कैलास लेण्याकडे जात होतेच. काळ्या कातळाचे शिखर, त्याखाली उतरत गेलेले सुबक छत आणि त्या खालचे मुख्य मंदिर अस्पष्टपणे दिसत होते. आतून-बाहेरून कोरलेल्या मंदिराच्या बाहेरचा एक द्वारपाल इतक्या लांबून गूढ दिसत होता. मला राहूनराहून एका कवीच्या कवितेतील एक ओळ आठवत होती—जेव्हा जेव्हा माणूस आणि डोंगर एक-मेकांना खरेखुरे भेटतात तेव्हा तेव्हा एक फार मोठी घटना घडून येते !

समारंभ संपला आणि आम्ही तिघातिघांच्या रांगांनी संचलनाला आरंभ केला. 'कैलास ते सिंधुसागर' असा फलक अग्रभागी होता. त्यामागून सर्वजण चालत होते. कुणी घोषणा देत नव्हते. हवेत मुठीही फेकल्या जात नव्हत्या. कोणत्याही मागणीचा उच्चार नसलेल्या त्या मोर्च्याने माझ्यासारख्या लोकांना स्वातंत्र्यपूर्व काळातील दिवस आठवले. स्वातंत्र्याच्या ध्यासाचा तेव्हाचा तो स्पर्श ! तेव्हाची ती बेचैनी आणि हुरहूर ! काही होत नाही, काही घडत नाही, यामुळे वाटणारी खंत पण काहीतरी होईलच, काहीतरी घडेलच, असा वाटणारा तेव्हाचा तो मूक आत्म-विश्वास ! पाहता पाहता घृष्णेश्वराचा तांबडा तट दिसला. थोड्या वेळाने त्याचा कळस दिसला. तो दृष्टीआड झाला अन् वेरूळ गाव आले. संचलनाचा पहिला टप्पा तिथे पुरा झाला होता.

पण माणसे तिथेच थांबली नाहीत. गावातल्या एका मैदानात लागलीच सभा भर-विण्यात आली. मातीच्या एका लहानशा टेकणावरील व्यासपीठावर 'मराठवाडा'चे संपादक अनंतराव भालेराव यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा झाली. गावचे सरपंच


अधिक चांगला प्रकाश आणि दीर्घ काळ काम यासाठी

**फारगो गॅस मॅण्टल्स्**

मालाड ( पश्चिम ), मुंबई ६४.

व्यासपीठावर होते. पाच-पंचवीस गावकरी होते. पण ते मागे एका बाजूला बसले होते. प्रथम शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे बोलले. दुष्काळ किंवा धान्याचा अपुरा साठा हे प्रश्न आजचेच नसून शिवाजीमहाराजांच्या कालापासूनचे ते आहेत, हे त्यांनी अनेक पुरावे सादर करून सांगितले. शिवाजी महाराजांनाही या प्रश्नाचे भान कसे होते यासंबंधीचे त्यांचे बोलणे फार अर्थपूर्ण होते. बक्षीसपत्र म्हणून दिलेले एक शेत कसले गेले नाही म्हणून महाराजांनी ते जप्त केले याचीही आठवण त्यांनी करून दिली. वेरुळच्या शिल्पसौंदर्याची जगात जेवढी जाहिरात होते, त्याहूनही भूकेपायी खपाटीला गेलेल्या भारतीयांच्या दैन्याची जाहिरात जास्त होते, हे विसरू नका—हा त्यांचा इशाराही मनाला एक चटका देऊन गेला. त्यांच्यानंतर अनंतराव भालेराव बोलले. त्यांचे बोलणे एकदम रोकडे आणि ठणठणीत होते. जे काही गावकरी तिथे आले होते त्यांना उद्देशून ते म्हणाले—" हे लक्षात ठेवा की, अन्नधान्याचा प्रश्न हा शेवटी तुमचाही आहे. पुढे मागे दुर्दैवाने भूकबळी गेले, तर ते शहरातून आलेल्या या मंडळींचे जाणार नाहीत. ते तुमच्याच खालच्या थरातून जातील !......तुमच्या गावातल्या सवन शेतकऱ्यांनी साठेबाजी केली तर तिच्याशी मुकाबला करण्याचे धैर्य तुम्ही दाखविले पाहिजे......मराठवाड्याचा शेतकरी अजूनही चांगला आहे. गेल्या वर्षी आम्हीच सरकारला भरभरून जोंधळा दिला. मराठवाड्याची मातीच अशी आहे की मनात आले तर तो उभ्या महाराष्ट्राला सुद्धा जोंधळा देऊ शकेल. पण वाटप मात्र चोख संभाळले पाहिजे. आणि तीही जबाबदारी आपल्या सर्वांची ! " पुरंदऱ्यांचा ऐतिहासिक सूर जितका खणखणीत तितकाच अनंतरावांचा हाही सूर खणखणीत होता. सभा संपली तरी अनेकांच्या डोक्यांत हे दोन्ही सूर बराच वेळ घणघणत होते.

सभा संपली. रात्री धुंडा महाराज देऊळकर यांचे प्रवचन झाले. ते आटपले आणि आम्ही माजगावकरांचा आणि त्यांच्या सहकाऱ्यांचा निरोप घेतला. औरंगाबादेस आलो आणि सकाळच्या गाडीने पुण्याची वाट धरली.

सबंध रस्ताभर दुतर्फा शेताच्या रांगा दिसत होत्या. थेट डोंगरांच्या पायथ्यापर्यंत कणसाची ताटेच्या ताटे सळसळत असताना मी पाहत होतो. एकसारखा पाहत होतो. काय असेल ते असो, आजपर्यंतच्या प्रवासात आजूबाजूच्या शेतांकडे मी असे आणि इतके कधी पाहून घेतले नव्हते ! ○

स्वादिष्ट मिठाईसाठी आम जनतेची निवड

शर्मा स्वीट मार्ट

दत्त मंदिराशेजारी, मंडई रस्ता, पुणे २.

दिल्ली दरबार

# अंतर्गत सामर्थ्य हाच खरा आधार

गेल्या महिन्यात झालेल्या आपल्या अठराव्या प्रजासत्ताक दिनानिमित्त लंडन येथील 'टाइम्स' दैनिकाने वीस पानांची भारतविषयक पुरवणी प्रसिद्ध केली आहे. त्या पुरवणीत भारतविषयक ब्रिटिश तज्ञांचे व काही भारतीय नेत्यांचे लेख अंतर्भूत करण्यात आले आहेत. भारतातील आजच्या समस्यांसंबंधी 'टाइम्स'सारख्या एका प्रमुख परदेशी पत्राला काय वाटते या दृष्टीनें ही पुरवणी बरीच उपयोगी ठरते.

'सर्च फॉर न्यू पाथ्स' या शीर्षकाखाली 'टाइम्स'च्या संपादकांनी १९६७ मधल्या भारताचा आढावा घेतला असून त्याच्या अनुरोधाने गेल्या वीस वर्षांतील भारताच्या वाटचालीबद्दल आपल्याला काय वाटते याचा ऊहापोह केलेला आहे. भारतास १९६७ मध्ये अनेक कटू सत्यांची कबुली द्यावी लागली असा उपोद्घात करून 'टाइम्स'चे संपादक म्हणतात की यापूर्वीच्या दहा वर्षांत कुरकुरत का होईना निश्चित अशी प्रगती होत होती. पंचवार्षिक योजनांची कार्यवाही चालू होती. लवकरच आपण स्वयंपूर्णतेचे शिखर गाठू शकू असा नियोजनकारांचा विश्वास होता. परंतु सध्या हे पंचवार्षिक नियोजन अक्षरशः बंद पडलेले आहे.

मध्यंतरीच्या काळात अंतर्गत अडचणींनी सरकारला एवढे भंडावून सोडले आहे की त्यामुळे आर्थिक प्रश्नाकडे लक्ष द्यायला फुरसत सापडू शकत नाही. विशेषतः देशातील फुटीर प्रवृत्ती मोकाट सुटल्या असून त्यांना आळा घालणे सरकारच्या

शक्तीबाहेरचे ठरत आहे. लोकसभेमध्ये राज्यसभेच्या प्रश्नावर जी चर्चा झाली ती या दृष्टीने महत्त्वाची ठरते. आपण गेल्या वीस वर्षांत काय साध्य केले असे लोक उघडपणे विचारू लागले आहेत.

## नेहरूंच्या वेळची परिस्थिती

या परिस्थितीमुळे आंतरराष्ट्रीय राजकारणातील भारताचे स्थान दुबळे होत आहे, असे सांगून 'टाइम्स' म्हणते की जागतिक राजकारणात भारताचा आवाज ऐकला जावा असा जे पूर्वी प्रयत्न करीत होते, त्यासाठी लेख लिहीत होते वा निदर्शने करीत होते, दूरदूरच्या राजधान्यांतही भारताच्या मनाची दखल घेतली जाण्याबाबत आग्रह व्यक्त केला जात असे, ते लोकही भारत गप्प बसेल तर बरे असे आता म्हणू लागले आहेत. व्हिएतनामसंबंधी अमेरिकेने आपले मत ऐकावे यासाठी भारताचा प्रयत्न चालू आहे. अमेरिकेच्या गोटातील काही खास आणि मोजकी राष्ट्रे सोडली तर व्हिएतनामबाबतच्या अमेरिकेच्या धोरणाला अनेक राष्ट्रांचा विरोध आहे. व्हिएतनामपेक्षाही तिबेट हा भारताला अधिक जिव्हाळ्याचा प्रश्न आहे आणि या प्रश्नाबाबत भारत सरकारने कणखर धोरण स्वीकारले पाहिजे अशी जनसंघाची मागणी आहे. गेल्या वर्षीच्या मध्यपूर्वेतील लढाईत भारताचे धोरण पूर्वग्रहांवर आधारलेले होते आता कोठे त्या धोरणाचा फेरविचार चालू झालेला आहे. हे सारे असले तरी भारताच्या आंतरराष्ट्रीय भूमिकेबाबत कोणीही आग्रहाने बोलत आहे असे दृश्य दिसत नाही. पं. नेहरू जिवंत असताना भारताचा आंतरराष्ट्रीय दबदबा होता. ते काय म्हणत आहेत याची परराष्ट्रांना दखल घ्यावीशी वाटे. नेहरूंना लष्करी गट आणि शीतयुद्ध यासंबंधी कमालीचा तिरस्कार वाटे. त्यामुळे बांडुंग परिषदेसारख्या परिषदा घेऊन नेहरू अलिप्ततावादी राष्ट्रांचा निराळा गट स्थापन करण्याचा प्रयत्न करीत असत व या तिसऱ्या गटाला महत्त्वही प्राप्त होत असे. परंतु येथे एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होतो तो हा की भारताच्या राष्ट्रीय हितसंबंधांचा बळी देऊन नेहरूंची आंतरराष्ट्रीय प्रतिमा तयार होत होती की नाही? आशियाई–आफ्रिकी राष्ट्रांचे पं. नेहरूंनी नेतृत्व स्वीकारले असते तरी त्यामागे भारताच्या सामर्थ्याचा आधार नव्हता. त्यामुळे नेहरूंच्या निधनानंतर भारताचे ते स्थान राहू शकले नाही. खुद्द नेहरूंनाही अखेरच्या दिवसांत या वस्तुस्थितीची जाणीव झालेली होती व तेव्हापासून त्यांनी आंतरराष्ट्रीय राजकारणावर प्रभाव करू शकणाऱ्या तिसऱ्या गटाच्या निर्मितीवरून आपले लक्ष काढून घेऊन राष्ट्रहिताला प्राधान्य देण्यास सुरुवात केली होती. चीनचे आक्रमण हे त्या दृष्टीने महत्त्वाचे कारण ठरते. चिनी आक्रमणाच्या वेळी आशियाई–आफ्रिकी राष्ट्रांनी भारताचा पाठपुरावा केला नाही आणि तेव्हापासून नेहरूंना आफ्रिकी–आशियाई एकजुटीबद्दल उदासीनता वाटू लागली.

गेल्या दहा वर्षांमध्ये भारताच्या विचारप्रवाहामध्ये हा जो बदल होत आहे तो


अल्पावधीत लोकप्रिय झालेली
स्वस्तिक
पादत्राणे
मीना
आकर्षक रंग
लेटेस्ट डिझाईन्स
टिकण्यास मजबूत
राज
बंदिनी
स्वस्तिक रबर प्रॉडक्टस् लि., पुणे ३.

भल्यासाठीच होत आहे. आपले हितसंबंध कोठे व कसे गुंतले आहेत याचे यामुळे भारताला सम्यक ज्ञान होईल व हे हितसंबंध सुरक्षित राखण्यासाठी काय करावे याचा बोधही होऊ शकेल.

एके काळी अमेरिका आणि रशिया या दोन राष्ट्रांमध्ये मध्यस्थाची भूमिका बजावणाऱ्या भारताला आता या दोन्ही राष्ट्रांबरोबर संबंध दृढ करण्याची गरज वाटू लागली आहे. या दोन्ही देशांशी आपले संबंध राहावेत म्हणून भारत अलिप्ततावादाचा पुरस्कार करीत आहे असे आजचे चित्र आहे. अमेरिकेकडून भारताला आर्थिक मदत व अन्नधान्य मिळत आहे. त्याचप्रमाणे काश्मीरबाबतच्या पाकिस्तानशी असलेल्या वादात रशियाचा पाठिंबा असणे भारताच्या हिताचे आहे. भारताला जशी या दोन्ही राष्ट्रांची गरज आहे तशी या दोन्ही राष्ट्रांना भारताची गरज आहे. चीनच्या विस्तारवादास आळा घालू शकेल असे समर्थ आणि स्वतंत्र सरकार म्हणून ही दोन्ही राष्ट्रे भारताकडे पाहतात आणि भारताचे ते स्थान टिकले पाहिजे यासाठी मदतही करतात.

## निष्कर्ष ?

पाकिस्तान आणि चीन या दोन्ही राष्ट्रांची युती झाल्यामुळे भारताच्या संरक्षण व्यवस्थेला कायमचा धोका निर्माण झालेला आहे. अन्नधान्याची टंचाई हा जसा भारताचा अंतर्गत आघाडीवरील सर्वांत महत्त्वाचा प्रश्न आहे तसाच पाकिस्तान हा परराष्ट्रीय क्षेत्रातील भारताचा मूलभूत स्वरूपाचा प्रश्न आहे. पाकिस्तानशी कसे जमवून घ्यायचे याचा भारतीय नेत्यांना सतत विचार करायला लागत असून गेल्या वर्षभरात त्या दृष्टीने फारशी प्रगती झालेली नाही. आता शेख अब्दुल्ला यांची सुटका करून भारत-पाकिस्तान-संबंध सुधारण्याचा इंदिरा गांधी यांचा प्रयत्न सुरू झालेला आहे.

भारताला भेडसावणाऱ्या महत्त्वाच्या प्रश्नाबाबतचे 'टाइम्स' कारांनी केलेले विवेचन हे असे आहे. खोट्या प्रतिमेच्या नादी लागून भारताने प्रारंभी आपल्या राष्ट्रीय हितसंबंधांकडे दुर्लक्ष केले? त्यापायीच त्याला आज अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे असा या विवेचनाचा निष्कर्ष आहे. 'टाइम्स'कारांचे हे विवेचन सर्वस्वी वस्तुनिष्ठ वा निःपक्षपाती आहे असे मानण्याचे मुळीच कारण नाही. तशी अपेक्षा बाळगणेही चुकीचे आहे. परंतु भारताचे अंतर्गत सामर्थ्य वाढले तरच त्याची आंतरराष्ट्रीय प्रतिमा अधिक ठळक होणार आहे हे त्यांचे विधान अनेकांना मान्य व्हायला हरकत नाही. केवळ सिद्धान्तवादी कल्पनांच्या स्वप्नात दंग होऊन वास्तव परिस्थितीशी फारकत घेतल्यानंतर आपण कसे उघडे पडतो हे गेल्या वर्षातील वाटचालीने दाखविलेले आहे आणि तेवढ्यापुरतीच ही एका परदेशी पत्राची मीमांसा विचारार्ह वाटायला हरकत नसावी.

– सदाशिव पेठकर



## स्वयंवर झाले, आमचाच जय झाला !

स्वयंवर झाले. आमचाच जय झाला. इंदिराजी पंतप्रधान झाल्यानंतर हा आमचा पहिलाच वार्षिक सोहळा. डँबिस लोकांच्या अपेक्षा सुरुवातीपासूनच धुळीस मिळायला सुरुवात झाली. अध्यक्षपदासाठी इंदिराजींना कामराज नकोत, कामराजांना नंदा नकोत, नंदांना पाटील नकोत, पाटलांना कामराज नकोत, सर्वांना पाटील नकोत अशा खोटचा कंडचा पिकवण्यात आणि अखेर निजलिंगप्पांना मुख्यमंत्रिपदावरून उठवण्यात सर्वांना यश आले. नाइकांवरचे गंडांतर टळले, चव्हाणांचे आसन त्यामुळे बळकट झाले. भांडणे न होता निवडणूक झाली, एकमताने निजलिंगप्पा सर्व सत्तेचे सीमावाद मिटवून काँग्रेसचे अध्यक्ष निवडण्यात आल्यावर आम्ही सांगितले–आम्ही जिंकलो ! टीकाकार हरले ! दुसऱ्याच दिवशी आऊट–गोइंग अध्यक्षांनी म्हणजे कामराजांनी लालबहादुर नगरात सर्व काँग्रेसजनांना इशारा दिला–" फिशीपॅरस अँन्ड सेंन्ट्रिफ्युगल टेंडन्सी " विरुद्ध ! वस्तुत: हा आपला उगाच दिलेला आहे असे आमच्या लगेच ध्यानात आले. कारण निजलिंगप्पांभोवती सर्वांनी फेर धरल्यानंतर या प्रकारच्या टेंडन्सी उरतीलच कशा ? सगळे वादच खतम झाले ना. बेळगावचा प्रश्न सुटला, कारवारचा सुटला. अमेरिकेचे अध्यक्ष 'कानडी' होते म्हणून सर्व वॉशिंग्टनच कन्नडीयांचे आहे,

– – – – – – –

# मु क्ता फ ळे ! !

– – – – – – –

असे जरी आता निजलिंगप्पा म्हणाले तरी वादविवाद न करता या प्रश्नाचा विचार करण्याकरता सर्व लोकसभेच्या सभासदांचे मानसचित्र तपासण्याचा नवा फॉर्म्युला यशवंतरावजी

। ग्यानबा ।

मांडणार हे नक्कीच होते आणि ९ जानेवारीला, यशवंतरावजी नेमके हेच बोलले नि काय ? सीमावादाचे गजकर्ण खाजवणाऱ्यांची त्यामुळे चांगली पंचाईत झाली मात्र !

निजलिंगप्पा भाषणे करीत करीत हैद्राबादला पोचले. विजयवाडा, काझीपेठ इथल्या सगळ्या भाषणांत त्यांनी सांगितले "........गेल्या २० वर्षांत काँग्रेसच्या नेतृत्वाखाली देशाचे जे भले झाले आहे तेवढे भले गेल्या १०० वर्षांत झालेले नाही !"

आम्ही म्हणतो १०० का, गेल्या हजार वर्षांत झालेले नाही. पूर्वी भारतात नुसता व्यापार होता. ह्या बाजारात निश्चित काजळ घातले ते काँग्रेसने ! ब्रिटिशांनी देशाची चाळणी केली. काँग्रेसने फाळणी केली. पारतंत्र्यात बहुश: लायकीप्रमाणे नोकऱ्या व अधिकारखाते दिली जात. लायकी ही भांडवलशाहीचे अवशेष असल्याने निवडणुकीच्या तिकिटापासून ह्या घातुक गोष्टीला काँग्रेसने चाट दिली व केवळ वाडवडिलांचे नाव पाहून सर्व तिकिटे वाटून अधिकारखाती कबजात घेतली. आता ती वंशपरंपरागत चालू राहावीत, ह्यासाठी लोकशाहीची कास धरली आहे. पूर्वी भारतास कुणीही कर्ज दिले नव्हते. आता गेल्या २० वर्षांत भारताला कर्ज न दिलेला एकही देश शिल्लक उरलेला नाही. पत वाढल्याशिवाय का हे झाले ? भारताची लोकसंख्या कमी करण्यासाठी काँग्रेसने चालवलेले प्रयत्न तर कौतुकास्पद आहेत. सर्व हिंदूंची संख्या झपाट्याने कमी होऊन इथे हिंदु-मुसलमान प्रश्न मिटवण्यासाठी योग्य वातावरण निर्माण व्हावे ह्यासाठी केवढा हा भगीरथ प्रयत्न होय ! आसाममध्ये घुसलेल्या लाखो मुसलमानांना भारताचे नागरिकत्व देऊन त्यांच्या अंत:करणात देशभक्तीची ज्योत लावण्याचा मोठा प्रयत्न यशवंतरावजी लवकरच हाती घेणार आहेत. नवे प्रयोग, नवी अस्मिता !

वरंगळला अण्णा म्हणाले–" काँग्रेस कमकुवत झाली, की देश कमकुवत झालाच म्हणून समजा !" ह्याच सुरात इंदिराजींनी सूर मिळवून सांगितले–

" काँग्रेस ही देशाला एकात्मतेची भावना देणारी एक संस्था आहे." हा तर आपला नेहमीचाच अनुभव आहे. गावात एक गटार सर्व ठिकाणी वाहते. यामुळेच गावाला गावपण येते. एकात्मकतेच्या शक्ती अशाच गावगल्ली वाहत असतात, नाही का ?



सगळी सोंगे करता आली तरी पैशाचे सोंग काढता येत नाही. मोरारजींनी हे ओळखले व त्यांनी आर्थिक परिस्थितीवर ठरावच येऊ दिला नाही. नुसतेच निवेदन केले. निवेदन !

मालवीयजी रागारागाने म्हणाले–

" आपले सर्व अर्थकारण परकीयांच्या वर्चस्वाखाली गेलेले नाही, असे मोरारजी परवा म्हणाले ते वाचून मी सर्दच झालो. असलेले पाप का नाकारता ? आजचे नेते लोकांना काही काळ फसवतील. परंतु सदासर्वकाळ ते शक्य नाही. भारताच्या समाजवादाच्या वाटचालीत हे नेतेच अडसर ठरत आहेत. "

मालवीयांना हे कळत नाही, की जे गेली ४०–५० वर्षे जमले ते ह्यापुढे जमणार नाही की काय ? फाळणी ह्या नेत्यांच्या देहावरून होणार होती. देह राहिले, फाळणी झाली. फसले ना लोक ? नेहरू म्हणाले,–

" काळाबाजारवाल्यांना दिव्याच्या खांबाखांबाला फाशी देऊ. " दिव्याचे खांब आहेत. काळाबाजारवाले तर काँग्रेसचेच आहेत. कुणी गेले फाशी ? अहो, सोंग काढणारे असल्यावर, लोक फसणार नाहीत ? काय बिशाद ! ! ! कोण आठवतो मागचे ? प्रत्येक वेळेला लोकांना असेच वाटते–ह्यावेळी नक्की फसवणार नाहीत ! पुन्हा फसवायचेच असते.

मोरारजींनी समाजवादाला जे फाटे फोडले त्याने मालवीयजींचे थोबाडच फुटल्यासारखे झाले. ते म्हणाले : म्हणाले कसले त्यांनी ह्या अधिवेशनात प्रसिद्ध झालेल्या स्मरणिकेत लिहिलेच आहे– " जगात ५०–६० प्रकारचे समाजवाद आहेत. आर्थिक, राजकीय व सामाजिक स्वातंत्र्य असलेला समाजवाद आम्हांला हवा आहे. समान संधी सर्वांना हवी. उगाचच समाजवाद-समाजवाद काय बोंबलता."

बोंबला ! साठ प्रकारच्या समाजवादांतून समाजवाद निवडायचा म्हणजे किती वर्षं लागतील. साधा अध्यक्ष निवडायचा तर कोण घोळ होतो. समाजवाद निवडायचा म्हणजे काय चेष्टा आहे ! तोंडाने सारखे समाजवाद समाजवाद म्हणायचे, करायचे तेच करायचे. मोरारजींनी असा जमालगोटा दिल्यावर मालवीयजी काय बोलतात त्यावर ! गप्प बसले. वर्किंग कमिटीसाठी उभे राहिले आणि पडले ! म्हणजे काँग्रेसमधला समाजवादच पडला न् काय !

साधक अल्लींनी अहवाल सादर केला, "जुलै १९६७ पर्यंत काँग्रेस सभासदांची संख्या ११० लाख झाली आहे. १९६४ मध्ये हीच संख्या १७४ लाख होती. ह्या ११० लाखांतले क्रियाशील सभासद २ लाखच आहेत." अहवाल पुढे म्हणतो–

" क्रियाशील सभासदांपैकी पुष्कळसे खादी वापरीत नाहीत व दारू पितात अशा तक्रारी आहेत. परंतु ह्या आरोपांची गंभीरपणे दखल घेणे शक्य नाही." ह्याची कसली गंभीर दखल घ्यायची बुवा ! मुळात २ लाख क्रियाशील सभासद, त्यांतले काहीजण असले हातभट्टीशील तर एवढं काय मोठं बिघडलं ? खादी वापरण्याची


शेतीसाठीं
महाराष्ट्र बँक सहाय्य करते.
आपल्या नजिकच्या शाखेस भेट द्या
दि बँक ऑफ
महाराष्ट्र लि.
११९ शाखासह आपल्या सेवेस सिद्ध
खते
बीयाणे

सक्ती करायची म्हटली तर सर्वांच्या मागे किमान एक तपासनीस नेमायला हवा. मग सारख्या तक्रारी येणार, ह्यांचा हातरुमाल खादीचा नाही, ह्यांचे धोतर खादीचे नाही, कुणाचा लंगोट खादीचा नाही, कुणाचे जाकीट खादीचे नाही, म्हणजे साधक-अल्लींनी पाहायचे तरी काय काय ? ६४ लाख सभासद कमी झाले. परंतु लोक-शाहीच्या निकोप वाढीला हे आवश्यक नाही काय ? कुणाचे तरी वाढले असणारच.

अहवालात शेवटी म्हटले आहे—

"जनतेत निराशा व वैफल्य पसरले आहे व जनता काँग्रेसकडे पुनः आशेने पाहत आहे."

"पुनः पाहत आहे" हा शब्दप्रयोग चुकीचा वाटतो. यावरून मधला काही काळ पाहत नव्हती असा अर्थ निघतो. ह्याऐवजी—सदासर्वकाळ जनता काँग्रेसकडे आशेने पाहत आहे असे म्हटले असते तर अहवालाचे वजन निश्चित वाढले असते.

विषय नियामक समितीची बैठक तर दणक्यात सुरू झाली. स. का. पाटलांनी तोफखाना उघडला. कामराजांचे गुणवर्णन करताना निजलिंगप्पा म्हणाले—"आपले सर्व आयुष्य ह्या माणसाने संघटनेकरता खर्च केले आहे. जीवनातली कुटुंबातली लहानातली लहान सुखेही याने त्यासाठी नाकारली." सुख नाकारलेली माणसे आता काँग्रेसमध्ये फारशी नसतात. इंदिराबाईंनी थोर कामराजांना अध्यक्ष-पदावरून उठवावे ह्याचा विषाद या वेळी सर्वांना झाला असेल, असो. झाले ते झाले. निजलिंगप्पा कामराजाहून थोर ठरतील. देशासाठी संसारदेखील न मांडणे व संसार-सुखाचा त्याग करणे ह्या कामराजांच्या गुणांचे खूप वर्णन केले व सुचविले की, काँग्रेसचा पाडाव झाला याचे कारण सर्व कार्यकारी काँग्रेस नेतृत्वात असा आता एखादाच थोर पुरुष उरला आहे. पाहू आता कामराजांच्या पावलावर पाऊल टाकावयास कोण कोण पुढे येतात !

परंतु देशासाठी अविवाहित राहायचे म्हणजे तरुण माणसे काँग्रेसमध्ये यायला हवीत. निजलिंगप्पांनी आशेने सर्वत्र पाहिले. स. का. पाटील, अतुल्य घोष, चव्हाण-साहेब, बाळासाहेब देसाई. यांचे चेहरे व देह पाहून त्यांच्या हे लक्षात आले की यांचे आता सगळे झालेले आहे व देशाची परिस्थिती कठीण आहे. लागलीच त्यांनी आवाहन केले— "देशातील तरुणांनो, काँग्रेसमध्ये या व काँग्रेस बलवान करा !" वस्तुतः अधिवेशनात हे आवाहन त्यांनी करायला नको होते. कारण ह्याचा अर्थ अधिवेशनाला सर्व म्हातारेच पक्षाचा कलप लावून वावरत होते असा होतो. परंतु आवाहन करून कुणी प्रत्यक्ष येत नाही हे लक्षात घेतले तर आवाहन कुठेही केले तरी बाकी हरकत नाही.

"आज काँग्रेसमध्ये तरुण नाहीत हा ऐतिहासिक अपघात आहे." (Historical Accident.) — असे स. का. पाटील ह्यांनी निजलिंगप्पांचे सांत्वन केले. महा-राष्ट्रातील सुप्रसिद्ध इतिहासकार कै. शेजवलकर नेहमी म्हणत की— "राज-

कारणात गांधीजींनी केलेल्या चुकांचे मूळ त्यांच्या इतिहासविषयक गाढ अज्ञानात आहे ! नेहरूंना छपन्न देशांचा इतिहास माहीत आहे. फक्त महाराष्ट्राचा माहीत नाही !"

हा तो ऐतिहासिक अपघात स. का. पाटलांना अभिप्रेत असावा. आता काही जणांना इतिहासात असतात शून्य मार्क. म्हणून त्यांची मानवता कमी ठरते की काय? यामुळे अपघात असा झाला की इतिहास विसरले ते पुरुषार्थाला पारखे झाले आणि " म्हातारे नेते गंमतीला " आता उरले ! स. का. पाटलांच्या ह्या शवच्छेदनामुळे त्यांच्या कुशाग्र बुद्धीचा सर्वांना प्रत्यय आला.

आंध्र सरकारने लालबहादुर नगरात इतका थाटमाट उडविला की रोम हे एका दिवसातच सहज बांधले गेले असेल असेच लोकांना साधार वाटू लागले. इंदिराजींना विश्रांतीसाठी व्यासपीठाच्या मागच्या बाजूला एक स्वतंत्र खोली केली होती. व्यासपीठावर फोम रबराचा गालीचा होताच परंतु खोलीकडे जाण्यासाठी ज्या पायऱ्या केल्या होत्या त्यादेखील फोम रबराच्या होत्या ! काही वृत्तपत्रांनी ह्यागोष्टीला नाके मुरडली आहेत. एवढा " फोम " आणला कुठून ? किती खर्च आला असेल ? वगैरे कुशंका. अंतर्गत व परराष्ट्रराजकारणात दिल्लीश्वरांच्या जो रोज तोंडाशी फेस येतो त्याचा इतका चांगला उपयोग अन्य काही होऊ शकला असता काय ? त्याच दिवशी दिल्लीत शेख अब्दुलांनी ह्याची पावती दिली. " हाऊ टु विन शेख अँड इन्फ्लुएन्स पीपल " ह्या नव्या ग्रंथाचे पहिले प्रकरण शेखसाहेबांनी लिहिले. ते म्हणाले, " मी भारताचा हंगामी नागरिक आहे ! " (I am provisionally Indian) बरे झाले, त्या दिवशी इंदिराजी व यशवंतरावजी दिल्लीत नव्हते. नाहीतर अब्दुल्लांना ' सुटका प्रयोग ' संपवून त्यांनी त्याला पकडलाच असता !

दि. ९ जानेवारीला इंदिराजींनी ' नवा अध्यक्ष ' ही घटना प्रतिनिधींना समजावून सांगितली. त्या म्हणाल्या......

" नवा अध्यक्ष नेमला की सर्व स्तरांत व काँग्रेस संघटनेच्या सर्व भागांत संपूर्ण


ज्ञान आणि मनोरंजन

दैनिके, दर्जेदार साप्ताहिके

साहित्यिक मासिके, पाक्षिके

उत्तमोत्तम कादंबऱ्या, कथा, नाटके याचे माहेरघर

" तापडे एजन्सीज, लातूर "

स्वस्त-पुस्तक-योजनेतील सर्व पुस्तकांची नांव नोंदणी सुरू आहे.

उलथापालथ करण्याची संधी उपलब्ध होते." अर्थात इंदिराजींचे हे म्हणणे फक्त कॉंग्रेस अध्यक्षपदालाच लागू आहे. कुणी जर असे म्हणेल–भारताचा पंतप्रधान नवा आला व नवीन पक्ष अधिकारारूढ झाला तर देशाच्या सर्व स्तरांत व सर्व क्षेत्रांत संपूर्ण उलथापालथ करण्याची सन्धी देशाला लाभेल तर हे वाक्य मात्र व्याकरण-दृष्ट्याच फक्त बरोबर आहे. कारण गेलेली अब्रू आणि पत परत मिळविण्यासाठी कॉंग्रेस आता उभी राहिली आहे असे लगेच पाटील ह्यांनी ठणकावून सांगितले आहे ते कुणी विसरू नये. पत परत मिळविण्याची घोषणा अर्थमंत्री ह्यांनी केली मात्र, तोच मुरारीला मोहनाने खडा मारला. मोहन धारिया म्हणाले—"कॉंग्रेसचे नेते स्वतःच्या कल्पनेच्या स्वर्गात विहार करीत आहेत."

प्रतिनिधींनी ह्यावर टाळ्यांचा कडकडाट केला. परंतु टाळ्या सर्वांनांच वाजवाव्या असतात. म्हणजेच समारंभ! सगळ्यांचा आरंभ सारखा टाळ्यांनी! मागच्याला टाळ्या की पुढच्याचे भाषण सुरू!!

निजलिंगप्पा अध्यक्ष होऊन, म्हैसूरची गादी खाली होणार हे कळल्यापासून हनुमंतय्या खूपच उड्या मारीत आहेत. त्यांनी एकदम इंदिराजींच्या अब्दुल्ला प्रेमावर हल्ला चढवलान काय! ते अब्दुल्लांच्या आवल्या दिवशीच्या विधानाला उद्देशून म्हणाले :—


"ह्या अब्दुल्ला स्वतःला कोण समजतो? तो स्वतःला इंदिराजी किंवा आयूबखान ह्यांच्या बरोबरीचा समजू लागला आहे, ह्याला कारण त्याला मिळणारी अवाच्या सवा प्रसिद्धी. त्याने आता एकच करावे : शांतपणे, सुखाने खासगी जीवन कंठावे!"

हनुमंतय्याचे पुच्छ इंदिराजींच्या धोरणात गुरफटले आहे. जर शेखला शांतपणे सुखानेच जगायचे होते तर नजरकैदेत तो काय दुःखी होता की त्याला बेगम भेटत नव्हती? त्याची उत्तम सरबराई इंदिराजींनी ठेवली होती. लाखो रुपये महिना खर्च होत होते. त्याला शांतपणे खासगी रीतीने जगायची इच्छा नाही आणि तरी त्याला इंदिराजींनी सोडले. हनुमंतय्यांनी धीर चेपताच नेहरूंवर हल्ला वळवला.


भीक बंद करून राष्ट्राच्या स्वाभिमानाची
व सार्वभौमत्त्वाची सुटका करणारे
'अन्न-स्वतंत्रता-संचलन' यशस्वी होवो

ग्रामोद्योग वस्तु-भांडार धुळे.

(संचालन : सातपुडा सर्वोदय मंडळ, धडगाव)




## भारतांतील शेतीव्यवसायाचा कायापालट...

भारतांतील शेती ही गेलीं हजारों वर्षे परंपरागत पद्धतीनें केली जात होती; पण आतां या प्रचंड व्यवसायाचा कायापालट होत आहे. किर्लोस्कर लोखंडी नांगर हे या क्रांतीच्या प्रारंभाचें प्रतीक होय. त्यानंतर विविध प्रकारचे सोयीस्कर नांगर, पेरणी यंत्र, पाणी पुरवठा करणारे अनेक प्रकारचे सेंट्रिफ्युगल पंप आणि विविध यांत्रिक साधनांची निर्मिति करून किर्लोस्कर कारखान्यानें शेती व्यवसायाच्या आधुनिकीकरणाला जोराची गती दिली आहे.

**किर्लोस्कर**



**किर्लोस्कर ब्रदर्स लि.,**
किर्लोस्करवाडी, जि सांगली.

" नेहरू लोकांना मनाला येईल ते करू देत ह्यालाच नेहरूंनी आपल्याला आश्वासने दिली असे शेख म्हणतो. मला असे मुळीच वाटत नाही की नेहरूंचा निरुपाय झाला म्हणून त्यांनी शेखसारख्या माणसाला आश्वासने दिली."

हनुमंतय्यांच्या ह्या वक्तव्याचा अर्थ इंदिराजींच्या ध्यानात येण्यापूर्वी टाळ्यांचा इतका कडकडाट झाला की मग त्यांना काही आठवेचना. धीर चेपलेला हनुमंत आता अगदी रावणाच्या वाड्यावर पेटत्या पुच्छानिशी चढला. इंदिराजींकडे वळून तो म्हणाला –

" शेख अब्दुल्लांना भारताबाहेर पाठवण्याची चूक करून जुन्या शोकांतिकेची पुनरावृत्ती होणार नाही याची काळजी घ्या !"

इंदिराजी हसल्या ! आता प्रयोग म्हटला की काय होईल ते आधीच बाई कसं सांगणार या हनुमंताला !

आपल्या नेतृत्वाला हनुमंतय्या धोका निर्माण करीत आहेत हे इंदिराजींच्या ध्यानात येताच त्यांनी ७१ व्या महिला काँग्रेसचे उद्घाटन करताना केलेल्या भाषणात स्त्रियांना, बहुसंख्येने देशाचे नेतृत्व करा असा संदेश दिला. एका स्त्रीच्या नेतृत्वाने देशाची जी झपाट्याने ' वाटचाल ' चालू आहे त्याबरोबर असंख्य स्त्रिया नेतृत्व करू लागतील, तर देश लवकरच सौभाग्याच्या शिखरावर जाईल ह्यात मुळीच शंका नाही. नेतृत्वाकांक्षी बायकांच्या मेळाव्यात निजलिंगप्पा व ब्रह्मानंद रेड्डी ह्या म्हाताऱ्या नेत्यांना पाहून इंदिराजींनी त्यांना म्हटले–

" काल युवक काँग्रेसच्या अधिवेशनात मी तुम्हांला ' तरुण ' म्हटले तरी आज स्त्रियांच्या मेळाव्यात मी तुम्हांला ' महिला ' म्हणू शकत नाही ! ( हंशा ) तुमचे अंतःकरण बाकी स्त्री-सदृश आहे व स्त्रियांचे मार्दव तुमच्यात आहे हे आज मला कबूल आहे ! ( टाळ्या )"

ह्यावर निजलिंगप्पा पुटपुटले म्हणतात : स्त्रीसदृश स्वभाव हे आज सर्वच काँग्रेसनेत्यांचे व्यवच्छेदक लक्षण आहे ! रेड्डींनी टाळी दिली.

अधिवेशनात ' हिंद पक्तून ' मैत्री समितीचे अध्यक्ष ए. एस्. मुल्ला ह्यांनी पत्रके वाटली. त्यात मुल्ला म्हणतात–

" भारतीय नेत्यांनी फाळणीच्या वेळी पठाणांचा विश्वासघात केला आहे. हा अन्याय धुऊन काढणे हे आपले काम आहे. भारताची आता ही नैतिक जबाबदारी आहे की त्यांनी पठाणांच्या लढ्याला पाठिंबा दिला पाहिजे."

सर्वांनी पत्रके वाचली, व त्यांत भेळपुरी खाल्ली. काहीतरीच ' वाटण्यात ' काय अर्थ आहे ! विश्वासघात केला की अन्याय होतो आणि पुन्हा अन्यायी धोरण पत्करले की विश्वासघात होतो. असे हे दुष्टचक्र आहे. केव्हातरी हे चक्र थांबवले पाहिजे ! मुल्ला राहिला कोकलत. उल्लू कही का !

लोकसाक्षशुद्धी व्हावी अशी सती जानकीची इच्छा असल्याने सौ. सीतादेवी

( पंजाब ) ह्यांनी विषय नियामक समितीत मागणी केली की काँग्रेसचे बोगस सभासदत्व रद्दबादल करावे. सीतामाईंना पाठिंबा द्यायला सुलतानसिंग उभे राहिले. ते म्हणाले–" बाई म्हणतात ते खरे आहे. हरियानात एका खेड्याची लोकसंख्या २००० आहे परंतु काँग्रेस सभासदांची संख्या ५००० नोंदण्यात आली आहे."

आम्ही म्हणतो सभासद असे व्यायले तर काय बिघडले. घरातला कर्ता पुरुष ज्या पक्षाचा, त्याच पक्षाकडे त्याच्या मुलाबाळांचा व बायकोचा ओढा सर्वसाधारण असतो. २००० कुटुंबांत ५००० काँग्रेस सभासद धरले ते, डॉ. चंद्रशेखरांची दोन-तीन मुलांची लूप योजना फलद्रूप झाली असे धरून ! वस्तुत: हा आकडा ७००० ते १०,००० हवा.

डॉ. करणसिंग ( काश्मीरचे युवराज व पर्यटन फेम मंत्री ) ह्यांनी नवाच मुद्दा मांडला.

"माणूस काय खातो, काय पितो व अंगावर कुठले कपडे घालतो इकडे लक्ष देऊ नका. तुम्ही त्याचे आंतरिक मूल्य काय ते ग्राहृत चला !"

हा मुद्दा फार महत्त्वाचा आहे असे आम्हांस वाटते. महाराष्ट्रातील सर्व प्रमुख काँग्रेस-नेत्यांचा आंतरिक मूल्यांक काढला तर आमचे म्हणणे स्पष्ट होईल. हा कसा काढायचा हे आम्हाला समजत नसले तरी तो कुणीतरी काढायला पाहिजेल आहे; किंवा काढण्याची शक्यता आहे ही गोष्ट नजरेआड करू शकत आहे. ( आम्ही हे वाक्य व्यासपीठावर बोललो तर टाळ्याच घेऊ ).

१० जानेवारीला वर्किंग कमिटीची निवडणूक झाली. ६ जागा निवडायच्या होत्या. १३ जागा काँग्रेस अध्यक्ष भरतात. ह्या ६ जागांवर सर्व तरुण रक्ताची माणसे निवडून आली. शरीरे थकली तरी रक्त तरुण आहे.

चंद्रभानु गुप्ता, साधक अल्ली, हितेंद्र देसाई, सी सुब्रम्हण्यम, सुखाडिया आणि वसंतराव नाईक हे निवडून आले. निवडणूक आटोपल्यावर एका काँग्रेस नेत्याने सांगितले,

"ह्या निवडणुका आम्ही अशा रीतीने घडवून आणल्या आहेत की पक्षाच्या यंत्रणेवर कुणाचे वर्चस्व आहे हे एकदा इंदिरा गांधींना व त्यांच्या बगलबच्चांना नीट कळावे. पक्षाच्या प्रमुखांनी जर ठरवले तर इंदिराजींना ते एकटे पाडू शकतात हे आता त्यांच्या ध्यानात येईल."

इंदिराजींना हा धक्का आहे असे सर्व वृत्तपत्रांनी छापले. आमचा ह्यावर विश्वास नाही. धक्का बसायचे कारण काय ? काँग्रेसची "दर्शनी मुकी बाहुली" ( गुंगी गुडिया ) असे इंदिराजींचे वर्णन यापूर्वीच मधु लिमये ह्यांनी केले तेव्हाच हा धक्का बसून गेला आहे. धक्के पुन्हा पुन्हा बसत नाहीत हे टीकाकारांनी ध्यानी घ्यावे ! वाटेल तशी संयुक्त दले स्थापन करून काँग्रेस सरकारे आतापर्यंत गडगडली. विरोधकांना वाटल हा डाव काँग्रेस खेळू शकत नाही. अशी संयुक्त सरकारे

किती संधिसाधू आहेत, काँग्रेस कशी खरी लोकशाहीची चहाती आहे हे सर्वांनी आतापर्यंत सांगितले, परंतु सत्ता ती सत्ता ! काँग्रेसला बिगर काँग्रेसी प्रांतांत धोका निर्माण झाला आहे ही गोष्ट आता ध्यानात येताच बंगालमध्ये मंत्रिमंडळात जाण्यास निजलिंगप्पांनी बंगाल काँग्रेसला लगच संमती दिली. निजलिंगी हिसका आता सुरू झाला आहे. इतर प्रांतांत मंत्रिमंडळे आता पाठोपाठ नाही कोसळली तर पाहा.

अधिवेशन दणक्यात झाले, निजलिंगप्पांचे भाषण सांगत बसत नाही. कारण पुनः पुढचे अधिवेशन होईपर्यंत निजलिंगप्पा आता तेच तेच रोज सांगणार आहेतच. आता सर्वत्र फोटो येणार ते निजलिंगप्पांचे ! पत्रके छापून येणार ती त्यांची ! दौरे निघणार ते त्यांचे ! इंदिराजी भेटणार त्या त्यांनाच ! असे खूप दिवस जातील मग पुनः नवीन अध्यक्ष निवडून येतील. नवा अध्यक्ष सांगेल :

"निजलिंगप्पा ह्यांनी देशाकरता अपार त्याग केला. संसारातल्या लहान लहान सुखांकडे त्यांनी पाठ फिरवली -- -- - वगैरे वगैरे ! -- -- --"
असो. स्वयंवर झाले; आम्ही जिंकलो !

## ☐ सुभद्राहरण

निवडणुकीत एखादी बाई उभी राहिली तर ती हटकून निवडून येते असा अनुभव आहे. तिचा नवरा वगैरे नुकताच जनताजनार्दनाला दुःखात लोटून गेला असला तर विरोधी पक्षांची सर्वच्या सर्व डिपॉझिटे जातात. आधीच बाई आणि त्यात काँग्रेसची घाई असली की बाई निवडून आलीच म्हणून समजा ! परंतु गेल्या निवडणुकीत जे काही चमत्कार घडले त्यात एक चमत्कार घडला. उमेदवार बाई, काँग्रेसचे तिकीट मिळालेले, आणि तरी बाई पडल्या. चांगल्या सणसणीत पडल्या. या बाई म्हणजे काँग्रेसच्या सुभद्रा जोशी. त्या मध्य प्रदेशात पडल्या हे खरोखर दुर्दैव होय ! बाईचे पाऊल डावे असल्याने तर दुधात साखर होती. डाव्या काँग्रेसवाल्यांना कम्युनिस्टदेखील उचलून धरतात. परंतु मालवियांचे झाले ते यांचे झाले. पडल्याचे दुःख नाही; परंतु जनसंघ सवकतो हे दुःख बाईंच्या जिव्हारी लागले. इतके काँग्रेसजन पडले. परंतु त्यांना सवय होती अधून-मधून पडायची. बाईंना मात्र हे दुःख सहन होईल अशी अपेक्षा नव्हती. त्या लगेच कामाला लागल्या. इतर पडलेल्या काँग्रेसजनांनी यांच्यापासून खरोखरच काही शिकावे. बाई दुःख विसरल्या. त्यांनी तपास सुरू केला. आपण का पडलो ? उत्तर आले जनसंघाने जोर केला म्हणून ! जनसंघाने जोर कसा केला ? हा मूलभूत प्रश्न बाईंनी हाती घेतला. त्यांनी शोधून काढले की जनसंघ म्हणजेच कालचा परवाचा रा. स्व. संघ ! बाईंना धक्काच बसला. ही संघटना जातीय जातीय म्हणून गुरुवर्य नेहरूंपासून सतत कल्लोळ चालू होता. यांचे कुणीच कसे ऐकले नाही. लोकशाहीला हा धोका आहे. बाईंनी ठरवले की आता चांगला जाडजूड ग्रंथच लिहायचा. गोविंद सहाय, एन.

एन. गुप्ता, आदींना पत्रे गेली. सर्वजण बाईंच्या भोवती जमले. शेवटी पुस्तक निघाले– R. S. S.–A Danger to Democracy– Edited by Subhadra Joshi–Published by Sampradayikata Virodhi Committee-New Delhi, Price 4 Rupees.

एवढ्या अल्प किमतीत हा ग्रंथ बाईंनी लोकांना उपलब्ध करावा हे खरोखरच अभिनंदनीय होय. आम्ही म्हणतो या सर्व प्रती भारत सरकारने विकत घेऊन लोकांना फुकट वाटाव्या. जनतेला एकदा कळू दे सगळे बिंग ! लोकशाहीला धोका ! काय चेष्टा आहे.

या सुंदर ग्रंथात सुभद्राबाईंनी चांगले अचूक शरसंधान केले आहे. बाईंचे संघाविरुद्ध आरोप असे आहेत—

(१) गांधीजींकडे या संघटनेच्या सभासदांनी राष्ट्रीय नेता म्हणून कधीही पाहिले नाही.

(२) नेहरूंवर सत्तेचा मोह असलेला दुबळा माणूस असा त्यांचा आरोप आहे. नेहरूंनी या सत्तामोहासाठी सत्ता राबवली असे त्यांचे म्हणणे आहे.

(३) काश्मीरच्या प्रश्नाकडे ते द्विराष्ट्रवादाच्या सिद्धांतातून पाहतात, फाळणी झाल्यावर या देशात उरले ते हिंदुराष्ट्र असा त्यांचा आग्रह आहे.

(४) राजकीय कारणासाठी ही माणसे जातीय द्वेष पसरवितात.

(५) लोकशाहीला ही संघटना मारक आहे.

(६) साम्राज्यशाहीची ही संघटना हस्तक आहे.

खरोखरच इतक्या थोड्या शब्दांत रा. स्व. संघाची छाननी यापूर्वी कुणीही केलेली नाही. अशा या सुंदर पुस्तकावर एक वात्रट अभिप्राय आम्ही नुकताच वाचला. केया चक्रवर्ती यांनी पुस्तक परीक्षण केले आहे. हा इसम किंवा ही बाई– (केया हे कदाचित बाईचेही नाव असेल. नाव बंगाली आहे. सांगता येत नाही) डावी कम्युनिस्ट असावी. असा आमचा तर्क आहे. नाहीतर एका काँग्रेसी महिलेची अशी हिंसा संभवतच नाही. अभिप्रायात चक्रवर्ती म्हणतात,

"पहिले दोन आरोप गैरलागू आहेत. (Irrelevent) न्यायच करावयाचा तर बाकीचे सर्व आरोप काँग्रेसलाही लागू पडतात. फरक इतकाच की, रा. स्व. संघ आपली तथाकथित जातीय भूमिका स्पष्ट धाडसाने मांडतो. परंतु काँग्रेसवाले निधर्मीपणाचा बुरखा पांघरून राजकीय कारणासाठी जातीजमातींनाच हाताशी धरून सौदे करतात."

काय म्हणावे या चक्र उलटवणाऱ्या चक्रवर्तीला. बाईंनी घेतलेले श्रम, त्यांची बुद्धिमत्ता विचारात घेऊन ग्रंथाचे सांगोपांग परीक्षण तर त्यांनी केलेले नाहीच. पुढे ते लिहितात—

'रा. स्व. संघ हा काँग्रेसविरोधी व जातीय आहे.' असे जोशीबाई म्हणतात.

या दोन्ही गोष्टी लोकशाहीला सारख्याच कशा काय मारक हे त्यांचे त्यांनाच ठाऊक, गोविंदराव सहाय यांचा समाचार घेताना तर चक्रवर्तींनी हद्दच केली आहे. ते लिहितात–

"हिटलरचे वारस" हा गोविंदरावांचा लेखही गमतीदार आहे. नाझींची चळवळ व रा. स्व. संघ यांच्यांत साम्य असल्याचे गोविंदराव सांगतात. नाझीवादाचा संदर्भ देणाऱ्या माणसाला कोणत्या आर्थिक व राजकीय परिस्थितीत नाझींची चळवळ फोफावली हे माहीत असेल. जर आज तशीच परिस्थिती झाली असेल तर या पापाचे वारसदार काँग्रेसशिवाय अन्य कोण बरे आहे ?

या पुस्तकाचा सर्वांत विनोदी भाग चक्रवर्तींना वाटतो तो हा की– पुस्तक इंग्रजीत ! जनसंघाचा जोर मागासलेल्या वर्गात असताना हा प्रकार म्हणजे आग रामेश्वरी बंब सोमेश्वरी असा आहे असे म्हणतात हे चक्रवर्ती !

पुस्तकाच्या पुढील आवृत्तीत बाई योग्य त्या सुधारणा केल्याशिवाय राहणार नाहीत अशी आमची खात्री आहे. बाई व गोविंदराव यांनी हे सुभद्राहरण फारसे मनावर घेऊच नये !

## ☐ द्राविडी प्राणायाम :

विद्यार्थी गणंग,

अन्न-मलई विद्यापीठ – मद्रास –

वणक्कम्

आमचे हे पत्र तुम्हांला उद्देशून आहे, हे कळावे म्हणून रामराम तामीळ भाषेत लिहिला आहे. वि. स. खांडेकरांच्या कादंबऱ्या भाषांतरित करणाऱ्या प्रख्यात तामीळ लेखकाकडून आमचे पत्र तामिळीत भाषांतर करून वाचावे.

आपण हिंदी भाषेविरुद्ध जोरदार आंदोलन उभारल्याचे तिकडून इकडे येणाऱ्या रेल्वेगाड्यांवर आपण काढलेल्या चित्रकलेवरून चांगले ध्यानी आले. 'शयन' शब्दापेक्षा Sleeping हा शब्द तुम्हांला अधिक प्रिय वाटतो, ही Weeping ची लक्षणे आहेत ! परंतु जगात अगदीच टाकाऊ अशी कुठलीच चळवळ नाही.

आपल्या या चळवळीस एक नवा दृष्टिकोण या पत्राने मिळाल्यास बघावे, म्हणून हे पत्र धाडले आहे. तुम्ही भारत-सरकारच्या रिझर्व बँकेने काढलेल्या छोटया नोटा पाहिल्या असतील. त्यावर 'पाच रुपये', 'दस रुपय', 'सौ रुपये' असे नीच हिंदी भाषेत लिहिलेले असते. आपल्यासारख्या तामीळ अभिमान्यांनी या नोटा वापरणे हे तामीळ भाषेचा अपमान करण्यासारखे आहे. आपण दक्षिण भारतात या नोटा न वापरण्याची चळवळ हाती घ्यावी. सर्व नोटांचे ढीग एकत्र करावेत. विनंती एवढीच की, नोटा जाळू नयेत. खराब कितीही कराव्यात. वाटल्यास थोडया थोडया फाडा-

व्यात. चिकटवून घेता येतील. – बहुतेक नोटा अशाच असतात ! त्या सर्व नोटा आमच्याकडे रवाना कराव्यात. त्यांची योग्य विल्हेवाट लावण्यात येईल. नोटांची वाट पाहत आहोत. किती पाठवता ?

आपला नम्र,
**ग्यानबा गारू.**

विद्यार्थी गणंग
इंद्रप्रस्थ विद्यापीठ, पानपत, कुरुक्षेत्र
नमस्ते !

मै ने हिंदी राष्ट्रभाषा रत्न पास कीच है–पण आम्हांला हिंदी अजून लिहिता येत नाही. प्रयत्न करता है. इसलिये खत या पत्र लाव लाव के वाचो. आप लोगोंने इंग्रजी भाषा विरोधी आंदोलन बहोत जोरसे चलाया है ऐसा समाचार यहाँ मिला है। आपकी दृष्टी नीच दक्षिण भारतीय विद्यार्थिओंसे बहुत उँची है यह नक्की है आंदोलन जारी रखना.

ये पत्र इसलिये के आपने भारत सरकारकी नोट देखी होगी. नोट...नोट... रुपयोंकी. आप ये तुकडे जरा दीर्घ दृष्टीसे देखिये तो मालूम होगा के पाँच रुपये के नोट के ऊपर ' पाँच रुपये ' इतने ही शब्द हिंदी राष्ट्रभाषाके होते है. बाकी सब नोट इंग्रजी शब्दोंसे खराब रहती है. यही हालत सौ या हजार रुपयोंकी नोटोंकी है। हमारी विनंती है के आप ये नोटों वापरना बंद करो. सब नोटों इकठ्ठा करके हमारे पत्तेपर भेजवाँ दो. ऐसे अभारतीय नोटोंका वापर करना आपको शोभा नही देता। नोटोंकी राह देख रहा हूँ।

आपका चरणदास
**ग्यानबादास चतुरदास.**



# विचार वारे

। समीर ।

## ☐ अंतरिक्षासंबंधी कायदा

हेग येथील आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे न्यायाधीश आणि पोलंडचे विख्यात कायदे-पंडित डॉ. मॅन्फ्रेड लॅक्स हे "अंतरिक्षासंबंधी कायदा" या विषयावर व्याख्याने देण्यासाठी दिल्लीला आले आहेत. जमिनीवरच धडपडणाऱ्या देशांना या विषयाशी काय कर्तव्य आहे, या प्रश्नाचे उत्तर म्हणून त्यांनी काही उद्बोधक माहिती दिली. गेल्या वर्षी त्यांच्या मदतीने यूनोचा एक करार घडविण्यात आला, त्या करारान्वये तांत्रिक क्षेत्रात प्रगत असलेल्या देशांना अंतरिक्षावर आपली हुकुमशाही स्थापन करता येणार नाही, उलट त्यांच्या अंतरिक्ष-प्रवासाच्या अनुभवाचा फायदा इतर राष्ट्रांना मिळू शकेल. ज्या देशांनी अजून अंतरिक्ष-शर्यतीत भाग घेतलेला नाही ते अंतरिक्ष-युगातून वगळले जाता कामा नये. लवकरच व्हिएन्ना येथे एक आंतरराष्ट्रीय परिषद भरणार आहे तीत अंतरिक्ष-विहारी देश व इतर देश यांच्यांत अधिक निकटचे संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला जाईल. या परिषदेत अंतरिक्ष-प्रवासाची प्रगती व अंतरिक्ष-प्रवासाचे लाभ याबद्दलच्या माहितीची देवाण-घेवाण होईल. हवामानाचे भविष्य,दूरसंदेश-व्यवस्था इत्यादी अंतरिक्ष-प्रवासाचे लाभ इतर देशांना येव्हांना मिळू लागले आहेतच. अंतरिक्षाचा उपयोग शांततामय हेतूसाठीच व्हावा असा यूनोचा करार झाला असल्याने या बाबतीत आंतरराष्ट्रीय मतैक्य होण्याची आशा निर्माण झाली आहे. शंभर देशांच्या सह्या असलेल्या या करारात म्हटले आहे की सर्व 'खगोल' गैरलष्करी प्रदेश राहिले पाहिजेत, व ते कोण्या एका देशाचे नव्हेत तर अखिल मानव-जातीचे आहेत असे मानले गेले पाहिजे. या खगोलांचा शांततामय उपयोग नक्की काय करायचा हे करारात स्पष्टपणे नमूद करण्यात आले नसले तरी परस्परावलंबी हित-संबंधांमुळे हा करार पाळायला सगळेच देश तयार होतील. शिवाय अंतरिक्षातले जीवन अत्यंत कठीण असल्याने तेथे सह-जीवनाची अधिकच आवश्यकता आहे. अंतरिक्ष-जीवन धोक्याचे असल्यानेच अंतरिक्ष-संशोधनाच्या मागोमाग अंतरिक्षासंबंधी कायदा तयार करण्याचा प्रयत्न चालू आहे. समुद्रासंबंधी कायदा चारशे वर्षे झाली तरी अजून नक्की झाला नाही, तर अंतरिक्षासंबंधी गेल्या दहा वर्षांत दोन करार करण्यात आले आहेत.

आणखी काही नियमावर लॅक्स यांची मते :

'अणुमुक्त' प्रदेश : अणुशक्तीच्या भस्मासुराचे जागतिक मत दूर करण्यासाठी प्रथम निरनिराळ्या ठिकाणी 'अणुमुक्त प्रदेश' तयार करण्यात यावेत, म्हणज हळूहळू सबंध जगच अणुमुक्त प्रदेश होईल. ही कल्पना प्रत्यक्षात

ण्यासाठी अनुकूल अशी परिस्थिती सध्या नसली तरी कालांतराने ती सर्व देशांना पटल. आफ्रिका व दक्षिण अमेरिका या दोन प्रदेशांत ही कल्पना विशेष पसरली आहे.

आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे कार्य : आंतरराष्ट्रीय न्यायालयाने कित्येक खटल्यांत 'इतिहास' घडविला आहे. जागतिक क्षेत्रात याहून अधिक कार्य करणे न्यायालयाला शक्य आहे. पण त्यासाठी जगातल्या देशांना या न्यायालयाचा विश्वास वाटायला हवा. सर्व देशांनी अधिक व्यापक असा आंतरराष्ट्रीय दृष्टिकोण स्वीकारला पाहिजे. दुसऱ्या जागतिक महायुद्धाच्या काळापासून आंतरराष्ट्रीय न्यायालयाने "राजकारणाने बजबजलेल्या" वातावरणात आपले काम केले आहे. तरीदेखील युद्धोत्तर काळात या न्यायालयाने दिलेले निवाडे बहुतेक सर्वांनी मान्य केले आहेत. चाळीस-पन्नास देशांपैकी एखाद्याच देशाने न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यास नकार दिला आहे.

पोलंडची न्यायव्यवस्था : पोलंडच्या न्यायव्यवस्थेत सध्या सुधारणा घडवून आणण्यात येत आहे. दीडशे वर्षांच्या फाळणीनंतर पोलंड आता एकसंध झाला आहे. त्या काळी देशात मात्र निरनिराळ्या न्याय-पद्धती अस्तित्वात होत्या. गेल्या वीस वर्षांत त्यांचे एकीकरण करण्याचा प्रयत्न झाला आहे. पारंपरिक पद्धत व समाजवादी अर्थव्यवस्था यांच्या समन्वयावर आधारलेला नवीन मुलकी कायदा गेल्या वर्षी तयार करण्यात आला. आता फौजदारी कायदा करण्याचे कार्य एका विशेष समितीतर्फे चालू आहे.

●

## "ॲनिस्थेसिऑलॉजी"

भारतात ॲनिस्थेटिस्ट तज्ञांचा तुटवडा आहे, तो भरून काढायचा असेल तर भारत-सरकारने "ॲनिस्थेसिऑलॉजी" या निराळ्या विषयाला मान्यता दिली पाहिजे, असे मत लंडन येथील तज्ज्ञ व ॲनिस्थेसिऑलॉजिस्ट तज्ञांच्या जागतिक संघटनेचे अध्यक्ष डॉ. जॉफ्रे ऑगन यांनी परवा दिल्लीत प्रकट केले. भारतात फक्त ६०० ॲनिस्थेटिस्ट आहेत. तज्ज्ञांच्या तुटवड्याच्या जोडीला कृत्रिम फुफ्फुसे व 'बायोकेमिकल' उपकरणे यांचाही तुटवडा आहे. देशातल्या एकूण ९० मेडिकल कॉलेजांसाठी आणखी कमीत कमी २००० ॲनिस्थेटिस्ट तज्ञांची आवश्यकता आहे. तरीदेखील भारतातली ॲनिस्थेसिऑलॉजी वरच्या दर्जाची आहे.

# जांभळी टाकवडे



आप्पासाहेब पाटील

दोन गावांतील गावकरी एक ठराव करून रेशनची धान्याची कार्डे सरकारला साभार परत करणार आहेत आणि सांगणार आहेत की, 'अन्नधान्यांत स्वावलंबी बनणारे व ते कृतीने सिद्ध करणारे महाराष्ट्रातील किंबहुना भारतातील आमचे हे गाव पहिले आहे. देशाचा अन्नधान्याचा गंभीर प्रश्न सोडविण्यासाठी एक अल्पसा उपक्रम आमच्या गावाने एकीने व निर्धाराने पूर्ण केला.

कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ तालुक्यातील जांभळी-टाकवडे गावांनी, सहकारी पाणीपुरवठा योजनेच्या द्वारा स्वयंपूर्णतेचा उपक्रम यशस्वी करून एक आदर्श घालून दिला आहे. अन्नधान्यात स्वावलंबन आले म्हणून रेशनकर्डे परत करू पाहणारी हीच ती गावे होत.

**अन्न स्वावलंबनाचा एक यशस्वी प्रयोग**

जवळून नदी पाण्याने भरून वाहते आहे, पण काठावरील पीक पाण्याअभावी वाळून जाते ही पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेली परिस्थिती बदलण्याचा प्रयोग जांभळे-टाकवडे गावांनी करून एक नवा उपक्रम यशस्वी केला. तीनचार वर्षांपूर्वी



**मक्याचे भरघोस पीक**

या उपक्रमाच्या पूर्वतयारीच्या वेळी गावातील म्हातारी माणसे म्हणत, " चार मैलांवरचे पंचगंगा नदीचे पाणी गावाच्या जमिनीत येणार होय ? काय खूळ लागलंय या पोरांना ?" पण अन्नस्वावलंबनाच्या ध्येयाने वेडा झालेला असा तरुण त्याच गावात निघाला आणि वेडाने झपाटल्याप्रमाणे त्याने अशक्य गोष्ट शक्य करून दाखविली. त्या भागातील सहकारी क्षेत्रातील नेते श्री. आप्पासाहेब ऊर्फ सा. रे. पाटील यांनी आज ही अपूर्व गोष्ट प्रत्यक्षात उतरविली असून कोरडया जमिनीचे बागायतीत रूपांतर करून खेडे स्वयंपूर्ण बनविण्याची वाटचाल चालविली आहे.

यापूर्वी जांभळी-टाकवडयाचा परिसर उजाड माळ वाटायचा. कष्ट करून शेती केली तरी त्यांत पोट भरेना म्हणून गावातील माणसे शेजारच्या इचलकरंजी गावाच्या गिरण्या-कारखान्यांतून रोजंदारीवर कामाला जात. निकृष्ट शेतीमुळे मूळचा शेतकरी कामगार बनला होता. शेती सोडून गावातील माणसांचा शेजारच्या शहराकडे ओघ लागल्याने शेती अधिकच निकृष्ट बनू लागली होती. पण सहकारी

## जयसिंग शिंदे

पाणीपुरवठा योजना कार्यवाहीत आल्यानंतर ही परिस्थिती पालटली. खेड्यांचा तोंडावळा बदलला. ज्या माळ जमिनीस जनावरेदेखील तोंड लावणार नाहीत अशी कुसळे उगवत नव्हती तेथे आता बाजरी, मका, ज्वारी, ऊस, भात यांचे पाण्यावर पोसलेले हिरवेगार पीक डोलते आहे. दाण्यांनी भरलेल्या कणसांच्या माराने धाटे वाकली आहेत. भाताच्या व गव्हाच्या लोंब्या दृष्ट लागाव्या अशा भरल्या आहेत. सरासरी सहा फूट येणारा ऊस बारा फूट उंच वाढला आहे.

पंचगंगा नदीच्या काठावर बांधलेल्या व प्रचंड अश्वशक्तीच्या विजेरी मोटारी बसवलेल्या जॅकवेलमधून शेतांत ठिकठिकाणी उभारलेल्या तीन यांत्रिक चेंबरद्वारा ६४।। हजार फूट लांबीच्या २४ इंची सिमेंटच्या मोठाल्या नळांमधून ९०० एकर शेतजमिनींत पाटातून पाणी खेळविण्यात आले आहे. या ९०० एकरांत ४३० शेतकऱ्यांची जमीन समाविष्ट असून बहुसंख्य शेतकरी १५–२० गुंठ्यांपासून ३–४ एकरांचे छोटे जमीनमालक आहेत. या जांभळी-टाकवडे सहकारी पाणीपुरवठा योजनेचा एकूण खर्च पावणेअकरा लाख रुपये असून त्यांतील ४३० शेतकरी सभासदांचे २ लाख ३० हजार रुपये भाग-भांडवल आहे. बाकीचे पंधरा वर्षांत परतफेड करावयाचे सरकारी कर्ज व एकचतुर्थांश सरकारी मदत आहे. १९६६–६७ सालांत ६८० एकरांत ऊस, भात, खपली, संकरित मका व बाजरी, हरबरा, भाजीपाला असे पीक घेण्यात आले असून उत्पादन सुमारे १२ लाख रु. किमतीचे ८३००० हजार क्विंटल झाले. कोरडवाहू जमिनीचे बागायतींत रूपांतर झाल्यानंतर शेतीमालाच्या उत्पादनात सरासरी ६ ते ७ पटीने वाढ झाली. यंदा पाऊस चांगला झाल्याने याहून कितीतरी अधिक वाढ आहे. ज्या माळजमिनीत पूर्वी एकरी ५० ते ६० रुपयेही उत्पन्न होत नव्हते तेथे आता पाटातून पाणी फिरू लागल्याने बाजरी, मका अशासारख्या पिकांचे खर्चवजा एकरी १।। ते २।। हजार रुपये उत्पन्न होत आहे.

शिरोळ तालुक्यात गेली १५–२० वर्षे सहकारी क्षेत्रात कार्य करीत असलेले श्री. आप्पासाहेब ऊर्फ सा. रे. पाटील हे या पाणीपुरवठा संस्थेचे अध्यक्ष असून आपल्या इतर सहकाऱ्यांच्या साहाय्याने त्यांनी गावाचा अल्पावधीत कायापालट साधला आहे. नॅशनल सीड फार्म कॉर्पोरेशनने मंजूर केलेले जिल्ह्यातील एकमेव ३०० एकरांचे सीडफार्म याच परिसरात असून बाजरी, मका, ज्वारीच्या बियाणांचा प्रयोग यशस्वी ठरला आहे. हे संकरित सुधारलेले बियाणे देशाच्या निरनिराळ्या भागांत पुरविण्यात येते. डेअरी, कोंबडीपालन व शेती सहकारी संस्थेने जांभळी गावातील हरिजनांची २० एकर जमीन खंडाने केली असून त्यांत बारा फूट उंचीचा ऊस आला आहे. एकरी १० हजार रुपये उत्पादनाचा विक्रमही झाला आहे. प्रत्येकी चार पाच गुंठे हरिजनांच्या या जमिनीत त्यांना एकरी ५० रु. खंडही पूर्वी मिळत नव्हता पण आता एकरी ५०० रु. उत्पन्न देऊन शिवाय हरिजनांना शेतीत रोज-

गार पुरवून त्यांच्या फायद्याबरोबर संस्थेला उत्पन्नाची एक बाब केली.

सहकारी संस्थेतर्फे केवळ पाणीपुरवठाच नव्हे तर सुधारलेले बियाणे, जंतुनाशके, खते व तांत्रिक सल्ला यांचीही तरतूद करण्यात आल्याने उत्पादनवाढीला साहाय्य होत आहे. पंचगंगा नदी बारमाही असल्याने शेतकऱ्यांना सर्वच हंगामांत पिके घेता येऊ लागली. उत्पादनात भरीव वाढ होऊ लागल्याने शेतकऱ्यांतील कर्जबाजारीपणा नाहीसा होईलच पण किफायतशीर धंदा म्हणून तो आता शेतीत अधिक रस घेऊ लागला आहे. शेतीतील या आर्थिक क्रांतीमुळे सामाजिक बदलही जाणवतो. पूर्वीच्या जिराईत निकृष्ट शेतीमुळे जवळच्या गावी गिरणीत कामाला जाणारा शेतकरी आज बारा तास आपल्या शेतकामात गुंतला आहे. शेतमजुरांनाही—पुरुषांना २॥ – ३ रु. व बायकांना १॥ – १।।। रु. अशी चांगली मजुरी मिळू लागली आहे. उसाच्या हंगामात तर तोडणी, वाहतूक व गुऱ्हाळावर चांगली मजुरी मिळते. आता रोजंदारीसाठी शहराकडे धाव घेणारा गावातील लोंढा थांबला आहे.

अशा परिस्थितीत गावाचे दारिद्र्य नाहीसे होऊन गावातील लोकांना पोटभर अन्न मिळू लागले. गाव अन्नधान्यात स्वयंपूर्ण झाला आणि लाचारी व लाजिरवाणे जिणे संपले. आज ताठ मानेने हा गावकरी उभा आहे.

याखेरीज शिरोळ तालुका सहकारी खरेदी-विक्री संघ व डेअरी, कोंबडीपालन, शेती सहकारी सोसायटी अशा संस्थांच्या द्वारा शेतकऱ्यांच्या जीवनात बदल घडविण्याचे कार्य चालू आहे. जांभळी-टाकवडे पाणीपुरवठा योजनेच्या यशाने स्फूर्ती घेऊन याच भागातील आणखी काही गावांतील एकूण सुमारे ७५ लाख रुपयांच्या, ७-८ हजार एकर जमीन पाण्याखाली भिजविणाऱ्या आणखी १०-१२ सहकारी पाणीपुरवठा संस्था श्री. आप्पासाहेब पाटलांच्याच पुढाकाराने कार्यान्वित होत आहेत. त्यांच्या पूर्तीनंतर या गावाचे स्वरूपही पालटलेले आढळेल.

जांभळी-टाकवडे पाणीपुरवठा योजनेमुळे केवळ शेतकऱ्यांच्या जीवनात बदलच नव्हे तर समृद्धीही कशी आली, याचे प्रतीक म्हणजे या सहकारी संस्थेच्या भागधारक शेतकऱ्यांनी देणग्या देऊन आधुनिक सोयींनी सुसज्ज असे सुमारे पाऊण लाख रुपये किंमतीचे 'अतिथिगृह' (बंगला) शेतात बांधले असून त्यात टेलिफोन, रेफ्रिजरेटर, रेडिओग्रॅम, विजेचे पंखे व अद्यावत फर्निचर ठेवण्यात आले आहे. सहकारी पाणीपुरवठा संस्थेने शेतात बांधलेले महाराष्ट्रातील असे हे पहिलेच अतिथिगृह मानण्यात येते. बाहेरच्या पाहुण्यांकरिता ते असले, तरी गावच्या शेतकऱ्यांनाही शहरातील अद्यावत सुखसोयींची त्यात प्रचिती येईल.

सरकारी कर्ज व मदत आणि शेतकऱ्यांचा थोडा पैसा यांवर उभारलेल्या सहकारी योजना श्री. आप्पासाहेब पाटलांच्यासारख्या जिद्दीच्या कार्यकर्त्यांनी तळमळीने पार पाडल्या, तर इतर काही खेड्यांचे सुद्धा जांभळी-टाकवड्यासारख्या स्वावलंबी व समृद्ध खेड्यांत रूपांतर होणे कठीण नाही. ○

# रंगवाणी

गेल्या कित्येक रात्री मुंबईत उत्सवाच्या चालल्या आहेत. उत्सवी प्रवृत्ती ही एकंदरीने सुखासीनतेची आणि स्वास्थ्याची निदर्शक मानली तर मराठी रंगभूमीच्या राज्यात आबादीआबाद आहे असा अत्यंत चुकीचा निष्कर्ष एखादा अर्थमंत्री काढ शकेल आणि कुणी सांगावे, नव्याने करमणूककर देखील बसवू शकेल. मात्र समज हा अर्थमंत्री एखाद्या हरुन अल् रशीदसारखा वेषांतर करून एखाद्या ठेकेदाराच्या वेषात नाटयोत्सवाच्या भोवती घोटाळेल अथवा अंतरंगात डोकावेल तर कर बसविणे राहोच पण दोन्ही कर उभारोन (विद्याधर गोखले आणि पुरुषोत्तम दारव्हेकर कोटीबद्दल माफ करा ! ) या नाटकवाल्यांसाठी परमेश्वराची – निदानपक्षी पंतप्रधानांची – करुणाच भाकेल. कारण हे सर्व उत्सव रंगले ते रंगमंचावर. प्रेक्षागृहात कित्येकदा प्रेक्षक विरळ आणि रंगमंचामागे न जमणारी आर्थिक गणिते नित्याप्रमाणे भरपूर होती. नाटकवाल्या कलावंतांचा मुळी पिंडच नादी आणि स्वप्नाळू. मागच्या काळज्या आणि पुढच्या रित्या खुर्च्या विसरून बेटे जीव ओतून, निदान थकला

## स र का री आं ध ळी को शिं बी र

भागला जीव एकवटून नाटके करतात, प्रसंगी वैभवशाली नेपथ्य वगैरे शान सांभाळून ! परिस्थितीला हार न जाणे हा मराठी माणसाचा पिंड आहे की नाही कोण जाणे, पण आमच्या मराठी नाटकवाल्यांचा नक्कीच आहे. भूकंप होवोत, थंडीची लाट येवो, कुणाकुणाचे आकस्मिक मृत्यू घडोत, बसेस – टॅक्सीज बंद पडोत, काही झाले तरी नाटके ही झालीच पाहिजेत, उत्सव गाजलेच पाहिजेत – प्रेक्षकांची नसली तरी ही नाटकवाल्यांची जिद्द असते.

गेल्या दोन-अडीच महिन्यांत मुंबईत ललितकलादर्श, नाटयनिकेतन, सौ. जयमाला शिलेदार-सत्कार-समिती आणि सरकारी नाटयस्पर्धा असे एकूण चार उत्सव एकापाठोपाठ आणि एकात एक झाले. अजून किमान एक उत्सव बाकी आहे तो 'वर्कली ' नाटयोत्सव ! वर्कली सिगरेट कंपनी आपल्या सिगरेटी ओढणाऱ्या नटांना (आणि नटींनाही ? ) एकत्र करून म्हणे हा उत्सव आधीच्या उत्सवाच्याच दणक्यात अधिक दणकेबाज गाजावाजानिशी करणार आहे !

## 'नाटचनिकेतन'चा उत्सव

ललितकलादर्शच्या उत्सवाविषयी यापूर्वी बरेच येऊन गेले आहे. 'नाटचनिकेतन'च्या कलावंतांनी आपला नाटचोत्सव संस्थेचे प्रवर्तक श्री. मो. ग. रांगणेकर यांच्या षष्टयब्दपूर्तिनिमित्ताने केला. यात नव्या दमाच्या 'विच्छा माझी पुरी करा' आणि 'कटचार काळजात घुसली'च्या बरोबरीने 'कुलवधू', 'वहिनी' आणि 'मटाला दिली ओसरी' पुष्कळ वर्षांनी रंगमंचावर उतरली. ते पूर्वीचे मास्टर अविनाश, रामचंद्र वर्दे, नाना जोगळेकर, श्रीपाद जोशी, वासुदेवराव दाते, अरुण सरनाईक पुन्हा त्या जुन्या भूमिकांचे वेष चढवून नव्या उमेदीनी रंगभूमीवर 'एंट्र्या' घते झाले. प्रभाकर पणशीकर पुन्हा जणू ऐन उमेदीतले तरुण बनून नाटचनिकेतन आणि 'मटाला दिली ओसरी'मध्ये दाखल झाले. जोडीला कुसुम कुलकर्णी, विमल घैसास, शांताबाई बेडेकर आल्या आणि अर्थात 'कुलवधू' ज्योत्स्नाबाई भोळेही होत्याच. 'नाटचनिकेतन'च्या प्रारंभकाळातली छोटी बच्ची उषा-किरण मलतीच भारदस्त वहिनी म्हणून उभी राहिली. ते चुटचुटीत संवाद, ती आल्हाददायक द्वंद्वगीते, ते महायुद्धकालीन पांढऱ्यापेशा समाजातले गुलगुलीत कौटुंबिक वातावरण, ती त्यातली पेल्यातील सांसारिक वादळे आणि त्यांचे शेवटी हुकमी निराकरण अथवा ते होऊ शकत नसल्यास एक फारसा त्रासदायक न होणारा माफक शोकात्म शेवट इत्यादी वैशिष्टयांनी उपस्थित प्रेक्षकांची घडयाळे काही वेळा चांगली वीसपंचवीस वर्षांनी मागे गेली. शेवटच्या दिवशी मो. ग. रांगणेकरांचा सत्कार सदाशिव अनंत शुक्ल यांच्या निधनवार्तेच्या शोकात्म छायेत पार पडला. नव्या नाटचसंमेलनाध्यक्षांचा सत्कार आणि त्याच दिवशी मावळत्या नाटचसंमेलनाध्यक्षांचा हा असा अस्त ! सर्वश्रेष्ठ असा नाटककारांचा नाटककार अखेर 'वर' बसला आहे हे असे नको तेव्हा प्रकर्षाने जाणवले; तरीही सत्कार यथासांग झाला.

सौ. जयमाला शिलेदार यांच्या नाटच-कारकीर्दीची पंचवीस वर्षे साजरी करणारा नाटचोत्सव, हा मजकूर लिहीत असता मुंबईत, जॉर्ज फर्नांडिस यांच्या 'मुंबई बंद'च्या क्रमशः रंगू बघणाऱ्या राजकीय 'उत्सवा' बरोबरीने चालू आहे.

तथापि या वेळी जरा तपशीलाने लिहिणार आहे ते सरकारी नाटचस्पर्धांच्या

— — — — — — —

**विजय तेंडुलकर**

— — — — — — —

उत्सवाबद्दल. हा लांबलचक उत्सव संपून आता त्याचे कवित्व सालाबादप्रमाणे मागे राहिले आहे आणि ते वृत्तपत्रांमधील जनमनाच्या विविध कानोशांतून जवळ-जवळ रोज गाजत आहे. ‘अन्याय’, ‘पक्षपात’ इत्यादी परवलीचे असंतोष-प्रदर्शक शब्द आणि शब्दप्रयोग—सालाबादप्रमाणेच—या कवित्वात वरच्या खालच्या पट्टीत सवंगपणे वापरले जात आहेत. हे कवित्व यथाकाल संपेल आणि समस्त हौशी नाटकवाले झाले गेले विसरून आणि मिळालेले इरेस घालून पुन्हा एकवार पुढल्या सरकारी नाटचस्पर्धांसाठी हळूहळू कमरा कसतील – हेही सर्व सालाबाद-प्रमाणेच घडणार आहे. (‘नेमेचि येतो मग पावसाळा’ या काव्यपंक्तीतील अर्थ अशा वेळी खरा पटतो !)

कवित्व त्याच्या परीने मनोरंजक असले तरी उत्सवदेखील कमी प्रतीचा नव्हता. स्पर्धेच्या दोन फेऱ्यांत मिळून महाराष्ट्राच्या अनेक भागांतून अगणित नाटके बसली आणि अहमहमिकेने झाली. कितीतरी अनामिकांतले सुप्त नाटचगुण या नाटच-प्रयोगांतून प्रकट झाले आणि परीक्षकाची खुर्ची अडवलेल्या काही नामवंतांचे पितळ उघडे पडले. नवी नाटके, नवे दिग्दर्शक, नवे नट–नटी, नवे तंत्रज्ञ यांचा एक मोठा बहरच—काही वासाचा, काही बिनवासाचा—या स्पर्धेने यंदाही पुढे मांडला. आस्वाद घेण्यासाठी रसिक सहकुटुंब सहपरिवार धावले. रात्रींमागून रात्री, प्रसंगी थंडी-वाऱ्यात कुडकुडत प्रेक्षक मंडळी नाटकवाल्यांइतक्याच जिद्दीने आणि हौसेने या स्पर्धां-मध्ये आपला वाटा उचलीत राहिली. परीक्षक कंटाळले, क्वचित पेंगले आणि कोणी सबळ कारणाने, पूर्वसूचना देऊन, पण एखाद दुसरी दांडीदेखील मारली परंतु प्रेक्षक हटले नाहीत. प्रसंगी एखाद्या न रंगणाऱ्या बिकट नाटचप्रयोगात प्रेक्षकांनी आपला वैताग सामुदायिकरीत्या सशब्द केला (आणि नाटकवाल्यांनी विंगेतल्या दूरध्वनिक्षेपकातून त्यांना तितकेच गरमागरम उत्तर दिले !) पण प्रेक्षकमंडळीने निरुत्साह म्हणून दाखवला नाही. या अर्थाने या स्पर्धा यशस्वी म्हणण्याशिवाय गत्यंतरच नाही.

तथापि केवळ एक उत्साहयुक्त वार्षिकोत्सव यापलीकडे या स्पर्धांचा हेतू आणि परिणामदेखील असल्याने त्यांचा जरा विस्ताराने विचार होणे जरूर आहे.

पहिल्या फेरीतील केंद्रा-केंद्रावर झालेल्या सर्रास नाटचप्रयोगांपैकी वेचीव प्रयोग अंतिम फेरीसाठी निवडण्यात आले होते असे आपण (गळलेला एखादा ठळक अप-वाद समजूतदारपणे वगळून) समजू या. या अठरा वेचीव प्रयोगांत एकही नाटक किर्लोस्कर–देवल–खाडिलकर–गडकरी–वरेरकर–अत्रे या ज्येष्ठ नाटककारांचे नव्हते. फेरीत ‘दाखल’ असलेले त्यांतल्या त्यांत ज्येष्ठ नाटककार म्हणजे मो. ग. रांगणेकर. म्हणजे दुसऱ्या महायुद्धाच्या काळापासून पुढली नाटकेच या अंतिम फेरीत दिसली. हा कदाचित योगायोगच असेल पण तरीही या स्पर्धेने रंगभूमीच्या दिव्य भूतकाळा-पासून फटकून, नवी वाटा-वळणे काढू पाहणारी युद्धोत्तरकालीन धडपडती रंगभूमी आपल्यात सामावून घेतली आहे, असे म्हणता येईल.

'गौरव चित्र' : प्रथम पुष्प

# " घरची राणी "

पटकथा–संवाद : भालजी पेंढारकर

दिग्दर्शक–राजदत्त  संगीत–दत्ता डावजेकर

कला–पांडुरंग हावळ  छाया–दत्ता गोर्ले

*भूमिका*

अनुपमा – सुधीर कुमार – पद्माकर – अप्पासाहेब जाधव – राजेशकुमार

इंदू – इनामदार आणि सुलोचना

*लवकरच येत आहे.*

प्रवाहात वाहत येणाऱ्या ओंडक्याप्रमाणं, माणसं एकत्र येतात.... काही काल एकत्र प्रवास करतात ....आणि.... पुन्हा वेगळी होतात !

हे आपोआप घडतं, का कोण घडवतं ? नक्की उत्तर नाही........

पण असं घडलं खरं !

" गायत्री चित्र "

**भालजी पेंढारकर बोलपट**

# " तांबडी माती "

## नवी नाटके

आता या युद्धोत्तर-कालीन रंगभूमीचे जे दर्शन या स्पर्धेच्या अंतिम फेरीत घडले ते बव्हंशी प्रातिनिधिक होते, असे मानून त्याचा विचार करू.

नवी 'नाटके' म्हणून या संपूर्ण स्पर्धेत लक्षात राहिली ती प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक असोसिएशनने सादर केलेले व्यंकटेश माडगूळकर यांचे 'सती', रत्नाकर मतकरी यांनी अनुवाद केलेले आणि उदय कला केंद्राने सादर केलेले 'ट्वेल्व्ह अँग्री मेन' या नाटकाचे मराठी रूप 'निखारे' आणि काही अंशी श्री. ना. पेंडसे यांचे, बेस्ट कला व क्रीडा मंडळाने सादर केलेले 'संभूसांच्या चाळीत' एवढीच. भक्कम विषय, फापटपसाऱ्याविना सपासप होणारा नाट्यवस्तूंचा विकास आणि भिन्नभिन्न रेखीव, वेधक व्यक्तिरेखा ही 'निखारे'ची 'नाटक' म्हणून वैशिष्टचे होती तर विषय भक्कम आणि हाताळणी संथ गतीची, पण सरधोपट सच्ची, असे 'सती'चे वर्णन करता येईल. 'संभूसांच्या चाळीत' तुलनेने विषयात कमी मातबर आणि हाताळणीतही फारसे बांधेसूद नव्हते. तरीही त्याच्या पहिल्या दोन अंकांत परिपक्व लेखणीची जाणीव देणाऱ्या काही जागा होत्याच. यंदाच्या अंतिम स्पर्धेने नाट्य-साहित्यात घातलेली ही मोजकीच मौलिक भर.

एवढी तीन नाटके वगळल्यास बाकी नव्या नाटकांचे रूप मूलत: वा मारून मुट-कून पण तंत्रप्रधान राहिले. बाबा डिकेलिखित आणि 'नाट्यभारती' निर्मित 'रायकरवाडी' आणि अहमदनगर महाविद्यालयाचे प्रा. तोडरमल लिखित 'सैनिक नावाचा माणूस' ही अशी तंत्र बाहेर डोकावणारी दोन बरी नाटके. परंतु यात काही ना काही नाटक तरी होते. 'आसक्ती कसली मजला' (नाट्यमन्वन्तर, ठाणे) 'ही चौकट वाटोळी' (महाराष्ट्रीय कलोपासक, पुणे) 'खेळ दो जिवांचा' (ललित-कला–साधना, मुंबई) या नाट्यप्रयोगांत तंत्र वजा जाता फारसे काही राहिले नसते एवढे तंत्राने ते प्रयोग झपाटून गेले होते. बेळगावच्या वरेरकर नाट्य-संघाचा रण-जित देसाई लिखित 'वारसा' हाही नाटकापेक्षा आगीच्या प्रत्ययकारी दृश्यानेच प्रेक्षक-समीक्षकांच्या लक्षात राहिलेला एक नाट्यप्रयोग. 'ही चौकट वाटोळी'चे नेपथ्य पारितोषिकपात्र ठरले तर 'खेळ दो जिवांचा' मधील प्रकाशयोजनेला परी-क्षकांनी पारितोषिकाची दाद दिली. 'सती'सारख्या मुळात अस्सल नाटकाच्या प्रयोगालाही दिमाखदार नेपथ्य आणि तंत्राच्या हव्यासाची बाधा झालेली दिसली आणि 'संभूसांच्या चाळीत' नाटकापेक्षा त्याच्या नेपथ्याचा आणि वातावरण-निर्मितीचा बोलबाला अधिक ऐकू आला.

## 'काका किशाचा' सांघिक यश

एवंच तंत्राला–अतिरेकी होऊ पाहणाऱ्या अथवा झालेल्या तंत्राला-या स्पर्धेच्या कक्षेत प्राधान्य आलेले दिसले. तुलनेने, अभिनयगुण असेच झळाळून उठल्याचे एखाद्या नाट्यप्रयोगात दिसले नाही. वैयक्तिक अभिनयाची चमक अनेकदा जाण-



'निखारे' एक प्रसंग

वली, संघवृत्तीही बहुतेक नाट्यप्रयोगांतून नजरेत भरत होती, परंतु अनेक पात्रांत एकाच प्रयोगाच्या कक्षेत होऊ शकणारी अभिनयाची बहारदार जुगलबंदी एकाही नव्या नाटकाच्या प्रयोगात दिसू शकली नाही. स्पर्धेसाठी लिहिल्या गेलेल्या नाटकांची आणि त्यांच्या प्रयोगांची ही हकीकत. तुलनेने जरा जुन्या नाटकांपैकी 'मटाला दिली ओसरी', 'खून पाहावा करून', 'माणूस नावाचे बेट' यांच्या प्रयोगांत अशा अभिनय-स्पर्धेला वाव होता आणि त्यांपैकी पहिल्या व तिसऱ्या नाटकांच्या प्रयोगांत नटनटींनी त्याचा लाभ घेऊन तांत्रिक चमत्कारांवर मुळीही न विसंबता केवळ अहमहमिकेच्या अभिनयाने प्रयोगांना वरीच रंगत आणली. हे तीनही प्रयोग पारितोषिकाच्या आसपास फिरकू शकले नाहीत. यातच श्याम फडके लिखित 'काका किशाचा' या फार्सच्या प्रयोगाचा उल्लेख केला पाहिजे. नाट्यविषयाची वा तंत्राची कोणतीही मोठी झेप न घेता हे निखळ हास्यप्रधान नाटक आपल्या हास्यप्रधानतेवर आणि सांघिक अभिनयावर स्पर्धेतले एक पारितोषिक अनपेक्षितपणे घेऊन गेले. (आणि मातबर अतिगंभीर नाट्यकृतीचा 'निखारे' हा प्रयोग विनापारितोषिक स्पर्धेतून उडाला.)

## कैलास ते सिंधुसागर

अन्नधान्य स्वावलंबन
संचलनाचे कार्यक्रमाला

### जाई काजळाचे

उत्पादक, वितरक व
ग्राहक यांचे धन्यवाद




इंडिया केमिकल कंपनी. बोरिवली, मुंबई-९२.

## स्पर्धेसाठी !

या अंतिम फेरीतल्या नाट्यसंस्थांचा वार्षिक कार्यक्रम जाणून घेता एखाददुसरा अपवाद वगळून असे दिसेल की, केवळ या सरकारी स्पर्धेसाठीच यांचे नाटक वर्षातून एकदा बसते, वर्षातून एकाहून अधिक नाटके करणाऱ्या संस्थांचेही एक लक्ष्य या स्पर्धा हेच असते आणि त्या अनुषंगाने नाटकांची निवड, पात्रयोजना, प्रयोग अशा सर्व गोष्टींची योजना काळजीपूर्वक होते असे दिसून येईल. स्पर्धेच्या निर्णयांनंतर या संस्थांच्या वर्तुळात ज्या चर्चा आणि वाद चालतात ते ऐकल्यास या स्पर्धेला बिगर व्यावसायिक रंगभूमीच्या दृष्टीने आलेले फार मोठे महत्त्व लक्षात येईल. पारितोषिक-पात्र प्रयोग स्पर्धेनंतर तशी जाहिरात करून केले जातात तर पारितोषिकाला अपात्र ठरलेले प्रयोगही तेवढ्याच जिद्दीने 'परीक्षकांच्या पसंतीस न उतरलेले' अशी जाहिरात करून केले जातात ! हे दुसऱ्या श्रेणीतले प्रयोग सहसा फारसे होऊ शकत नाहीत कारण स्पर्धेतील अपयशाचा शिक्का त्यांवर प्रेक्षकांलेखी बसलेला असतो. पारितोषिक-पात्र प्रयोग मात्र काही वेळा त्या बिरुदावर थोडी फार गर्दी खेचण्याच्या गणिताने धंदेवाईक ठेकेदारदेखील स्वतःच्या जबाबदारीवर लावून पाहतात. म्हणजे बिगर व्यावसायिक रंगभूमीच्या दृष्टीने स्पर्धेच्या निर्णयांना फार मोठे महत्त्व आले आहे.

एकीकडे या स्पर्धांच्या निर्णयांविषयी, निर्णय घेणाऱ्या परीक्षकांविषयी, निर्णय घेण्याच्या पद्धतींविषयी दरसाल न चुकता असंतोष व्यक्त करीत बिगरव्यावसायिक किंवा हौशी रंगभूमी या स्पर्धांच्या सर्वस्वी आहारी गेली आहे असा याचा स्वच्छ अर्थ होतो. या स्पर्धांच्या कक्षेबाहेर आज महाराष्ट्रात स्वतंत्रपणे, स्वावलंबी अशी हौशी रंगभूमी अस्तित्वातच राहिलेली नाही. म्हणजे जे घोडे मुळीच भरंवशाचे नव्हे असे या रंगभूमीच्या पायिकांचे म्हणणे त्याच सरकारी स्पर्धेच्या घोड्यावर या रंगभूमीला त्यांनी चढविली आहे आणि याच घोड्याचे शेपूट आशेने धरून हे सारे नाट्यसेवेला निघाले आहेत, असे हे एकूण दृश्य आहे. या स्पर्धेचे निर्णय या रंगभूमीला कोणतेही वळण हुकमी लावू शकतात याचे प्रत्यंतर, गेल्या काही वर्षांत तांत्रिक करामतींच्या प्रयोगांना या स्पर्धेत मिळत आलेले यश आणि एकूण हौशी रंगभूमीचाच सध्या तंत्रप्रधान प्रयोगाकडे गेलेला तोल पाहिला तर मिळते. तंत्राच्या या हव्यासाने टाकाऊ नाटके मुक्त तांत्रिक करामतींना निमित्त म्हणून बसविली जातात, तांत्रिक युक्त्यांसाठीच जुजबी नाटके लिहिली जातात, चांगल्या नाटकांवर त्यांना पेलो, न पेलो, तांत्रिक क्लृप्त्यांचे जुलूम केले जातात; हे सारे स्पर्धेत काय यशस्वी होते या विचारापोटीच घडत आहे.

आणि या स्पर्धेतले निर्णय एकूण हौशी रंगभूमीच्या हिताच्याच निखळ हेतूने, डोळसपणे आणि बिनचूक घेतले जातात असे म्हणणे धाडसाचे ठरेल. कोणत्याही

स्पर्धेविषयी हेच म्हणता येईल; परंतु त्यातही या विशिष्ट स्पर्धेच्या बाबतीत तर केवळ तिच्या वाढत्या, अनावर व्यापामुळेच हे फार खरे आहे. प्राथमिक फेरीत सरासरी दहा नाटके प्रत्येक केंद्रावर धरली तरी या स्पर्धेच्या नऊ केंद्रांवर मिळून नव्वद तरी बरी-वाईट आणि भिकार नाटके होतात. या नऊ केंद्रांवर प्रत्येकी तीन असे एकूण सत्तावीस परीक्षक दर साल लागतात. हे वगळून अंतिम स्पर्धेतले पाच म्हणजे एकूण बत्तीस परीक्षक होतात. रात्रीमागून रात्री बरीवाईट आणि भिकार नाटके अभ्यासूपणे पाहण्याला आणि त्यावर अधिकाराने निर्णय घेण्याला या महाराष्ट्रात रंगभूमीशी जिव्हाळ्याने निगडीत अशी बत्तीस माणसे मिळणे ही अशक्यप्राय गोष्ट होय. जी कोणी एकदा उत्साहाने येतील ती पुन्हा येण्याची शक्यताही अल्पच. त्यात त्यांना मिळणारा सरकारी मेहनतानाही जेमतेम वाहनखर्च आणि विडीकाडीपुरता. या परिस्थितीत दर साल बत्तीस बरेवाईट कसेही पण परीक्षक पकडणे हेच स्पर्धेच्या सूत्रधारांना फार जिकिरीचे होत असले पाहिजे. मग यात एखाद्या वर्षी एका केंद्रावर मराठीतील एक ज्येष्ठ टीकाकार किंवा चित्रपटदिग्दर्शक परीक्षक असतात आणि दुसऱ्या एखाद्या केंद्रावर एखाद्या नाटयसंस्थेचा मामुली व्यवस्थापक किंवा एखाद्या अभिनेत्रीचा निव्वळ नाटयप्रेमी पती किंवा एखादी उत्साही महिलाच कोणाच्यातरी परिचयाने अगदी निष्पापपणे सोत्साह परीक्षक बनलेली असते. कधी एकाच केंद्रावर असे गंगाजमनी परीक्षक-मंडळ त्या केंद्रापुरते रंगभूमीच्या बऱ्यावाइटाचे अधिकार हाती घेऊन बसते. अशा परीक्षकांमध्ये परस्परसमजूत वा सामायिक असे निकष अपेक्षिणेच चूक ठरेल. मग निर्णय लागतात ते केवळ गुणांच्या बेरजांवर आणि स्पर्धकांच्या भवितव्याचा तात्पुरता निकाल हा असा अनुमानधपक्याने होऊन संपतो.


अशा निर्णयांवर आणि अशा स्पर्धेवर मराठी रंगभूमीचे एक महत्त्वाचे अंग आपल्या कलानिर्मितीचे भवितव्य भरंवशाने सर्वस्वी टांगून ठेवते ही परिस्थिती जितकी विनोदी तितकीच गंभीरही आहे. व्यावसायिकांची एकीकडे पोटामागे शर्यत चालू आहे तर या हौशी मंडळींची धपाप एका आंधळ्या कोशिंबिरीच्या स्पर्धेतल्या पारितोषिकाच्या भोज्ज्यासाठी होते आहे.

विशुद्ध कलानिर्मितीची, यशनिरपेक्ष नवनव्या कलात्मक प्रयोगांची, खऱ्या अर्थाने अव्वल आणि मातबर नाटकांची हक्काने अपेक्षा मग आता कोणाकडून बाळगावी ? का यासाठी आणखी एक वेगळी रंगभूमी अस्तित्वात येणार आहे ?

जाऊ द्या. हे झाले फार गंभीर विचार. मुंबईचा उत्साही प्रेक्षक पुन्हा एकवार नव्या 'उत्सवा'साठी जुना थकवा आणि वैताग झाडून एव्हाना सज्ज झालेला आहे. नाटकवाले तर तयारच आहेत. बर्कली कंपनी, होऊन जाऊ द्या !

O

# सुरवंटाचे फुलपांखरू....




## दि यशवंत को-ऑप. प्रोसेसर्स लि.


इचलकरंजी, जिल्हा कोल्हापूर

# मराठीचे माहेर जेव्हा हिऱ्यासम लखलखले!



पश्चिम घाटात त्र्यंबकेश्वरी उगम पावून पूर्वसागराकडे वाहत जाणारी गोदावरी नदी म्हणजे दख्खनच्या पठारावरील चैतन्याची शीर होय. आधुनिक युगाचा उदय होण्यापूर्वी दख्खन देशात जे काही विश्वात्मक महत्त्वाचे घडले ते गोदावरीच्या खोऱ्यात !

गोदावरीच्या प्रवाहात दख्खनच्या मानवी प्रतिभेचे नानाविध फुलोरे वाहिले आहेत. दख्खनच्या इतिहासा-




तील आगीचे डोंब आणि फुलांचे ताटवे, काट्यांचे फणे आणि दवबिंदूंचे तुषार गोदावरीच्या जीवनप्रवाहात वेळोवेळी खळखळले आहेत.

गोदावरीच्या खोऱ्यात—वेरुळ, देवगिरी, राजतडाग ( औरंगाबाद ) आणि पैठण या चतुष्कोशीत एक वेळ भारताच्या राजकीय व सांस्कृतिक जीवनांचा गुरुत्वबिंदू फिरला आहे. भारतीय इतिहासातील अनेक चळवळींच्या लाटा येथूनच पहिल्यांदा उसळल्या

प्रा. पंढरीनाथ रानडे

# आगमार्क छापाचाच माल का घ्यावा ?

आगमार्क छाप (किंवा लेबल) ही त्या मालाच्या शुद्धतेची व चांगल्या खूण होय. सरकारी खुणेचा हा छाप-लेबल काही शेतमालांसाठी व तूप, मध अंडी ह्यासारख्या अन्य वस्तूंसाठी, त्यांची शास्त्रीय तपासणी करून ला येते ● तुम्ही आगमार्क छापाचा माल विकत घेता तेव्हा तुम्हांला प्र लावलेला खात्रीचा माल मिळतो. विक्रीसाठी त्याचे पॅकिंग वगैरेही कटा शास्त्रीय कसोटीने केलेले असते.



आगमार्क—
म्हणजेच
मालाच्या दर्जाची
खात्री

आहेत, दुसरीकडे उसळलेल्या काही लाटा येथे येऊन परतल्या आहेत; तर काही लाटांचा येथे चुराडा झाला आहे. देवगिरी-परिसराचा ऐतिहासिक डौल असा काही आगळा आहे !

सातवाहन, वाकाटक, चालुक्य, राष्ट्रकूट, यादव आणि बहामनी या शिवपूर्वकालीन राजवटीत महाराष्ट्राच्या राजकीय व सांस्कृतिक जीवनांत घडलेल्या घालमेलींचे घाट देवगिरीच्या पंचक्रोशीत रचले गेले.

औरंगाबादचे मध्ययुगीन नाव खडकी अथवा खिडकी असे होते तर सातवाहन काळात येथील गावठाणे राजतडाग या नावाने ओळखले जात होते. औरंगाबादचे खिडकी हे मध्ययुगीन नाव मोठे अर्थपूर्ण आहे. उत्तर हिंदुस्थानात दिल्ली ही जशी भारताची देहली म्हणजे उंबरठा तशी औरंगाबाद ऊर्फ खडकी म्हणजे दक्षिणापथाची खिडकी होती. उत्तर भारतातून दक्षिणेत येणाऱ्या सर्व पांथस्थांना या खिडकीच्या वाटेनेच दक्षिणेत उतरावे लागे. सेनानी, व्यापारी, धर्मप्रसारक, तत्त्वज्ञ आणि कलावंत यांपैकी कुणालाही उत्तरेतून दक्षिणेत किंवा दक्षिणेतून उत्तरेत जायचे झाल्यास देवगिरीपासून एका हाकेवर असलेल्या राजतडाग–खिडकी–औरंगाबाद या नगराच्या महाद्वारातून यावे-जावे लागे.


## गोदेची पहाट

**सच्चं भग गोदावरी पुव्वसमुद्देण साहि आसन्ती**
**सालाहण कुलसरिसं जह ते कूले कुलं अत्थि।**

"खरं सांग बघू गोदावरी ! उगमापासून पूर्व समुद्राला मिळेपर्यंत तुझ्या प्रवासात सातवाहन कुलाइतके एक तरी श्रेष्ठ कुल तू बघितले आहेस का ?"

एका प्राकृत कवीने गोदावरीला विचारलेल्या या प्रश्नात सातवाहन राजकुलासंबंधी कौतुक आणि अभिमान यांचा जेवढा भाग आला आहे तेवढाच ऐतिहासिक तथ्याचाही आहे.

खिस्तपूर्व २२० ते खिस्तोत्तर २४० या प्रदीर्घ कालखंडात गोदावरीच्या काठी महानगर पैठण येथे सातवाहन राजकुलाची राजधानी असून सातवाहन राजघराण्याच्या सुमारे छत्तीस पिढ्यांनी दक्षिणापथाचा राज्यशकट हाकारला. जगाच्या राजकीय व सांस्कृतिक नकाशावर पहिल्या-वहिल्याने महाराष्ट्राला झळकवण्याची कामगिरी सातवाहन राजकुलाने बजावली. मराठी मनाची पहिली जडणघडण सातवाहन युगातच आकाराला आली. सातवाहन युग म्हणजे गोदावरीच्या




**अधिक धान्य व शेतीचे उत्पादन हीच आजची गरज! शेतकऱ्यांना या कार्यात सातत्याने मदत करणारे करजगार इंजिन्स**

**उभी इंजिन्स** २॥–३–५ हॉ. पॉ. ची
डिझेल इंजिन्स

**आडवी इंजिन्स** ६।७, ८।९, १०।११,
१२।१३ हॉ. पॉ. ची

**एम. के. इंजिन्स**

कोल्ड स्टार्ट, स्लो स्टार्ट
क्रूड ऑईल इंजिन्स
हजर टॉस्कमधून मिळतात




# एम. जी. करजगार इंजि. वर्क्स

**शिवाजी उद्यमनगर, कोल्हापूर.**

तार : Emkay

फोन : ४२५

काठावर उमललेल्या मराठी संस्कृतीची पहिली मंगल पहाट.

गोदावरीच्या काठी माणसाची वस्ती अदमासे दोन लाख वर्षांपासून आहे असे पुरातत्त्ववेत्ते सांगतात. पण ख्रिस्तपूर्व १० व्या–११ व्या शतकाच्या आधी गोदावरीच्या काठी अश्मयुगीन माणसाची वसती होती. ख्रिस्तपूर्व सहस्र वर्षांपूर्वी गोदावरीच्या काठी ताम्रपाषाणयुगीन माणसांची वर्दळ सुरू झाली. पुढे ख्रिस्तपूर्व सहाव्या शतकात लोहयुग अवतरले आणि गोदावरीच्या खोऱ्यातील मानवी जीवनाने कूस बदलली. लोखंडाच्या आगमनाने दक्षिणापथातील जीवनात मानवी कर्तृत्वाची नवी क्षितिजे फाकू लागली. गोदा, कृष्णा, वैनगंगा यांच्या कवेत शेतीची लागवड सुरू झाली. अपरांत आणि विदर्भ हे दोन भाग उत्तरेतील वैदिक भाषा बोलणाऱ्या आर्यांनी त्याआधीच व्यापून टाकले होते. परशुराम, अगस्ती आणि गौतम हे या वसाहती करणाऱ्या मोहिमांचे नेते होते. त्यांचा मागोवा घेत भोज, राष्ट्रिक, महाराष्ट्रिक, अंधक-वृष्णी या आर्य गणांनी वैनगंगा, गोदा, कृष्णा यांच्या काठी वसाहती वसविल्या.

ख्रि. पू. सहाव्या शतकापूर्वी दक्षिणापथात उतरलेल्या या आर्य गणांचे जीवन स्थिर नव्हते. पशुपालन, मृगया आणि कंद-मूल-फलसंग्रह हीच या गणांची उदरनिर्वाहाची साधने होती.

लोखंड आले आणि दक्षिणापंथातील अरण्ये कोसळू लागली आणि अरण्याखालील काळ्या जमिनीत अन्न-धान्याचे बी पडू लागले. नांगराला बैल जुंपला गेला आणि दख्खनच्या माणसाने आपल्या पायाला लागलेली भिंगरी भिरकावून दिली; गावे आणि नगरे वसू लागली. पैठण, कोल्हापूर, तेर, नेवासे, भोगवर्धन, सोपारा, कल्याण, नाशिक, कऱ्हाड, वैजयंती, कौंडिण्यपूर, भोजकट ही मराठमोळी नगरे दख्खनच्या नकाशावर झळकू लागली. उत्तरापथातून दक्षिणापथात आवक-जावक मोठ्या प्रमाणात सुरू झाली.

पश्चिम किनाऱ्यावरील भरुकच्छ, कल्याण आणि सोपारे ही या काळातील आंतरराष्ट्रीय कीर्तीची बंदरे होती. प्राचीन भारताचा बावेरू आणि इजिप्त या देशांशी आणि पुढील काळात रोमन साम्राज्याशी जो व्यापार चालत होता तो या

उत्कृष्ट आयडेंटिटी, पासपोर्ट व फॅमिलीग्रुप्स फोटोग्राफ्ससाठी

**साधना फोटो स्टूडिओ,**

**सोन्यामारुती चौक लक्ष्मीरोड, पुणे २.**

•

**नंदकिशोर फोटो स्टुडिओ,**

**डेक्कन जिमखाना चौक, पुणे ४.**

बंदरांतून. उत्तर आणि पूर्व भारताला दक्षिणापथाचे आकर्षण होते ते यासाठी. आणखीही एका कारणामुळे दक्षिणापथाने उत्तरापथाचे चित्त आपल्याकडे ओढून घेतले होते. सोने, हिरे आदी खनिज पदार्थांची उत्तर भारतात आयात व्हायची ती दक्षिणापथातून. मगध आणि कोसल यथून सार्थवाहाचे (तांड्याने व्यापार करणारे) तांडे राजगृहाहून निघून ते कपिलवस्तू, श्रावस्ती, विदिशा, गोनध, महिष्मती या मार्गाने येऊन पैठण, नगर, नाशिक, जुन्नर, कल्याण, भरुकच्छ या नगरांत पोहचत. सार्थवाहांच्या मागोमाग बौद्ध भिक्षू आणि जैन श्रमण यांचे आगमन महाराष्ट्रात झाले.

बौद्ध भिक्षूंना महाराष्ट्रात अनुकूल वातावरण मिळाले असावे. गोदावरीच्या काठावर महायज्ञ करावयास बसलेल्या बावरी नामक एका ब्राह्मणाने आपणहून आपले सोळा शिष्य सिद्धार्थ गौतम बुद्धाच्या भेटीसाठी राजगृहाला पाठविले असल्याची कथा सुत्तनिपातामध्ये आली आहे.

सार्थवाह आणि बौद्ध भिक्षूंच्या मागोमाग मगध देशाच्या विजयी सेना महाराष्ट्रात आल्या. प्रथम तराजू, नंतर पोथी आणि त्यामागून तलवार हा बहुधा इतिहासाचा सनातन नियम आहे.

भारतीय व्यापारपेठेचा किंबहुना जागतिक बाजारपेठेचा महत्त्वाचा दुवा म्हणून मौर्यपूर्व काळातच महाराष्ट्रातील बंदरांची आणि सार्थवाहपथांची नोंद होऊ लागली होती. दक्षिणापथाच्या समृद्धीकडे मौर्य सम्राटांची दृष्टी न जाती तरच नवल. व्यापाऱ्यांच्या नाड्या पूर्णपणे राज्याच्या हाती ठेवणे हे चाणक्याचे धोरण तर व्यापारी वर्गावरील ताण कमी करून धर्माला साम्राज्यवृद्धीसाठी राबवून घ्यायचे हे अशोकाचे धोरण. पण दोघांच्याही धोरणांची फलश्रुती साम्राज्यविस्तारातच झाली.

## सातवाहन सत्तेचा उदय

मौर्य सम्राट भिक्षुराज अशोकाच्या मृत्यूनंतर मौर्य साम्राज्याची शकले-शकले झाली. श्रेणीबद्ध शासनयंत्रणा हा मौर्य साम्राज्याचा मुख्य सापळा होता. केंद्रीय सत्ता जोपर्यंत प्रभावी व्यक्तींच्या आधीन आहे, तोपर्यंतच असली यंत्रणा भारतासारख्या खंडप्राय देशात प्राचीन काळी कार्यक्षम ठरू शकत असे. अशोकाच्या मृत्यूनंतर जे अराजक उद्भवले, त्यातून सातवाहन नावाच्या मावळ प्रांतातील एका युवकाने दक्षिणापथाचे स्वराज्य घोषित केले. कल्याण, सोपारा, चौल, नाणेघाट, नाशिक, जुन्नर, पितळखोरे आणि अजिंठ्याचा घाट ही दक्षिणापथातील सार्थवाह पथावरील व्यापारीदृष्ट्या मोक्याची ठिकाणे हाती येताच गोदेच्या काठची पैठणची राज्यलक्ष्मी युवक सातवाहनाच्या आधीन न होती तरच नवल.

इंद्र, वरुण, यम, कुबेर आदी वैदिक देवतांना आणि वासुदेव, संकर्षण आणि कुमार ह्या यदुवंशीय दैवतांना पूजणाऱ्या मावळप्रांतीच्या एका कुळात जन्म घेतलेल्या ह्या सातवाहनाने अनेक जैन मंदिरे आणि बौद्ध चैत्य उभारले, अशी वाङ्मयीन परंपरा आहे. दक्षिणापथातील सार्थवाह आणि वाणिजश्रेष्ठी ह्यांना प्रिय असणाऱ्या

जैन आणि बौद्ध धर्माकडे यज्ञसंस्कृतीचा पुरस्कर्ता असलेल्या सातवाहनाने आपुलकीने बघावे, ह्या घटनेत वरवर पाहता सांप्रदायिक विसंगती असली तरी साम्राज्य संपादनाचे इंगित मनात बाळगणाऱ्या दक्षिणापथपतीचे लौकिक शहाणपण मात्र ह्यात निश्चितपणे प्रकट झाले आहे.

ख्रिस्त संवताच्या जवळची साडेचार शतके भारताच्या राजकीय इतिहासपटावर सातवाहन राजकुलाने चढणोउतरणीचा खेळ तब्बल छत्तीस पिढ्या खेळला. या कुळाची स्थापना सातवाहनाने केली. पुढील पिढ्यांतील राजपुरुषांनी सातवाहन हे कुलनाम धारण केले. सातवाहन, शिमुक, कन्ह, सातकर्णी, पूर्णोत्संग, स्कंदस्तंभी, द्वितीय सातकर्णी, अपीलक, आपीलक, कुंतल सातकर्णी, पुलोमावी, हाल, सुंदर सातकर्णी, गौतमीपुत्र सातकर्णी, वासिष्ठीपुत्र पुलोमावी आणि यज्ञश्री सातकर्णी हे या कुळांतील काही विख्यात राजपुरुष होऊन गेले.

यांपैकी गौतमीपुत्र सातकर्णी ह्याचे वर्णन नाशिक येथील गौतमी बलश्रीच्या शिलालेखात ' तिसमुदतोयपीतवाहन ', ' सक–यवन–पह्लव निसूदन ', ' सातवाहन-कुलयस पतिठापनकर ' या शब्दांत केले गेले आहे.

## धुमार फुलले

दक्षिणापथपती सातवाहनाच्या राजवटीत मराठी जीवनपुष्पाचे सर्व धुमार फुलले. साहित्य, शिल्प, संगीत, नृत्य यांनी सातवाहनकालीन नागरी जीवन मोहरले.

गोदाकाठच्या युवक आणि युवती यांच्या पदन्यासात ठेका मूळचाच होता, पण त्याला विदग्ध संस्काराची जोड मिळाली सातवाहन-युगात. कोंडाणे लेण्यातील नृत्यरत युगलांचे शिल्प पाहा, प्रत्यय येईल !

डोंगरातील खडकांवर रेखाचित्रे कोरण्याचा दख्खनच्या माणसाला फार जुना हव्यास, पण त्या रेखांना घनता आणि आकार यांचा उठाव मिळाला तो सातवाहन युगात. भाजे, कोंडाणे, बेडसे, कार्ले, पितळखोरे, अजिंठा, जुन्नर, नाशिक येथील शैलगृहे पाहा, तावडतोब खात्री पटेल !

निसर्गातील तालसुरांना साद घालण्याचा गोदाकाठच्या मानवाचा छंद फार प्राचीन. पण त्या छंदाला काव्याचा दर्जा मिळाला तो सातवाहन-युगात. गोदा आणि तापी यांच्या परिसरातील महारठी युवकयुवतींच्या प्रणयी जीवनातील विविधअंगी छटा, त्यांची हसरी आणि दुखरी, सफल आणि विफल भावोत्कटता काव्याच्या उत्स्फूर्त ओळींच्या रूपाने प्रकट झाली ती सातवाहन-युगात. ' गाहासत्तसई ' (गाथा-सप्तशती) हे महाराष्ट्राचे आदिकाव्य. पण ह्या आदिकाव्याचे अंगभूत सामर्थ्य एवढे की, संस्कृत पंडितांनीही काव्यप्रांतातील अद्‌भुत प्रतिभाविलास म्हणून या महाराष्ट्री काव्याकडे कौतुकाने बोट दाखवावे.

विदग्ध माती, छिन्नीच्या आघाताने समजूतदारपणे आकार घेणारा दख्खनचा कातळ, तुसाचा गिलावा आणि रंगाचा लेप व महाराष्ट्री प्राकृताचे

अल्लड आणि लडिवाळ बोल, हे सातवाहनकालीन कलावंतांचे हृदयाविष्काराचे माध्यम. गोदावरीच्या काठी नांदू लागलेल्या ' महारठी ' जीवनाचे बहुरंगी उन्मेष ही या काळातील कला आणि साहित्य यांची कथावस्तू.

मानवी जीवनातील सर्व सुखांचा विलक्षण हव्यास आणि त्याचबरोबर मानवी प्रारब्धाच्या अंतिम व विश्वात्मक स्वरूपासंबंधी चिंतन करण्याची या हव्यासाला मिळालेली जोड यामधूनच कार्ले, भाजे, अजिंठा, पितळखोरे, आणि राजतडाग येथील शिल्पवैभव, अजिंठ्यातील शिल्पसृष्टी आणि ' गाहा-सत्तसई 'मधील उत्स्फूर्त काव्य जन्माला आले.

अभिजात सौंदर्यदृष्टी आणि उत्स्फूर्त भावोद्रेक यांचा विलोभनीय संगम सातवाहनकालीन शैल, शिल्प आणि ' गाहासत्तसई ' या दोन्ही मराठी प्रतिभा-विलासांत बघावयास मिळतो.

गाहासत्तसई–गाथासप्तशती हा सातवाहन नृपती हाल याने महाराष्ट्रातील गावोगावीच्या कवींची पदे एकत्र करून त्यांतून निवडून काढलेल्या सातशे गाथांचा संग्रह. यातील काही गाथा प्रक्षिप्त असल्याचे काही टीकाकारांचे मत असले तरी यातील मुख्य गाभा हा निर्विवादपणे सातवाहनकालीन आहे.

## गोदेकाठचे रसीले जीवन

' गाहासत्तसई ' हा महाराष्ट्री प्राकृतातील पहिला ज्ञात काव्यग्रंथ. या मराठी आदिकाव्याचे अंतरंग सौंदर्याने आणि माधुर्याने एवढे ओतप्रोत आहे की, संस्कृत कविपंडितांनीही या काव्याचे मुक्तकंठाने कौतुक केले आहे. पुढील काळातील प्राकृत कवींनाही ' गाहासत्तसई 'बद्दल विलक्षण अभिमान वाटत असे. गाथांच्या सौंदर्याची प्रशंसा करताना जयवल्लभ म्हणतो, " ओठांतल्या ओठांत लाडिकपणे घोळलेले अर्ध-स्फुट बोल, विलासोन्मुख मुग्धेचे स्मित आणि अपाङ्गावलोकन यांचे स्वारस्य प्राकृत गाथांच्या परिशीलनानेच येते. "

एक कोटी ग्रंथांमधून अलंकारांनी सजलेल्या अशा सातशे गाथा निवडून सात-

ग्राम– जेबीव्हेंक फोन– ६९२४०७

अन्नस्वतंत्रता-संचलनास हार्दिक शुभेच्छा

जे. बी. सावंत इंजिनीयरिंग वर्क्स

गोरेगाव, मुंबई ६२

वाहन-नृपती कविवत्सल हाल याने 'गाहासत्तसई' ग्रंथ निर्माण केला असे एका गाथेतच सांगितले गेले आहे.

सातवाहनकालीन मराठी ग्रामीण जीवनाचे सर्वंकष व मनोवेधक चित्रण आपणांस 'गाहासत्तसई' मध्ये बघावयास मिळते. कल्पनेचा विलास, तरल आणि उत्कट भावाविष्कार, निसर्गाचे वास्तव चित्रण आणि कुटुंबजीवनातील नाटयमय प्रसंगांचे मनोवेधक व सूक्ष्म रेखाटन गाथांमध्ये जागोजाग प्रत्ययास येते.

गोदावरीच्या काठी, मधुक वृक्षाच्या छायेखाली आणि गर्द हिरव्या कुंजामध्ये प्रणयक्रीडेत रममाण झालेल्या मराठी युवक-युवतींच्या जीवनाची जी वेधक आणि धावती चित्रे 'गाहासत्तसई'मध्ये आली आहेत त्यांतील माधुर्याची चव वाचकांना घेता यावी म्हणून काही गाथा वानगीदाखल देणे अप्रस्तुत ठरणार नाही.

गोदेकाठच्या सातवाहनकालीन एका तरुणीची व्यथा ऐका !

**अज्ज व्वेअ पउत्थो उज्जअरओ जणस्स अज्जे अ।**
**अज्ज अ हलिद्दापिञ्जराइं गोलाणइतडाइं॥**

"आजच पती प्रवासाला गेला आहे. आणि आजच लोक रात्रभर जागरण करतील व गोदावरीचे काठ हळदकुंकवाने रंगून निघतील."

मोहाच्या मद्याची चव आणि गोदेचे सान्निध्य मराठी तरुण-तरुणींना अति प्रिय. एक तरुणी म्हणते,

**बहुपुप्फभरोणामिअभूमीग असाह सुणस विण्णत्तिम।**
**गोलातडविअडकुडङ्ग महुअं सणिअं गलिज्जासु॥**

"मधुक वृक्षा, गोदातीरावरील गर्द राईत तुझ्या फांद्या फुलांच्या भाराने जमिनीपर्यंत लवल्या आहेत. माझी विनंती ऐक. तू आपली फुले अगदी हळूहळू ढाळ."

गोदेकाठच्या एका तरुणाच्या हातून घडलेले एक कृत्य वाकडे होते पण ते त्याने निष्पाप अंतःकरणाने केलेले असून भक्कम कारणावर आधारलेले होते अशी कैफि-


**पक्ष अनेक पण सर्वांचे एकच मत !**

कोणत्याही तऱ्हेच्या टोप्या, गंजिफरॉक, सॉक्स, छत्र्या वगैरे सर्व प्रकारची होजियरी व लहानमोठ्यांचे अद्यावत तयार कपडे

**एन. व्ही. गोखले**

**यांचे दुकानातच घ्यावेत.**

प्रार्थना समाज़ जवळ, गिरगाव मुंबई ४.

वाजवी किमत व उत्कृष्ट माल हेच वैशिष्टच

यत कवीने केली आहे ती ऐका—

**गोलाविसमोआरच्छलेण अप्पा उरम्मि से मुक्को ।**

**अणुअंपाणिद्दोसं तेण विसा आढमुवड्ढा ।।**

"गोदावरीचे पात्र ओलांडताना उतार अवघड असल्याच्या निमित्ताने तिने त्याच्या छातीवर भार टाकला; —केवळ अनुकंपेमुळे त्याने तिला आधार दिला व पुढे अजाणतेपणाने तिला त्याने मिठी मारली, खरोखर तो अगदी निर्दोष आहे."

एक अनुभवी स्त्री आपल्या बाळीला म्हणते,

**मा वच्च पुप्फलावरि ! देवा उअंजलीहि तूसंती ।**

**गोआअरिअ पुत्तअ ! सीलम्मूलाइं कूलाइं ।।**

"बाळे, गोदातीरी फुले वेचायला कशाला जावे लागते ? उदकाच्या अंजलीनेही देव संतुष्ट होतात. गोदावरीच्या तीरावर शीलखंडन होते." बाळी गोदातीरी कशासाठी जात आहे हे वृद्धेला माहीत आहे. तिच्या उमेदीच्या काळात तिनेही भानगडी केल्या आहेत, पाहिल्या आहेत, सबबी सांगितल्या आहेत आणि ऐकल्या आहेत. बाळीने हे सर्व करू नये असे तिचे म्हणणे नसावे. फक्त तिने थापा देऊ नयेत एवढेच !

एका गाथेत कवीने एक सहजरम्य कौटुंबिक प्रसंग मोठ्या नाटयपूर्ण शैलीने रंगविला आहे.

**पाअपडिअस्स पहणो पुट्ठि पुत्ते समारु हत्तम्मि ।**

**दढमण्णु दुण्णिआए वि हासो परिणाए णे कन्नो ।।**

"रागावलेल्या पत्नीस प्रसन्न करून घेण्यासाठी पती तिच्या पाया पडण्यास वाकला असता त्याचा किशोर त्याच्या पाठीवर जाऊन बसला — जणु घोडा घोडा खेळण्यासाठीच पिता ओणवा झाला होता. हा देखावा पाहून क्रुद्ध झालेली गृहस्वामिनीही खुदकन हसली."

आधुनिक नवकवीलाही लाजवील अशी तरल कल्पनाविलासाची प्रचीती आणून देणारी एक गाथा पाहा,

**कमल असण मलिआ, हंसा उड्डाविआण पिउच्छा ।**

**केणावि गामतडाए अब्भ उत्ताणअं व्यूढम ।।**

"आत्याबाई, आपल्या गावच्या तळयात कोणीतरी आभाळ उताणे टांगले आहे. ते पाहिलंत का ? तरीही तळयातील कमळांचे ताटवे तुडवले गेले नाहीत आणि हंसही उडवून लावले गेले नाहीत. एवढे मोठे आभाळ कोणीतरी पाण्यात उलटे टाकले आहे पण झटापटीची कुठे चिन्हेही दिसत नाहीत."

सातवाहनकालीन पैठणच्या एका पाणपोईवरील एक हृदयंगम दृश्य बघा.

**उद्धोच्छो पअहं जलं जह जह विरंलंगुली चिरंपहिए ।**

**पावलिआ वि तह तह धारं तणुहं पि तणुएइ ।।**

" पाणपोईवरील पाणी घालणारी तरुणी तहानलेल्या पथिकाच्या ओंजळीत पाणी घालत आहे. ओंजळीची बोटे तो विरल करीत आहे. व पाण्याची धार ती अधिकाधिक बारीक करीत आहे."

पहाटेचा कोंबडा रोज आरवतो. पण त्याचे बोल निरनिराळ्या व्यक्तींना निरनिराळ्या अवस्थेत वेगवेगळे इशारे देतात हे गाथा कवीने एका गाथेत कसे मार्मिकतेने सांगितले आहे ते बघा,

**चोराणं कामुआणं अ पामर पहिआण कुककडो वइम ।**

**रे रमह वहह, वाहयह, एत्थ तणुआअए रंअणी ।।**

" चोर, कामुक व गरीब वाटसरू यांना पहाटे कोंबडा आरवून सांगतो की अरे आता चोरीचा माल पळवा, प्रेम आवरते घ्या व ओझ्याची जनावरे हाका कारण रात्र क्षीण होत आहे."

गाथासप्तशतीच्या माधुर्याची आणि रमणीयतेची प्रचीती वाचकास आणून देण्यास कुणाही मल्लीनाथाची गरज नाही. इतक्या या गाथा संवादी बोलक्या आहेत. एकदा वाचाव्याच !

### इतिहासाच्या उंबरठ्यावर

सातवाहन युगातील साहित्य आणि कला या विश्वातील काही दालनांचा


ADVANI-OERLIKON

हार्दिक शुभ–कामनाए

अुत्कृष्ट वेल्डिंग इलेक्ट्रोडस्
और इक्विपमेंट के लिये

**जे. बी. अडवानी-ओरलिकॉन**
**इलेक्ट्रोडस् प्रा. लि.,**
रेडिआ हाअूस, ६ रामपार्ट रो,
बम्बअी–१

अल्पसा परिचय करून घेतल्यावर आता या युगातील राजकीय व सामाजिक वैशिष्टयांकडे वळू या !

हैहय, ऋथकैशिक, भोज, अंधक-वृष्णी, राष्ट्रिक व महाराष्ट्रिक हे आर्यगण आणि भिल्ल, कातकरी, पुलिंद, निषाद हे पाषाणयुगातील दख्खनचे रहिवासी आणि पुढे यवन, शक, पह्लव यांच्यासारखे परकीय यांच्या सामाजिक व सांस्कृतिक अभिसरणाची प्रक्रिया दक्षिणापथात घडून आली ती सातवाहन-युगात.

आणि या युगाचे राजकीय कर्तृत्व काही वेगळेच ! इतिहासाला ज्ञात असलेला, भारताचे सम्राट्पद संपादन करणारा दख्खनचा पहिला राजवंश हा सातवाहनांचा.

पुराणकार व संस्कृत पंडित यांच्या मनांत सातवाहनांसंबंधी काही बरे नाही. पण तरीही प्राचीन राजघराण्यांच्या वंशावळी देताना सर्वांत जास्त ओळी सातवाहनांसाठीच त्यांना खर्च कराव्या लागल्या.

महाराष्ट्राला आणि दक्षिणापथाला राजकीयदृष्टया संघटित करण्याचे कार्य सर्वप्रथम सातवाहनांनी केले. परकीयांचे राजकीय उच्चाटन करून भारतीय जीवनाच्या व्यापक प्रवाहात त्यांना सामावून घेण्याची प्रक्रिया सातवाहन युगात घडून आली. धेनुकाकटच्या यवेनांची कार्ले लेण्यांतील दाने याबाबत साक्ष देतात.

महाराष्ट्राच्या राजकीय जीवनातील गेल्या दोन हजार वर्षांतील लकबी मराठी माणसाच्या वळणी सर्वप्रथम सातवाहन—युगात पडल्या.

भारतातील केंद्रीय सत्ता प्रभावशाली असेपर्यंत तिच्याशी एकनिष्ठ राह्यचे व ती कमकुवत होताच दख्खनचा आणि महाराष्ट्राचा कारभार स्वतंत्रपणे चालवायचा ही मराठी राजकारणाची तऱ्हा फार जुनी. केंद्रीय सत्तेकडे फारसे वाकडया नजरेने बघायचे नाही; पण जर कधी केंद्रीय सत्ता परक्यांच्या मान्यामुळे हतबल होऊन लिलावातच निघाली तर दख्खनच्या वतीने बोली लावण्यासाठी उत्तरेच्या राजकीय रिंगणात दाखल व्हायचे ही मराठी राजकारणाची लकब पहिल्या प्रथम इतिहासाला दिसली ती सातवाहन-युगात.

महाराष्ट्राच्या इतिहासात सातवाहन युगाचे महत्त्व व कर्तृत्व हे असे आहे. महाराष्ट्राला इतिहासाच्या उंबरठयावर उभे केले ते सातवाहनकालीन पिढयांनी.

(अपूर्ण)

# दि इचलकरंजी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि.

इचलकरंजी

(फोन नं. ३६)

इचलकरंजीच्या वाढत्या उद्योगधंद्यास ३६ वर्षे सतत भांडवल पुरवणारी व सार्वजनिक विश्वस्त निधीच्या ठेवी स्वीकारण्यास सरकारमान्य असलेली इचलकरंजीतील एकमेव नागरी बँक —

(स्थापना १९३०)

★

खेळते भांडवल रु. ६० लाखांचे घरात

★

ठेवीवरील व्याजाचे आकर्षक दर.

★

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

★

अधिक चौकशी
बँकेच्या ऑफिसात करावी.

श्री. ज. दांडेकर,
मॅनेजर

द. बा. कदम
चेअरमन



शिवाजी सावंत

महाभारतीय कथाविश्वात भव्य-दिव्य व्यक्तिरेखा अनेक आहेत. प्राकृतिक षड्भावांचे हलकल्लोळ अंतरंगात पचविणारे, कधी कधी त्यांचा बेहोष विस्फोटही करणारे अनेक महाकुंभ आहेत. पण – पण एक व्यक्तिरेखा अशी आहे की जिला मृत्तिकाकुंभाची, ताम्र, लोह वा सुवर्णकुंभाची कसलीच विशिष्ट उपमा देता येत नाही. त्या व्यक्तीच्या जीवनचरित्राचं परिशीलन केल्यानंतर हाती येते ती फक्त एक अनामिक हुरहूर ! निराकार पण जाणवणारी हुरहूर ! श्रीकृष्ण, अर्जुन, कर्ण, भीष्म, द्रोण, धर्म यांच्या जीवनरेखा पाहताना एखादी

घोटीव कथा हाती येते— किमान काही व्यक्तींच्या बाबतीत रेंगाळणारी, अस्वस्थ करणारी व्यथा तरी राहतेच—पण एक व्यक्तिरेखा पाहताना तिनं जीवन-संग्रामात हस्तगत काय केलं ते कळत नाही. सर्वस्वमोलाचं काहीतरी गमावलं हे जाणवतं पण ते नेमकं काय होतं याचा वेध घेता येत नाही ! ती महाभारतीय व्यक्तिरेखा म्हणजे द्रोणपुत्र अश्वत्थामा !

महाभारताच्या युद्धपर्वावर एक वैनतेयी कटाक्ष टाकला की, असं स्पष्ट जाणवतं की अश्वत्थामा हा महान योद्धा होता, पण त्याचं पूर्वजीवन पाहता तो योद्धयापेक्षा अधिक तत्त्वचिंतक होता हेच पटतं. त्याच्यातील या तत्त्वचिंतकाचा जन्मही कोणत्या मुहूर्तावरचा ते कळत नाही. कारण बालपणी मातृसौख्य हरपलेला अश्वत्थामा द्रोणांनी वाढविला. द्रोण त्या वेळी द्रुपदराजाच्या नगरात होते. दरिद्री द्रोणाकडं लक्ष द्यायला वैभवी द्रुपदाला समय नव्हता— प्रयोजन तर नव्हतंच नव्हतं. आणि अशाच एका पोळणाऱ्या दिवशी भूकेने व्याकुळ झालेल्या या कोवळ्या वयाच्या पोराच्या तोंडी घालायला (पुढं वैभवी कुरूंचे राजगुरु झालेल्या) द्रोणाचार्यांजवळ दोन मुठी धान्यसुद्धा नव्हतं. भूकेच्या अग्नीनं अश्वत्थाम्याचं आतडं जळत होतं तर असहायपणाच्या अग्नीनं द्रोणांचा आत्मा होरपळत होता. स्वतःच्या पितृहृदयावर एक अवजड हत्ती ठेवून त्यांनी निर्धारपूर्वक सत्तूचं पीठ पाण्यात मळून ते अद्वितीय दूध, आपल्या प्रिय पुत्राला पाजलं ! झालं ! मला तरी अश्वत्थाम्यातील तत्त्व-चिंतकाचा जन्म या सत्तूचं दूध असलेल्या चषकातच दिसतो.

अवमानित, दरिद्री म्हणून द्रुपदाच्या भरल्या राज्यात राहण्यापेक्षा नाक सांगेल ती दिशा धरून चालू लागावं असा निश्चय करून द्रोणांनी अश्वत्थाम्यासह पांचाल देश सोडला. पूर्वजन्मानं बांधलेले त्यांचे पाय अरण्ये तुडवीत, नद्या ओलांडत नकळत

- - - - - - - - - -

# मणी मांसाचा माथ्यावरचा !!

- - - - - - - - - -

*तो लोकविलक्षण मांसल मणी मिळून*
*अश्वत्थाम्याने अखेर काय मिळवले ?*
*आणि तो देऊन त्याने काय गमावले !*

हस्तिनापुराकडं चालले.

हस्तिनापूर हे त्या प्राचीनकालातील आर्यावर्तातील सर्वांत वैभवी नगर होतं. धृतराष्ट्राचं हे राजनगर गंगेच्या काठी दिमाखानं उभं होतं. मंदिरं, गोपुरं, अश्व-शाला, राजमहाल यांची दाटीवाटी असलेलं संपन्न नगर होतं. कुरुवंशाचा तो मान-दंड होता. पण त्या नगरात तरी त्या पिता-पुत्रांना कुठं प्रतिसाद असणार? मग द्रोणांनी जगत्पालिनी महामातेच्या-गंगेच्या काठी आपली पर्णकुटी उभारली. पिता-पुत्र त्या पर्णकुटीत कंदमुळं आणि गंगेचं शीतल पाणी यांवर 'जीवन' जगवू लागले. या वेळच्या द्रोणांच्या जीवनाचं वर्णन-

"पर्णकुटी ती गुरुद्रोणांची-
कुडास होती छिद्रे फार!
त्याहून होती उरात छिद्रे-
दारिद्र्याची घोर अपार!!"

असंच करता येईल.

मात्र या पर्णकुटीसमोर कुरुवंशातील राजपुत्रांच्या क्रीडेसाठी तयार केलेलं, अनेकविध फुलांनी, ताटव्यांनी डवरलेलं एक उद्यान होतं. त्या उद्यानात एक विहीर होती. तिचं पाणी पिऊन तरारलेली डौलदार पुष्परोपटी होती. त्या उद्यानात जाऊन तिथल्या टवटवीत फुलांकडं पाहत बसणं हा छंद अश्वत्थाम्याला जडला. आणि उद्यानातील या विहिरीनंच द्रोण-अश्वत्थामा यांचं जीवन साफ बदलून टाकणारं वळण एके दिवशी दिलं!

कौरव पांडव असे सर्व युवराज एके दिवशी क्रीडा करण्यासाठी त्या उद्यानात आले. त्यांनी विटी-दांडूचा खेळ मांडला. उद्यानाच्या एका कोपऱ्यात एका वृक्षा-खाली अंग चोरून उभा असलेला अश्वत्थामा त्यांचा उत्साही कलकलाट ऐकत दूर उभा राहिला. राजपुत्रांत तो कसा मिसळणार? पण नियतीचे खेळ वेगळेच अस-तात. तिनं त्यांना एकत्र आणलं.

"एकाएकी क्षण पालटला-
वीटीस कुणीतरी देता टोला-
खेळ संपला विटीदांडूचा-
सुरू जाहला भवितव्याचा!"

असंच काहीसं घडलं.

कुणीतरी तडाखा दिलेली विटी भिरभिरत उडाली आणि विहिरीत पडली. सर्व युवराज विहिरीच्या कठड्याभोवती दाटीवाटीनं जमा झाले. विटी वर कशी काढावी हे त्यांना समजेना. दूर एकाकी उभ्या असलेल्या द्रोणपुत्र अश्वत्थाम्यानं त्यांची अडचण जाणली. तो तसाच धावत आपल्या पर्णकुटीकडं आला. पित्याला आग्रह करून त्यानं पर्णकुटीतून बाहेर आणलं. शुभ्र दाढीधारी द्रोण विहिरीजवळ आले.

त्यांनी एक गूढ असा मंतरलेला बाण विहिरीच्या तळाशी सोडला आणि—

" द्रोणांनी क्षणी मंतरलेला–
एक गूढसा बाण सोडता–
घेऊनि आली विटी हाता–
भारतीय युद्धाची गाथा !!"

असा चमत्कार झाला. द्रोणांच्या बाणाने केवळ विटीच बरोबर आणली नाही तर पुढे लक्ष लक्ष भारतीय वीरांनी ज्या महायुद्धात आत्मार्पण केलं त्यांची गाथाही स्वतःबरोबर आणली. कारण विस्मित झालेल्या राजपुत्रांनी द्रोणांचं हे अचाट शरलाघव तातडीनं राजमहालावर पितामह भीष्म व महाराज धृतराष्ट्र यांना डोळे मोठे करून सांगितलं, पितामहांनी द्रोणांना आपल्या राजवास्तूवर पाचारण केलं. पित्याबरोबर अश्वत्थामाही राजवाड्यावर आला. केवळ एका घटनेनं या पिता-पुत्रांच्या भावी जीवनाला आमूलाग्र वळण देणारं सत्य साकारलं.

" कणा सरकता भाग्यरथाचा–
आरे धावले घटनांचे–
द्रोण दरिद्री होते तरीही–
गुरू जाहले कुरुवंशाचे !!"

एका विटीमुळं द्रोण कुरूंचे राजगुरू झाले. अश्वत्थामा गुरुपुत्र झाला. अश्वत्थाम्याच्या जीवनांतील ही दुसरी महत्त्वाची घटना होती. अनाकल आणि गूढ.


काळ्याभोर रेशमी विपुल केसांकरिता

डोंगरे

# अप्सरा

हेअर ऑईल

उत्पादक

**के. टी. डोंगरे अॅण्ड कं., प्रा. लि.,**

मुंबई, कानपूर, नैरोबी ( आफ्रिका )

**डोंगरे बालामृताचे निर्माते**

जरी तो राजवास्तूवर आला तरी त्याचा पिंड राजोपभोग घेणारा नव्हता. कारण सर्व राजपुत्रांहून तो आगळा होता. केवळ जन्मानं, वृत्तीनं, संस्कारानं नव्हे तर एका अद्वितीय दैवी देणगीनंसुद्धा.

" परि सर्वांतील अश्वत्थामा–
सर्वांहून जो होता आगळा–
मणी मांसाचा माथ्यावरचा–
झगमग झगमग चमके त्याचा ! ! "

अश्वत्थाम्याला जन्मजातच एक असा मांसल मणी लाभला होता की ज्यातून त्याचे इतर भारतीय वीरांहून आगळेपण स्पष्ट व्हावे. महाभारतात अशी मांसल मण्यांची दैवी देणगी लाभलेल्या व्यक्ती दोनच. कानांतील गोबरी मांसल कुंडलं मिरविणारा कर्ण आणि माथ्यावरचा मांसल मणी तो कुणाला दिसू नये म्हणून पांढऱ्या शुभ्र वस्त्रांनी झाकून घेणारा अश्वत्थामा ! अश्वत्थाम्याच्या या मण्यावर चिंतन केलं की त्याच्या जीवनचरित्राचे अनेक धागे उकलतात. अश्वत्थामा तत्त्वचिंतक झाला नसता तरच नवल. त्याचा मणी हाच त्याच्या तत्त्वचिंतक मनाचा साक्षीदार वाटतो.

असा हा अश्वत्थामा किशोरावस्थेत कुरूंच्या समृद्ध वाड्यावर राहू लागला. पण ब्रह्मकुमार म्हणून त्यानं आपली दिनकर्मं सोडली नाहीत. फावल्या वेळात शस्त्रास्त्र-विद्या शिकून तो कुरूंच्या राजवाड्यावरही एका आश्रमकुमाराचं जीवन आचरू लागला. या पौगंडदशेतच त्याला निसर्गाचं वेड जडलं. त्याची दिनचर्याच तशी होती–

" पहाट होता समिधांसाठी–
वाट धरावी घोर वनाची–
खळखळणाऱ्या निर्झरातटी–
क्रीडा पहावी जललहरींची !
गीते श्रवावी मुग्ध मनाने–
कपोत, चातक, कोकील यांची–
रंगसंगती कधी ताडावी–
गगनामधल्या इंद्रधनूची ! "

प्राकृतिक सौंदर्याने ओसंडून चाललेल्या हस्तिनापूरच्या विहंगम परिसरात किशोर-वयाचा अश्वत्थामा समिधांसाठी एकटा फिरू लागला. इथंच त्याच्या कविमनाची सांगड निसर्गाशी जमली. निरनिराळे वृक्ष, रानफुलं, आकाशाची नितळ निळाई सर्व सर्व तो विस्मयानं पाहू लागला. त्याच्यातील तत्त्वचिंतक आता त्याच्या अंतर्मनात रुजू लागला. अनेक सखोल प्रश्न त्याच्या मनात, वनातून मुक्त भटकत असताना तयार झाले–निसर्गाचे ते विमुक्त प्रकटन पाहून त्याच्या मनात डोकावू लागलेले प्रश्न काव्यबद्ध करूनच सांगावयाचे म्हटले तर असे सांगता येतील– [पृ. ९८ वर]

# पद्मा नदीवरील नावाडी

*दुसरे दिवशी सकाळीच यात्रेच्या ठिकाणी आपला माल विकता यावा म्हणून पद्मा नदीवरील एका नावाड्याने आपल्या नावेत माल भरला व तो रात्रीच निघाला. रात्रभर नाव वल्हविल्यास तो सकाळी यात्रेच्या ठिकाणी पोहचू शकणार होता. नदीच्या पात्राभोवती दाट अंधार होता. आपल्याला किती कमाई होईल याची स्वप्ने रंगवीत त्याने उत्साहाने रात्रभर नाव वल्हविली.*

*आणि काय आश्चर्य? उजाडल्यावर त्याला आढळून आले की तो जेथून निघाला होता तेथेच होता! हे कसे झाले?...त्याचे कारण नदीचा प्रवाह उलटा वाहात होता. अन् त्याने नावेची गती स्थिती इतकी स्थिर केली.*

आपल्या देशाची स्थिती अशीच आहे. नागरिकांचे जीवनमान सुधारण्याचे प्रयत्न चिकाटीने २० वर्षे केल्यानंतर (काही बाबतीत प्रगती झाली असली तरी सामान्यत:) आपण पूर्वस्थितीपासून फारसे पुढे गेलेलो नाहीत. अन्नधान्याच्या उत्पादनाचेच उदाहरण घ्या. १९५१ पासून १९६५ पर्यंतच्या १४ वर्षांत आपण ते १७० लाख टनांनी वाढविले. पण प्रत्येकाला आज पूर्वीपेक्षा ०.४ औंस कमीच अन्नधान्य मिळत आहे. नोकऱ्या मिळविण्याच्या अथवा शिक्षणाच्या सोयींच्या अशा अनेक क्षेत्रांतही आपली प्रगती नष्ट केली आहे ती लोकसंख्येच्या वाढीने. दरसाल आपली लोकसंख्या सुमारे १३० लाखांनी वाढते. तेव्हा सर्व गोष्टी कितपत पुराव्यात?

पण आतापासूनच कुटुंब नियोजन केल्यास निदान पुढे तरी सुखाचे दिवस दिसतील. त्यासाठी नजीकच्या कुटुंब नियोजन केंद्रात जाऊन सल्ला घ्या. मोफत सेवासोयी उपलब्ध आहेत. लक्षात ठेवा: ▽ लाल त्रिकोण ही कुटुंब नियोजन केंद्राची खूण आहे.



▽
संतती थोडी असावी
दोन वा तीन मुले पुरेत

davp 67/193

# शमशाद



एखादा खुनाचा खटला चिरकाल स्मरणात राहण्याकरिता त्या खुनाच्या बुडाशी तशीच काहीतरी अघटित, जगाविरहित नि सनसनाटी भूमिका असावी लागते. विविध कारणां-मुळे एखाद्या खुनास प्रसिद्धी अथवा कुप्रसिद्धी मिळते. खुनामागील हेतूंची अमानुषता, अनुसरलेली क्रूर पद्धती, योजिलेल्या बेतांची गुंतागुंत, निर्घृण पद्धतीने केलेली प्रत्यक्ष अंमलबजावणी, इत्यादी अनेक गोष्टींमुळे काही खुनांचा मोठा गाजावाजा होतो. तसेच, खून झालेल्या व्यक्तीचा सामाजिक श्रेष्ठ दर्जा आणि आरोपीची समाजातील प्रतिष्ठा याही गोष्टी एखाद्या खुनाला फार मोठे सामाजिक महत्त्व प्राप्त करून देतात.

शमशाद बाई! लाहोरची एक नर्तिका! केवळ पंधरा वर्षांची कोवळी पोर! रूपगर्विता! उन्मादक यौवनाने बहरलेली, मुसमुसलेली एक छेलछबेली! अनेकांना खेळवणारी, नाचवणारी, नादावणारी एक यौवनकलिका! देहमान हरपून टाकणारी एक लावण्यवती! स्वरूपसुंदरी नि त्यातून एक नर्तिका! समाजात सातत्याने ऊठबस करणारी!

चित्तरंजन घोटीकर

**हुसेनको बुलाव, हुसेनको बुलाव जल्दी। जल्दी। ८ नोव्हेंबरच्या भयाण रात्री ही कर्कश किंकाळी प्रासादात घुमली, सर्व नोकर-चाकर त्या दिशेने धावले व समोरचे दृश्य पाहून एकदम थबकले ! रक्ताच्या थारोळ्यात ती छबेली पडली होती, व तिला घट्टपणे कवटाळून महंमद निजला होता, समोरच..**

या शमशादबाईचा खून ! होय ! तिचाच खून ! अकल्पित, चाकोरीबाहेरील विस्मयजनक पार्श्वभूमीने नटलेला ! वस्तुत: शमशादबाईचा खून हे खरोखरीच एक मन गुंगवून टाकणारे उत्कृष्ट कथानकच आहे. तथापि, तिचा खून होऊन चार महिन्यांनी आरोपीवरील प्रत्यक्ष खटला सुरू होईपर्यंत त्याची वाच्यता करण्यात आली नव्हती. एक गुपित म्हणून ही घटना समाजापासून का दडवून ठेवण्यात आली होती याबद्दलचेही एक खास वेगळे कथानकच आहे. तथापि, एका गर्भश्रीमंत नि खानदानी जमीनदाराला—शमशादच्या खुनी व्यक्तीला कायद्याच्या पोलादी पंजातून सोडविण्याकरता उधळण्यात आलेल्या लाखो रुपयांनीच अखेर या खुनाला वाचा फुटली.

शमशादच्या खुनाच्या बुडाशी, तसे पाहिले तर, कुठलेही महान नि अतर्क्य असे गूढ किंवा रहस्य नव्हते. नवाब महंमद नवाझखान या एका कोट्यधीश जमीनदाराने—जहागीरदाराने, शमशादचा खून केला यांत संदेह नव्हता. शमशादचा खून संतापाच्या भरात करण्यात आला की, मनोविकारांच्या आहारी जाऊन नवाब महंमद नवाझखानाने तिला ठार केले, कसेही असले तरी महंमद नवाझखानानेच तिचा खून केला ही एक सत्य घटना ! " माझे शमशादवर प्रेम होते; तिच्याशी मला लग्न करायचे होते; तिला ठार करण्यासारखे माझ्याजवळ कुठलेही कारण नव्हते,'

असे जरी त्याने आपल्या बचावाच्या वेळी कोर्टात सांगितले तरी त्याने तिला गोळी घालून ठार केले, ही वस्तुस्थिती होती. तथापि, त्यानेच तिला ठार केले किंवा दुसऱ्या कोणाकडून तिची हत्या झाली, हा विचार क्षणभर डोक्यातून काढू या! या निर्घृण घटनेतील अतिशय विस्मयजनक, अतर्क्य, आणि नाट्यमय भाग हा की, मध्यरात्रीच्या सुमारास शमशादचा खून केल्यानंतर महंमद नवाझखान शय्येवर जवळजवळ दहा तासपर्यंत तिच्या मृत देहाला एखाद्या प्रियकराप्रमाणे घट्ट कवटाळून तशाच अवस्थेत पडला होता. किती स्तिमित करणारी घटना! प्रेयसीला यमसदनाला पाठविल्यानंतरही तिच्या प्रेताची शय्यासोबत! खुनी जगतातील अनुपमेय प्रकार!

तथापि, पोलीस, न्यायमूर्ती, वकील नि ज्यूरी यांपैकी एकानेही या नऊ-दहा तासांच्या अवधीत महंमद नवाझखान तिच्या मृत देहाला बिलगून करीत तरी काय होता याची शहानिशा करण्याचा एकदाही प्रयत्न केला नाही, हे या सर्व कथानकांतले आणखी एक आश्चर्य!

नबाब महंमद नवाझखानला दोषी ठरविण्यात आले तेव्हा लोकांचे या खटल्यातले कुतूहल शिगेस पोहोचले होते. क्लब्स, हॉटेल्स इत्यादी समाजातील नित्याच्या चर्चाकेंद्रांत या खटल्याबद्दलची चर्चा जोगत सुरू होती. धनाढ्य जमीनदार वर्गातले त्याचे उच्च स्थान, त्याच्या पायाशी लोळण घेणारी गडगंज धनदौलत, त्याला दोषी ठरविण्यात सेशन्स जज्जांनी केलेली चूक, त्याच्यावर ओढवलेल्या खुनाच्या आरोपाचे गंडांतर टळावे म्हणून आणि तसेच त्याच्या दुर्दैवाचा फायदा घेण्याच्या हेतूनेही, त्याच्या धनदौलतीचा काही भाग लाटण्याच्या हेतूने काही आपमतलबी नि स्वार्थी मंडळीने केलेली धडपड आणि त्याच्या आकस्मिक मृत्यूमुळे त्यांच्या वाट्यास आलेली निराशा, खटल्याच्या सुरवातीला अनेक गोष्टींवर त्याने उधळलेला पैसा, या दोषारोपातून मुक्तता करण्याच्या हेतूने साक्षीदार विकत घेण्याकरता लक्षावधी रुपये पेरण्याची त्याने चालविलेली प्रयत्नांची पराकाष्ठा, इत्यादी चर्चेचे तुफान सत्र समाजात सर्वत्र जोरात सुरू होते. यातील भाग खरा असो वा खोटा असो! यांपैकी काही मार्ग प्रत्यक्ष आचरण्यापूर्वीच नबाब महंमद नवाझखान लाहोरच्या "हॉस्पिटलात," वयाच्या अवघ्या ३१ व्या वर्षीच, यकृताच्या व्याधीने मरण पावला. तथापि, मरण्यापूर्वी आपल्या जीविताचे एकमेव ध्येय नि आसक्ती— मानवी जीवनातील सर्व प्रकारचे विषयवासनेचे सुखोपभोग त्याने यथेच्छ भोगून घेऊन स्वतःची पूर्ती करून घेतली. काही म्हणून काहीही उपभोगण्याचे त्याने शिल्लक ठेवले नाही. तथापि, त्याची शोकांतिका ही एका भ्रमनिरास झालेल्या हताश माणसाची शोकांतिकाच ठरली.

## महंमदाचे चरित्र

पंजाबमधल्या 'झंग' या गावी १९११ मध्ये महंमद नवाझखानचा जन्म जुलैत

झाला. त्याच्या जन्मानंतर थोड्याच वर्षांनी त्याचा बाप–नवाब मेहेर हक् नवाझखान– मरण पावला. त्या वेळी महंमद नवाझखान केवळ एक कोवळा पोर होता. त्याच्या वडिलांच्या पश्चात त्यांच्या दोन विधवा स्त्रिया फक्त उरल्या होत्या. महंमद नवाझखानची एक सख्खी आई नि एक सावत्र आई ! या दोन आयांच्या आत्यंतिक प्रेमाच्या छायेत तो लहानाचा मोठा झाला. एक कोवळा नि गोंडस पोर म्हणून तो सर्वांनाच फार आवडत असे. शाळेतही तो सर्वांचा लाडका बनला होता. त्याचे बालपण एका युरोपियन शिक्षकाच्या आधिपत्याखाली गेले होते. त्याला उत्कृष्ट शिक्षण मिळत गेले होते. ज्यातून ज्ञानी नि सुसंस्कृत अशी एक पिढी निर्माण झाली त्या लाहोरच्या 'अॅट्चिसन्' कॉलेजातही त्याने ज्ञानार्जन केले होते. एक सुसंस्कृत नि सृजनशील असा शिष्ट नागरिक म्हणूनच तो या कॉलेजातून शिक्षण घेऊन बाहेर पडला. त्याच्यातला एकमेव आदरणीय गुणधर्म म्हणजे त्याची सभ्य नि शिष्टसंमत वर्तणूक ! अभ्यासात तो तितकासा तल्लख नव्हता.

वडिलांच्या मृत्यूनंतर महंमद नवाझखान पंजाबमधल्या एका प्रचंड धनदौलतीचा मालक बनला. पंजाबमधल्या अनेक मांडलिक राज्यांच्या संपत्तीच्या कैक पटींनी अधिक अशी त्याची जमिनदारी होती. तो तारुण्यात आला तेव्हा अतिशयच देखणा दिसू लागला. त्याच्या सौंदर्यावर नि गर्भश्रीमंतीवर अनेक उपवर कन्यकांच्या माता बेहद्द खूष होत्या. इतर कुठल्याही मुलीच्या तो प्रेमात पडण्यापूर्वी पंजाबमधल्या एका अत्यंत प्रतिष्ठित नि हुद्देदार नवऱ्याच्या पत्नीने आपल्या मुलीची वर्णी त्याच्या पत्नीपदावर लावली. पंजाबच्या शिक्षणमंत्र्याचा–मियाँ फाजल हुसेन–यांचा –तो जावई बनला. हे लग्न फारच थाटात नि श्रीमंतीच्या वैभवात झाले.

महंमद नवाझखानाच्या पायाशी आता सर्व प्रकारची ऐहिक सुखे लोळण घेऊ लागली. स्वतःच्या गरजा भागविण्यापलीकडेही त्याच्याजवळ अफाट धन-दौलत होती त्याला एक अत्यंत देखणी नि चतुरस्र अशी मुलगी पत्नी म्हणून लाभली होती. या लग्नानिमित्ताने एका वजनदार असामीशी त्याचे नातेसंबंध जडले होते. त्याने मनात आणले असते तर सरकारात मंत्रिपदावर वर्णी लागण्यासारख्या अनेक गोष्टी त्याच्या हातात खेळत होत्या. जिल्ह्याच्या मुस्लिम लीगचे अध्यक्षपद अगदी लीलया त्याला मिळाले असते.

तथापि, त्याच्या वैवाहिक जीवनाची गाडी प्रथमपासूनच आडमार्गाला लागली. त्याच्या वैवाहिक जीवनाची सुरवातच त्याच्या पत्नीची एकप्रकारे शोकांतिका ठरली. कायदेशीररीत्या झालेल्या त्याच्या एकाच बाईवर त्याची नजर स्थिर राहीनाशी झाली. जीवनाच्या इतर अंगाकडे नि ढंगाकडे त्याची नजर भिरभिरत राहिली. विवाहबाह्य अशी अनेक प्रलोभने त्याचा वेध घेऊ लागली. एक मुलगी झाल्यावरही त्याच्या चंचलवृत्ती बंधनात राहिल्या नव्हत्या. दर महिन्याला वीस हजार रुपये त्याला खर्चाला अपुरे पडू लागले. झंग येथील आपल्या वैभवशाली

प्रासादात त्याने मांडलेल्या बाई नि बाटलीच्या खेळावर झालेल्या कर्जाची फेड करण्याकरता काही जमिनी त्याने विकल्या आणि काही गहाण टाकल्या. एकाच ठिकाणी राहण्याचा कंटाळा आल्यामुळे, एखाद्या मोंगल सम्राटाप्रमाणे, बरोबर अनेक नोकर-चाकर, गायक-वादक, नर्तिका घेऊन त्याने देशात सर्वत्र हिंडण्याचा उपक्रम सुरू केला. बरोबर अफाट पैसा घेऊन, जो गायक अथवा जी बाई आपल्यास हवे ते सुख देईल त्या सर्वांना मोठ्या दिलदारपणाने पैसे वाटण्याचा सपाटा त्याने सुरू केला. याचना म्हणूनही ज्यांनी त्याच्यापुढे मदतीकरिता हात पसरला त्या सर्वांनाही मूठमूठ भरून देण्याचा धडाका त्याने लावला. "हा घ्या पैसा; मजा करा; माझ्याजवळ अखेरपर्यंत तो राहणार नाही! त्याचा तुम्हांला झालाच तर काहीतरी उपयोग नक्की होईल!" अशी त्याची वाणी होती.

अनाठायी नि अतीव औदार्य हा त्याचा एक दोष ठरला.

१९३६ मध्ये त्याने प्रथम पत्नीपासून घटस्फोट घेतला आणि दुसऱ्या एका बाईशी त्याने लग्न केले. तथापि, त्याची ही दुसरी बायकोही अल्पावधीतच मरण पावली.

## पहिली भेट

दुसरे महायुद्ध सुरू झाले. महंमद नवाझखान लष्करात दाखल झाला. त्याला 'किंग्ज कमिशन' मिळाले. भरती करणाऱ्या विभागाचा प्रमुख म्हणून त्याची नेमणूक झाली. आपल्या आयुष्यात एक नवीनच चैतन्य निर्माण झाल्यासारखे त्याला वाटले. बाई-बाटलीपेक्षा काही निराळे विश्व असते याची त्याला जाणीव झाली. बाई-बाटली नि संपत्तीची उधळपट्टी यांच्यासाठी कदाचित होऊ शकणारा आपला अधःपात टळू शकेल, अशीही एक सुखद जाणीव या नवीन व्यवसायाच्या निमित्ताने त्याला झाली. आत्यंतिक मदिरा-सेवन आणि विषय-वासना या गोष्टी सर्वसामान्य पण सदाचरणी जीवनाशी विसंगत असून, या दोन्ही गोष्टींचा एकत्र मिलाफ कदापिही होऊ शकणार नाही, हे त्यास उमगले. मदिरा-सेवनाने आणि स्त्री-सुखभोगात आपल्या देहाची – शरीरसंपत्तीची अति नासाडी झाल्याचे त्याला कळून चुकले होते. त्याचा देह जरी वरकरणी स्थूल नि भरदार वाटला तरी आतून तो पोखरला गेला होता; देहातले खरे जीवनसत्त्व पूर्णपणे विनाश पावले होते. उरली होती ती निव्वळ जोमाची आणि रंगाची विफल भावना. तथापि, डॉक्टर्स, वैद्य नि हकीम इत्यादींनी त्याच्या जीवनातला उत्साह–आनंद, थोड्याफार प्रमाणात का होईना, पण जागृत ठेवला होता.

२३ ऑक्टोबर १९४१ रोजी औषधोपचाराकरिता महंमद नवाझखान लाहोरला आला. तो लाहोरच्या सुप्रसिद्ध अशा 'फॅलेटी' या हॉटेलात उतरला. त्याचा या हॉटेलात मुक्काम असताना त्याची शमशादबाईशी ओळख झाली. शमशाद ही एक लावण्य सुंदरी नि व्यवसायाने नर्तिका होती. केवळ १५ वर्षांची, तारुण्याच्या उंबरठ्यावरील उफाड्याची पोर! शमशाद या 'फॅलेटी' हॉटेलात वरचेवर येत

असे आणि याच निमित्ताने तिचा व महंमद नवाझखानाचा परिचय झाला. परिचयाचे स्नेहात रूपांतर झाले. ६ नोव्हेंबरची एक रात्र त्यांनी एकमेकांच्या धुंद सहवासात घालविली. तिच्या सौंदर्यावर, विलोभनीय देहयष्टीवर नि विषयलोलुप खेळकरपणावर तो फिदा झाला. तिने दिलेल्या विषयसुखाची खास बक्षिसी म्हणून महंमद नवाझखानने तिला एकरकमी १,७०० रुपये दिले. तिच्यावर संपत्तीची उधळण केली. आपल्या मुलतान जिल्ह्यातील 'खानबहाद्दुर गड' या गावीही तिला नेण्याचे ठरविले. शमशादने या आमंत्रणाचा मोठ्या सन्मानपूर्वक स्वीकार केला.

दुसऱ्याच दिवशी दोघांनी मुलतानच्या दिशेने कूच केले. त्यांच्याबरोबर शमशादचा एक भाऊ तालेब हुसेन, दोन नोकर वगैरे मंडळीही होती. हे सर्व बिऱ्हाड लाहोरहून संध्याकाळच्या गाडीने निघाले. नोकरांव्यतिरिक्त इतर सर्वजण पहिल्या वर्गाच्या डब्यातून प्रवास करीत होते. पहाटे ४ वाजता गाडी 'खानेवाल' स्टेशनवर पोहोचली. तो दिवस ८ नोव्हेंबरचा होता. खानेवाल स्थानकावर गाडी उभी असतानाच, आपणांस बरे वाटत नसल्याबद्दल महंमद नवाझखानाने थोडीशी कुरकूर केली आणि प्रवासाची दिशा बदलून, 'खानबहादूर गड' ऐवजी त्याने 'झंग' येथे आपल्या प्रासादात जायचे ठरविले. त्याप्रमाणे 'खानेवाल' येथेच गाड्यांची अदलाबदल करून, शमशादसह, महंमद नवाझखान 'झंग' येथे दुपारी ११-३० वाजता पोहोचला.

झंग येथे आल्यानंतर आपला एक चुलत भाऊ-शराफत हुसेन-आपल्याच प्रासादात राहत असल्याचे महंमद नवाझखानच्या लक्षात आले. 'झंग'चा प्रासाद हा त्यांच्या सर्व कुटुंबीयांच्या मालकीचा होता. तथापि, महंमद नवाझखान अचानकपणे आलेला पाहून शराफत हुसेन त्या प्रासादातून मालकाच्या निवासाची सोय नीट व्हावी म्हणून बाहेर पडला नि आवारातीलच एका तंबूत राहण्यास गेला.

दिवस ८ नोव्हेंबरचाच होता. संध्याकाळी ५ वाजेपर्यंत महंमद नवाझखान, शमशाद नि इतर काही नोकर-चाकर प्रासादातील दिवाणखान्यातच वावरत होते. त्यानंतर मात्र महंमद नवाझ आणि शमशाद विश्रांती घेण्याकरता शयनगृहात गेले. रात्री ८ च्या सुमारास म. नवाझने खाना घेतला आणि सुमारे दहाच्या सुमारास आपल्या सर्व नोकर-चाकर मंडळींना महंमद नवाझने प्रासादातून बाहेर जाण्याची आज्ञा केली. या सेवकांत महंमद हुसेन नावाचा एक नोकर होता आणि 'लाहोर' ते 'झंग' या प्रवासात तो महंमद नवाझ बरोबर होता. प्रासादातून रात्री १० नंतर बाहेर पडल्यावर आवारातीलच पश्चिमोत्तर दिशेस असलेल्या एका छोटयाशा बंगलीत महंमद हुसेन झोपावयास गेला. या प्रासादाभोवती चारी बाजूंनी, आठ फूट उंचीची एक भक्कम भिंत होती नि तिला एकच प्रवेशद्वार होते.

आता सर्वत्र सामसूम झाली. आणि मध्यरात्री, प्रासादातून, "महंमद हुसेन को बुलाव", "महंमद हुसेन को जलदी बुलाव।" अशी एक कर्कश किंकाळी आर्त-

पणे घुमली. तिचा स्वर इतका धारदार नि आर्त होता की, त्या आरोळीने शेजारच्याच स्वयंपाकघरात निजलेला ' गामन ' नावचा स्वयंपाकी खाड्कन जागा झाला नि तो आरोळीच्या दिशेने धावला. आवारातील बंगलीत झोपलेले महंमद हुसेन इत्यादी सर्व सेवकही एव्हाना जागे झाले होते. तेही सर्वजण मालकाच्या शयनगृहाच्या दिशेने धावले. धापा टाकीतच हे सर्व नोकर चाकर शायनगृहात शिरले आणि डोळे विस्फारूनच समोरच्या दृश्याकडे मोठ्या अचंब्याने पाहतच राहिले. शयनगृहात त्यांना काय दिसले ? भयानक प्रकार ! महंमद नवाझखान मंचकावर शमशादला घट्टपणे कवटाळून निजला होता. तिची उशी रक्ताने माखली होती. जमिनीवर एक पिस्तूल पडले होते. तथापि, मध्यरात्रीच्या अंधारात हा सर्व प्रकार या नोकरांना दिसला तरी कसा ? होय ! त्यांना हे दृश्य दिसले ! त्यांनी आपल्या डोळ्यांनी ते चकित होऊन पाहिले. कारण त्या वेळी भिंतीवर एक विजेचा दिवा मंदपणे जळत राहिला होता. हा मंद प्रकाश पुरेसा होता. तो विजेचा दिवा जळतच होता. शराफत हुसेनला –– महंमद नवाझच्या चुलत भावाला –– त्वरित बोलावण्यात आले. तो धावतच आला. पण तो मात्र शयनगृहात शिरला नाही. त्याने महंमद हुसेनला ताबडतोब सल्ला दिला, " लाला मनोहरलाल या वकिलांना धावत जाऊन घेऊन ये ! " महंमद हुसेन मनोहरलालांकडे धावला.

' लाला मनोहरलाल 'ही त्वरित आले. तेही आ वासून या दृश्याकडे बघतच राहिले. तथापि, प्रत्यक्ष शयनगृहात न शिरता, बाहेरूनच, खिडकीतून त्यांनी पृच्छा केली. मंचकावर शमशादला बिलगून राहिलेल्या महंमद नवाझखानने, तशाच अवस्थेत उत्तर दिले, " शमशाद मेली आहे ! "

शराफत हुसेन, लाला मनोहरलाल आणि महंमद हुसेन त्यानंतर एका मॅजिस्ट्रेटच्या घरी गेले, नि तिथून पोलीस सुपरिंटेंडंटकडे गेल्यानंतर हा सर्व ताफा अखेरीस डेप्युटी कमिशनरच्या घरी आला. रात्रीचा उत्तर प्रहर होता. या बड्या बड्या शासकीय अधिकाऱ्यांचे उंबरठे रात्रीच्या वेळीच झिजविण्याचे प्रयोजन काय होते ? घडलेला प्रकार दाबून टाकण्याचा त्यांचा उद्देश होता काय ?

पहाटेचे साडेतीन वाजले. वरील मंडळींचा सर्व ताफा या वेळी पोलीस ठाण्यावर आला नि इथे ' पहिली खबर ' नोंदविण्यात आली. ही ' खबर ' कशा प्रकारे नोंदविण्यात आली ? " लाला मनोहरलाल हे महंमद नवाझखानच्या बंगल्यावर गेले नि त्यांनी बाहेरूनच, खिडकीतून, घडलेल्या प्रकाराबद्दल पृच्छा केली. त्यावर, ' शमशाद मेली आहे ', एवढेच प्रत्युत्तर महंमद नवाझखानने दिले. अधिक तपशील त्याने दिला नाही. महंमद नवाझखान अद्यापही शमशादच्या मृतदेहाला बिछान्यावरच कवटाळून पहुडला आहे ! "

' अली हुसेन ' हा एक पोलीस अधिकारी पहाटे ५–१५ वाजता गुन्हा घडलेल्या ठिकाणी–म्हणजेच प्रासादात–आला. त्यानेही महंमद नवाझखानला शमशादच्या



**मी प्यालो होतो, खुप प्यालो होतो; माझी शुद्ध जात चालली आणि...**

प्रेताला कवटाळून पडलेल्या अवस्थेत पाहिले. जमिनीवर एक पिस्तूल पडलेले होते नि एका विजेच्या दिव्याचा मंद प्रकाश खोलीत भरून राहिला होता. अली हुसेनने पिस्तूल उचलून त्याची नळी हुंगली. त्यातून नुकत्याच गोळ्या मारल्याचा एक प्रकारचा वास येत होता. पिस्तूल खोलल्यावर त्यात चार जिवंत नि दोन वाया गेलेली काडतुसे त्याला आढळली. ठासून भरलेली एक बंदूक आणि एका सूट केस-मध्ये आणखी काडतुसे भरलेले एक पिस्तूलही त्याला आढळले. बिछान्याजवळ दोन छोटी टेबलेही होती.

'अली हुसेन' आला तरी महंमद नवाझखानने शमशादचा मृत देह सोडला नव्हता, तो तशाच अवस्थेत पडून राहिला होता. पहाटे सहा वाजता 'गुलाम हैदर' हा एक वरिष्ठ पोलीस अधिकारी आला तेव्हाही तो तशाच अवस्थेत होता.

'गुलाम हैदरने' शयनगृहाची कसून तपासणी केली. पिस्तुलाचे दोन बार केले गेले होते. भिंतीमध्ये, जमिनीपासून सहा फूट तीन इंच इतक्या उंचीवर, एक गोळी

घुसलेली खूण होती. एक उडलेली गोळी जमिनीवर पडलेली होती. दुसरीचा पत्ता नव्हता. सकाळी ८–३० वाजता 'जगन्नाथ' नावाच्या छायाचित्रकाराला बोलवण्यात आले. त्याने शयनगृहाची काही छायाचित्रे घेतली. पहिले छायाचित्र कसले असेल ? अर्थातच मृत 'ज्यूलीयटला' कवटाळून पहुडलेल्या 'रोमिओ'चेच होते ! दुसरे कोणते असणार !

'महंमद शफी' हे मॅजिस्ट्रेट सकाळी ९ वाजता आले. महंमद नवाझखानने शमशादचा मृत देह अजूनही सोडलेला नव्हता. किती अघटित नि अतर्क्य हा प्रकार ! महंमद शफींनी सर्व सेवकांच्या जबान्या घेतल्या. क्रिमिनल प्रोसीजर कोडाच्या १६४ कलमान्वयेच या सर्व जबान्या घेण्यात आल्या.

बरोबर दहा वाजता महंमद नवाझखान शमशादच्या मृत देहापासून दूर झाला; मंचकावरून उठून बसला. त्याच्याजवळ प्रत्येकी दहा हजार रुपयाच्या दोन नोटा, आणि एक हजाराच्या पाच नोटा, असे एकूण २५,००० रुपये सापडले. तसेच, भारी किंमतीची सोन्याची कंकणेही ताब्यात घेण्यात आली.

## ऐतिहासिक खटल्याचा प्रारंभ

त्याच दिवशी महंमद नवाझखानवर शमशादच्या खुनाचा आरोप ठेवण्यात आला नि त्याची कोठडीत रवानगी करण्यात आली. 'झंगच्या' सेशन्स जज्जांनी त्याची जामिनावर सुटका केली. तथापि, आरोपाचे गांभीर्य लक्षात घेता, हायकोर्टाने त्याचा जामीन रद्द केला. प्रकृति-अस्वास्थ्याच्या निमित्ताने महंमद नवाझखानची हॉस्पिटलात रवानगी कारण्यात आली.

नबाब महंमद नवाझखानवर पुनश्च कोठडीत जाण्याचा प्रसंगच आला नाही !

का ? कसा ? कोर्टाने त्याची निर्दोषी म्हणून सुटका केली होती काय ?

१२ फेब्रुवारी १९४२ रोजी त्याच्यावरचा खटला सेशन्स कोर्टात सुरू झाला. त्याची श्रीमंती नि प्रतिष्ठा मोठी होती. एक दिलदार व्यक्ती म्हणून 'झंग'मध्ये तो फार लोकप्रिय होता. त्याचे वजनही दांडगे होते. साक्षीदार विकत घेऊन त्यांना आपल्या बाजूने उभे करण्याइतकी त्याची ऐपत होती. या सर्व गोष्टींचा विचार होऊन त्याच्यावरचा खटला लाहोर येथील सेशन्स जज्जापुढे सुरू झाला.

८ नोव्हेंबर १९४१ रोजी शमशादबाईचा मध्यरात्रीच्या सुमारास खून केल्याच्या आरोपावरून महंमद नवाझखानवरचा ऐतिहासिक खटला लाहोरला सुरू झाला. 'डी फॅलशॉ,' [आय. सी. एस.] या सेशन्सजज्जांपुढे हा खटला सुरू झाला; त्यांना मदतनीस म्हणून चार ज्यूरी होते. सरकारची बाजू– फिर्यादीची बाजू– 'सिद्दिक' या सरकारी वकिलांनी मांडली. आरोपीचे वकीलपत्र बॅरिस्टर 'मियाँ अब्दुल अझीज' या नाणावलेल्या फौजदारी वकिलाने घेतले. वकील, वृत्तपत्रांचे बातमीदार, आरोपीचे नातलग नि इतर मित्रमंडळी, इत्यादींनी कोर्ट खच्चून भरले होते. उत्सुकता शिगेस पोहोचली होती.

'डॉ. शेर सिंग' या 'झंग'च्या सिव्हिल सर्जनची साक्ष सर्वप्रथम सरकारतर्फे झाली. त्यांनी सांगितले, "९ नोव्हेंबर १९४१ रोजी मी शमशादच्या प्रेताचा पंचनामा करण्याच्या वेळी उपस्थित होतो. तिची शवतपासणी केल्यावर मला तिच्या मानेच्या डाव्या भागात, पाठीकडील बाजूस, पाव इंच व्यासाची जखम दिसली. गोळी डावीकडून उजवीकडे एका सरळ रेषेत घुसली होती. तसेच दुसरी गोळी डोक्याच्या मागील भागातून घुसून सरळ पुढे कपाळापर्यंत गेली होती. ज्या वेळी या गोळ्या तिच्यावर झाडण्यात आल्या त्या वेळी ती आपल्या उजव्या कुशीवर निजली असली पाहिजे. तसेच तिचे डोकेही किंचित वर उचलले गेले असावे. मला गोळी सापडली नाही. तथापि, उजव्या कानातूनच गोळी आरपार बाहेर पडली असावी. कारण उजव्या कानातून रक्त गळत होते. कानाच्या आतील बाजूची सर्व हाडे तुकडे होऊन पडली होती. कदाचित ही गोळी कवटीच्या आत कुठेतरी एखाद्या अदृश्य जागेतही जाऊन अडकली असण्याची शक्यता आहे. रात्री दहाच्या सुमारास जर आरोपीने मदिरा-सेवन केले असेल तर दुपारी २–३० पर्यंत अल्कोहोलचे सर्व अवशेष नक्कीच नष्ट झाले असले पाहिजेत. कारण मला आरोपीची तपासणी करताना अल्कोहोलचा अंशही सापडला नाही."

'डॉ. शेर सिंगना' गोळी सापडली नाही तरी, २० डिसेंबरला– म्हणजे ज्या दिवशी शमशादचा दफनभूमीत पुरलेला देह उकरून काढण्यात आला त्या दिवशी 'डॉ. सय्यद महंमद तुफाईल' या लाहोरच्या असिस्टंट सिव्हिल सर्जनना मात्र ती गोळी सापडली होती.

### महंमद हुसेनची साक्ष

'महंमद हुसेन' हा नोकर शासनातर्फे प्रमुख महत्त्वाचा साक्षीदार ! तो नमूद करतो, "२३ आक्टोबर १९४१ रोजी आरोपी महंमद नवाझखान लाहोर येथे



औषधोपचाराकरिता आला. त्याची नि शमशादची जानपछान होती. ती ' फॅलेटी ' हॉटेलात वरचेवर येत असे. ' खानेवाल ' स्टेशनवर आम्ही बेत बदलून, मुलतानला जाण्याएवजी, आम्ही ' झंग ' येथे आलो. आरोपीचा चुलत भाऊ शराफत हुसेन हा त्या वेळी झंग येथील प्रासादात राहत होता. आम्ही आल्यावर मात्र तो आवारातील एका तंबूत राहण्यास गेला. दिवाणखान्यात मी आरोपीला शमशादबरोबर असताना पाहिले होते. संध्याकाळी ५ चे सुमारास ते दोघेही शयनगृहात गेले. रात्री दहा वाजता आरोपीने सर्व नोकरांना बाहेर जाण्यास सांगितले. मी माझ्या बंगलीत गेलो. स्वयंपाकी गामन आणि शमशादचा भाऊ तालेब हुसेन दोघेही स्वयंपाकघरात निजण्यास गेले असावेत. दार्लसिंग हा चौकीदार पहाऱ्यावर होता. मध्यरात्रीच्या सुमारास गामन धावत धावत आला नि आरोपीने मला त्वरित बोलावले आहे, असे सांगू लागला. दार्लसिंगही असेच सांगू लागला. मी प्रासादाकडे धावत निघालो. वाटेतच मला बंदुकीसारखा मोठा कर्कश आवाज ऐकू आला. गामन नि दार्लसिंग माझ्यापुढेच धावत होते. मी न्हाणीघरातून शयनगृहात शिरलो. न्हाणीघराचा दरवाजा बंद होता तरी त्याला कडी लावलेली नव्हती. शमशादच्या मस्तकाखाली रक्ताचे थारोळे होते. आरोपीने डोळे घट्ट मिटून घेतले होते. खोलीत इतर दुसरे कोणीही नव्हते. आरोपी निजलेल्या बाजूस जमिनीवर एक पिस्तूल पडलेले होते. आरोपी अतिशय दारू पीत असे. खानेवाल स्टेशनवर सकाळी आठ वाजल्यापासूनच त्याने पिण्यास सुरुवात केली होती. तो रात्री दहापर्यंत पीतच होता. न्हाणीघरात संपलेल्या पाच व्हिस्कीच्या बाटल्या होत्या नि एक भरलेली बाटली शयनगृहात होती. बरीचशी मालमत्ता आरोपीने विकून टाकल्यामुळे त्याचा चुलतभाऊ शराफत हुसेन त्याच्यावर चिडला होता. जवळजवळ दोन-तीन लाखांची मालमत्ता आरोपीने फुंकून टाकली होती. दिवाणखाना व शयनगृह यांच्यामधील दरवाजा बंद असला तरी त्याला कडी लावलेली नव्हती. झालेला प्रकार दाबून टाकण्याकरिता काही प्रयत्न करण्याच्या आतच गुन्ह्याची वर्दी पोलिसात दिल्याने आरोपीची आई माझ्यावर रुष्ट झाली होती व तिने ९ नोव्हेंबरपासून मला नोकरीवरून काढून टाकले."

## शराफत हुसेन म्हणतो

स्वयंपाकी ' गामन ' हाही एक महत्त्वाचा साक्षीदार ! तो म्हणतो : " मध्यरात्रीच्या सुमारास ' महंमद हुसेन को बुलाव ' अशी एक भयानक किंकाळी मला प्रासादातून ऐकू आली. आम्ही दरवाज्याजवळ येतो न येतो तोच एक पिस्तुलाच्या गोळीचा आवाज ऐकू आला. मी तंबूतून शराफत हुसेनला खेचून बाहेर काढले. रात्री दहाच्या आधी मी तासभर आरोपीचे पाय चेपीत होतो. शमशाद नि आरोपी एकाच बिछान्यावर पडले होते. मी जेव्हा झोपण्यास निघालो तेव्हा शयनगृहांत आरोपी नि शमशाद यांच्याखेरीज कोणीही नव्हते. मी निघालो तेव्हा एक

विजेचा दिवा मंदपणे जळत होता. ही वेळ रात्री दहाची होती. असा मंद दिवा रात्रभर जळत ठेवण्याची आरोपीला सवय होती."

'दार्लसिंग' या नेपाळी चौकीदाराने बव्हंशी हेच कथानक सांगितले.

'खैरुन्निसा' आणि 'झोरा' या दोन गणिका! [त्यांनी साक्ष दिल्यामुळे पुढे त्यांचाही खून करण्यात आला.] या वेश्या नमूद करतात : "८ नोव्हेंबर रोजी आम्हांस प्रासादात बोलाविण्यात आले होते नि आम्हांस गायनाची फर्माइश करण्यात आली. आरोपीने शमशादलाही गायनाची फर्माइश केली. तथापि, तिने ते नाकारल्यामुळे आरोपी तिच्यावर गरम झाल्याचे आम्हांस दिसले."

शमशादचा भाऊ 'तालेब हुसेन' याने सांगितले : "आरोपीच्या शयनगृहातून रात्री ८ ते ९ च्या दरम्यान माझी वहीण एकदाच बाहेर आली होती. तिने आपला खाना माझ्याबरोबर घेतला नि त्यानंतर ती पुन्हा आरोपीच्या शयनगृहात गेली. आरोपीने माझ्या बहिणीला १,७०० किंवा १,८०० रुपये दिले होते. आम्ही मोठ्या आनंदाने त्याच्याबरोबर लाहोरहून निघालो. माझ्या बहिणीने आरोपीच्या वर्तनाबद्दल कधीही तक्रार केली नाही."

आरोपीच्या चुलत भावाने – 'शराफत हुसेन' – याने कोर्टात सांगितले : "मी आवारातील तंबूत निजण्यास गेलो हे खरे आहे. मध्यरात्रीच्या सुमारास महंमद हुसेन याने मला झोपेतून उठवले. मी शमशादचा खून केला नाही. आमच्या कुटुंबाच्या वडिलोपार्जित इस्टेटीपैकी जवळ जवळ लाखाची घनदौलत आरोपीने विकून टाकली आणि आलेला पैसा त्याने दारूवर नि व्यभिचार करण्यात उधळला. ही इस्टेट विकत घेणारांना मी योग्य वेळीच वर्तमानपत्रात जाहिरात देऊन इषाराही दिला होता. मीही या धनदौलतीचा एक वारसदार आहे नि होतो. आरोपीचे हे कृत्य मला बिलकुल आवडले नाही नि मी त्याचा निषेवही केला होता. ही इस्टेट कोर्टाने ताब्यात घ्यावी, असा अर्जही मी केला होता. माझे नि आरोपीचे संबंध विशेष सलोख्याचे नव्हते. पोलीस ठाण्यावर गुन्ह्याची खबर दिल्यावर लाला मनोहरलाल वकील आरोपीच्या बंगल्यावर आमच्याबरोबर आले होते. पोलीस ठाण्यावर 'पहिली खबर' नोंदविल्यावेळी लाला मनोहरलाल हजर होतेच. मी आरोपीच्या विरुद्ध कोर्टात जे अर्ज केले त्या संबंधात मी मनोहरलाल यांचा सल्ला घेतला होता. कोणाचा तरी खून झाला आहे हे माहीत असूनही मी आरोपीच्या शयनगृहात गेलो नाही. कारण आरोपीचे नि माझे बिथरलेले संबंध विचारात घेता, मी जर शयनगृहात शिरलो असतो तर कदाचित् मीही या भयंकर प्रकरणात गोवला जाण्याची भीती मला वाटत होती."

प्रत्यक्ष आरोपीची लेखी जबानी वाचण्यात आली. तीत महंमद नवाझखानने नमूद केले होते : "माझ्यावरचा आरोप मी नाकारतो. ८ नोव्हेंबरच्या दुपारी मी शमशादवर रागावलो होतो, भडकलो होतो, हे खोटे आहे. कोर्टात हजर केलेले

रिव्हॉल्व्हर माझेच आहे. ९ नोव्हेंबरच्या सकाळी ९ पर्यंत मी शमशादच्या मृत-देहाबरोबर शय्या केली हे खरे आहे. तथापि, मी शय्या सोडल्यास माझाही खून होईल, असे लाला मनोहरलाला यांनी सांगितले होते. म्हणूनच मला तसे करणे भाग होते. त्यानंतर माझी शुद्धी जात चालल्याचे मला कळून चुकले. मी मॅजि-स्ट्रेटच्या कोर्टात दिलेले लेखी निवेदन बरोबर आहे. मला आणखीही काही सांगा-यचे आहे. मी शमशादचा खून केला नाही. मी निरपराधी आहे. तिचा खून करण्यासारखे मजजवळ काहीच कारण नव्हते. मी तिला भरपूर पैसा नि एक मौल्यवान अंगठीही दिली होती. तिच्याशी लग्न करण्याच्या हेतूनच मी तिला माझ्याबरोबर आणले होते. माझ्या विरुद्ध सादर केलेले साक्षी-पुरावे खोटे आहेत. त्यांना कसलाच आधार नाही. माझी प्रचंड मालमत्ता बळकावण्याच्या हेतूनेच हे सगळे साक्षीपुरावे शमशादच्या मृत्यूनंतर काही दिवसांनी तयार करण्यात आले. माझी बायको जिवंत नाही; मला मुलगा नाही. माझी स्थावर नि जंगम इस्टेट खूपच आहे, माझ्या सावत्र आईकडून यातली काही इस्टेट मला मिळाली आहे. ही कोर्टाच्या ताब्यात जावी म्हणून माझे शत्रू खूप प्रयत्न करीत आहेत. गेली दोन अडीच वर्षे माझे नि शराफत हुसेनचे संबंध ठीक नाहीत. तरीही



एक आमच्या कौटुंबिक मालमत्तेचा वारसदार आहे. वरकरणी त्यांनी सलोखा दाखविण्याचे जरी नाटक केले तरी मी काही इस्टेट विकून टाकली. यामुळे तो माझ्यावर रुष्ट झाला आहे. त्याला हे रुचलेले नाही.

घडलेल्या प्रकाराच्या रात्री मी दहा वाजेपर्यंत दारू पीत होतो. त्यानंतर मी शमशादबरोबर शय्या करण्यास शयनगृहात गेलो, खोलीत एकही दिवा जळत नव्हता. माझे सर्व सेवक झोपण्यास आपआपल्या जागी गेले होते. आसपासच्या खोल्यांचे दरवाजे बंद असले तरी त्यांना कड्या लावलेल्या नव्हत्या. न्हाणीघराचा दरवाजा सताड उघडाच होता. आदल्या रात्रीच्या प्रवासानें मला शीण आला होता. मी खूप दमलो होतो. माझी प्रकृतीही ठीक नव्हती. अतिरिक्त मदिरा-सेवनामुळेही मला गाढ झोप लागली. तथापि, आकस्मिकरीत्या झालेल्या एका कर्कश आवाजानें मला एकदम जाग आली. मी महंमद हुसेनला हाका मारल्या नि एवढ्यातच एक मोठा बारही मी ऐकला. गुन्हेगार त्यानंतर जोरात पळून गेलेला मी पाहिला. मी भयभीत झालो होतो."

## मग खुनी कोण ?

महंमद नवाझखाननेच शमशादचा खून केला, यासंबंधी प्रत्यक्ष असा कुठलाच पुरावा नव्हता. शिवाय दुसरीच एखादी व्यक्ती दिवाणखान्याच्या किंवा न्हाणी-घराच्या दरवाजातून शयनगृहात शिरण्याची शक्यता नाकारता येण्यासारखी नव्हती हा अतिशय महत्त्वाचा मुद्दा महंमद नवाझखानच्या पथ्यावर पडणारा नव्हता काय ? तसेच शमशादला ठार करण्यात महंमद नवाझखानचा काही दुष्ट हेतू होता, असाही पुरावा कोर्टापुढे आला नव्हता. फौजदारी खटल्यात आरोपीची वर्तणूक आणि 'अंतर्यामीचा कुटिल हेतू' या दोन गोष्टींना निःसंशय मोठे महत्त्व असते. उलटपक्षी, शमशादला — केवळ एका १५ वर्षांच्या देखण्या युवतीला — सतराशे रुपयांचा नजराणा एका मुठीने देण्यात महंमद नवाझखानचे औदार्यच नि तिच्या-बद्दल त्याला वाटणारी प्रीतीच सिद्ध होत नव्हती काय ? जरी प्रत्यक्ष त्यानें तिच्याशी लग्न केले नसते तरीही तिला सुखात ठेवण्याचा हेतू उघड नव्हता काय ? त्याने दिलेला भरपूर नजराणा स्वीकारण्यातही त्याच्या हेतूचा शमशादनेंही आदर केला नव्हता काय ? मग त्यानें तिला काय म्हणून ठार करावं ?

नवाब महंमद नवाझखानचा बचाव करण्यास या सर्व महत्त्वपूर्ण मुद्द्यांची भर-भक्कम तटबंदी जय्यत तयार होती. त्याच्यातर्फे साक्षात बुद्धिवादच कोर्टात उभा ठाकला होता.

तर मग शमशादचा खून केला तरी कोणी ?

" शासनाने — फिर्यादीने — आरोपीचा कुटिल हेतू मुळीच सिद्ध करून दाखवि-लेला नाही; सबब त्याला दोषमुक्त करण्यात यावे ! " ज्यूरींनी शिफारस केली.

सेशन्स जज्ज या निर्णयाशी सहमत नव्हते. आरोपीनेच शमशादचा खून केला,

असे फिर्यादीपक्षानें सिद्ध केले आहे, असे त्यांचे मत होते. नाहीतर दुसऱ्या कोणाची शक्यता होती ? सेशन्स जज्जांपुढे फक्त चारच पर्याय विचारार्ह होते.

१. आरोपीने मुद्दामच तिचा खून केला असावा;
२. बाहेरची दुसरीच कोणी एखादी व्यक्ती शयनगृहात घुसली असली पाहिजे आणि आरोपीवर अथवा शमशादवर पिस्तुलाचा नेम धरून मारण्याच्या गडबडीत गोळी, अनवधानाने, शमशादला लागली असावी.
३. शमशादनेच आत्महत्या केली असावी, किंवा
४. शमशादला अनवधानाने किंवा चुकीनें किंवा केवळ योगायोग म्हणून, आरोपीची गोळी लागली असावी.

यांपैकी तिसरी आणि चौथी शक्यता सेशन्स जज्जांनी साफ झिडकारून टाकली. ते म्हणतात : "आत्महत्या करण्याचे शमशादला काहीच कारण नव्हते. आरोपीनें मोठ्या दिलदारपणाने तिला सतराशे रुपये बक्षीस म्हणून दिले होते. त्याच्याजवळ पंचवीस हजार रुपये सापडले. यावरून तो अतिउदार असल्याचेच दिसते. अशा परिस्थितीत शमशादने आत्महत्या केली असती तर ते एक आश्चर्यच मानावे लागले असते. तिने जर आत्महत्या केली असती तर रिव्हॉल्व्हर बिछान्यावर पडलेले अथवा निदान तिच्या हातात तरी सापडायला पाहिजे होते. तेव्हा आत्महत्येची कल्पना अशक्य.

## जज्जांचा अहवाल

आरोपीच्या हातून अनवधानाने गोळी सुटून ती शमशादला लागण्याची दूरान्वयाने थोडीशी शक्यता मानता येईल. नशेमध्ये पिस्तुलाशी चाळे करीत असताना अहेतुकपणे गोळी सुटून ती शमशादला लागण्याची शक्यता गृहीत धरली, तरी खुद्द आरोपी असे काही घडल्याचे म्हणत नव्हता. शिवाय, त्याने दोनदा गोळी झाडली होती, हे दृष्टीआड करता येणार नाही. पहिली गोळी अनवधानानें एकवेळ लागण्याची शक्यता आहे. पण दुसरीही चुकून कशी लागेल ? तेव्हा अनवधानाची किंवा अहेतुकपणाची शक्यता नाही !"

पहिल्या दोन पर्यायांबद्दल सेशन्स जज्ज लिहितात : "आरोपीच्या शयनगृहात जाण्याचा एकमेव मार्ग म्हणजे न्हाणीघराचा दरवाजा होता. 'महंमद हुसेन को बुलाव !' अशी आरोळी आल्यावर सर्व सेवक प्रासादाकडे धावत निघाले असतानाच त्यांनी एक आवाज ऐकला होता. त्यामुळे शमशादला मारून कोणी जर न्हाणीघरामार्गे शयनगृहातून पळून गेला असता तर तो तसा पळून जाताना या सर्व नोकर-चाकरांना नक्कीच दिसला असता. कारण ते सर्वजण आवाजाच्या दिशेनेच धावले होते. शिवाय आरोपीचा बचाव करण्याच्या हेतूने जरी या सर्व सेवकांनी आपल्या साक्षी दिल्या असल्या तरी, बाथरूममधून कोणी पळून जाताना त्यांनी पाहिल्याचे त्यांपैकी कोणीही सांगत नाही. तसेच, अशी कोणी एखादी व्यक्ती

प्रासादातून पिस्तुलाच्या आवाजानंतर पळून जाताना दिसली किंवा सापडली असती तर या सर्वांनी प्रचंड आरडाओरडा केला नसता का? आणि तसे घडले असते तर सुरुवातीलाच गुन्हेगाराचा कबजा नसता का करता आला? इतर खोल्यातून शयनगृहाकडे जाण्याकरता दरवाजे होते तरी ते सर्वच शयनगृहाच्या आतील बाजूने कड्या लावून बंद केले असल्याचे पुराव्याने सिद्ध झाले आहे. तसेच, दिवाणखान्या-चेही दरवाजे कड्या लावून बंद केले होते. तेव्हा न्हाणीघराचा दरवाजा – कडी न लावलेला दरवाजा – हाच एक शयनगृहाकडे जाण्याचा मार्ग शिल्लक राहिला होता. शराफत हुसेन याने शमशादचा खून करण्याची शक्यता नाही. तसेच दुसरा कोणी मारेकरी भाड्याने आणून त्याच्याकरवी हे कृत्य घडण्याची शक्यता नाही. कारण आरोपीचे झंग येथे येणे अनपेक्षितरीत्या घडले होते. याबद्दल कोणालाही पूर्वकल्पना नव्हती. शराफत हुसेन याने हे कृत्य केले असे जरी गृहीत धरले, तरी त्याला एक-ट्यालाच हे कृत्य करता येणे शक्य नव्हते. इतर नोकरांपैकी कुणाचे तरी साहाय्य त्याला घ्यावे लागलेच असते; त्याच्याशी संगनमत करूनच त्याला ते करता आले असते; अन्यथा नाही!"

आरोपीची शमशादच्या मृतदेहाशी दहा तास शय्यासोबत हा या सर्व प्रकरणांतील भयंकर नि चमत्कृतिजन्य भाग! सेशन्स जज्ज त्याबद्दल नमूद करतात, "आरोपीच्या या विक्षिप्त कृतीचे वर्णन करायला शब्द अपुरे पडतील. 'अतर्क्य', 'विक्षिप्त', 'चमत्कारिक' हे शब्द फारच फिके पडतील. या बाबतीत महंमद हुसेनच्या साक्षीवर विश्वास ठेवावाच लागेल. लाला मनोहरलाल हे वकील आल्यानंतरही, 'शमशाद मेली आहे,' असे बिछान्यावरून प्रत्युत्तर करण्यापलीकडे आरोपीने इतर कोणा-बद्दलही कसलाही आरोप केलेला नाही. खैरुन्निसा व झोरा यांच्या सांगण्यात तथ्य नाही. शमशादने गाण्याचे नाकारल्यामुळे आरोपी तिच्यावर गरम झाला या म्हण-ण्यात अर्थ नाही!"

घडलेल्या प्रकाराची सेशन्स जज्जांनी संगती लावली ती अशी :– "रात्रीच्या वेळी आरोपी दारूच्या नशेत बेहोष झाला असला पाहिजे– नव्हे तो तसा होताच! मध्यरात्रीचा प्रहर आणि रात्रीची एकची वेळ या दरम्यान आरोपीचे काहीतरी बिनसलेले असले पाहिजे. तो बैचेन नि अस्वस्थ झाला असला पाहिजे. म्हणूनच, 'महंमद हुसेन को बुलाव' अशी आरोळी त्याने मारली. त्याच वेळी काहीतरी निमित्त होऊन त्याने रिव्हॉल्व्हर उचलले आणि, आपल्या कृतीचे परिणाम काय होतील याची जाणीव न बाळगता, त्याने शमशादवर गोळी झाडली. जिथे आरोपीने स्वत:च्या हातानेच आपल्या पायावर धोंडा पाडून घेतला तिथे 'नशेचा अंमल' ही लंगडी सबब चालू शकत नाही. आरोपीनेच शमशादचा खून केला आहे नि म्हणूनच 'इंडियन पीनल कोडाच्या ३०२ कलमा'न्वये तो दोषी ठरला आहे!"

तथापि, महंमद नवाझखान याला फाशीची शिक्षा न होता जन्मठेप देण्यात

आली. "एकंदरीत प्रकरणाचा पुराव्याच्या आधारे साकल्याने विचार करता आरोपीस फाशीची शिक्षा न देण्यास सबळ कारणे आहेत." सेशन्स जज्जांनी नमूद केले.

६ जून १९४२ रोजी आरोपीस जन्मठेप सुनावण्यात आली. त्यानंतर थोड्याच दिवसांनी महंमद नवाझखानने शिक्षेविरुद्ध हायकोर्टाकडे धाव घेतली.


तथापि, मानवनिर्मित कायदेकानूंच्या कचाट्यातून, मृत्यूच्या जबड्यातून, जरी त्याची सुटका झाली असली तरी निसर्ग-निर्मित कायदेकानूंनी त्याचा पिच्छा पुरवून त्याचा बळी घेतलाच ! ७ जुलै १९४२ रोजी, वयाच्या ३१ व्या वर्षी लाहोरच्या "मेयो हॉस्पिटलमध्ये" यकृताच्या विकाराने महंमद नवाझखान मरण पावला. दुसऱ्याच दिवशी त्याच्या अपीलाची सुनावणी 'सर डग्लस यंग' या पंजाब हायकोर्टाच्या मुख्य न्यायमूर्तीपुढे होणार होती. त्यापूर्वीच त्याच्या जीवनाची अखेर झाली.

'झंग' येथील प्रासादात ८ नोव्हेंबर १९४१ च्या भयानक रात्री प्रत्यक्ष काय घडले हे निश्चितपणे समजणे कदापिही शक्य नाही. त्या रात्री १५ वर्षांच्या, तारुण्याने बहरलेल्या शमशाद बेगम या एका नर्तिकेचा गोळी घालून खून करण्यात आला. ७ जुलै १९४२ रोजी शमशादचा प्रियकरही स्वर्गास निघून गेला. दोघेही हयात नाहीत.

प्रेयसीच्या मृतदेहाशी सतत ९-१० तासांची शय्यासोबत हा बुद्धीला आकलन होण्यापलीकडचा भाग ! या थरारक प्रकारामागील गूढ उकलणारी एकच व्यक्ती ! लाला मनोहरलाल वकील ! पण ते याबाबत मूग गिळून बसले !

महंमद नवाझखानच्या विश्वासातील एका त्याच्या स्नेह्याने मात्र, कालांतराने काही घटनांवर प्रकाशझोत टाकला. "महंमद नवाझखानकडूनच मला हे कळले," असेही तो म्हणाला.

नवाब महंमद नवाझखानने या मित्राच्या कानात काय सांगितले होते ?

सर्व प्रकारची वाद्ये मिळण्याचे
विश्वसनीय ठिकाण
नाविन्यपूर्ण इलेक्ट्रिक गिटार, मॅंडोलीन व
बुलबुलतरंग इत्यादींचे आद्य प्रवर्तक
हरिभाऊ विश्वनाथ कं
संगीत वाद्यालय
दादर, मुंबई २८.

" शमशाद लावण्यवती होती. पण सौंदर्यापेक्षाही ती कामुक, डिवचणारी, खेळकर नि मादक होती. एकांतात तिने मला खेळवले. विजयोन्मादाने मला ती कुत्सितपणे हसली. मी प्यालो होतो; खूप प्यालो होतो. तर्रर झालो होतो. तिच्याशी मला प्रेमाचे चाळे करायचे होते; धुंद होऊन विषयोपभोग घ्यायचा होता; पण माझी शुद्ध हळूहळू जात होती; शरीराने मी कमकुवत बनत चाललो होतो; निःसत्त्व होत होतो; माझ्या शक्तिहीनतेला, कमकुवतपणाला ती खदखदून कुत्सित बुद्धीने हसत होती. तिचे हास्य विजयोन्मादाने नि विकटतेने भरले होते; माझ्याकडे पाहत ती सतत खळखळून हसत होती. मी गरम झालो; चिडलो; त्रासिक बनलो; खूप तापलो. तिने मला एक जोराचा दणका दिला व मी बिछान्यावरून खाली पडलो. तसाच उठून उशीखालचे माझे पिस्तूल मी काढले नि तिच्यावर गोळी झाडली; तिला ठार केले."

आता शमशाद माझ्याकडे बघून विकट हास्य करणार नाही; कुत्सितपण माझी थट्टा करणार नाही; माझी टर उडविणार नाही !

मला माझ्या नोकरा-चाकरांची गरज भासली म्हणूनच मी दुसरा बार उडविला ! "

शमशादला जे चांगले ओळखत होते ते एकमुखाने कबूल करतील की, ती अत्यंत सुंदर होती; खेळकर होती; आपल्या उन्मादकतेने प्रतिपक्षाला डिवचणारी होती; आव्हान देणारी होती. पण आता मात्र ती हास्योन्मादाने हुरळून जाणार नाही; निदान श्रीमंतीने फुगलेल्या पण शरीरातून पोखरलेल्या शक्तिहीन नवाबांच्या बाबतीत तर नक्कीच नाही ! ●

शमशाद बेगम आता कल्पांतात चिरनिद्रा घेत पडली आहे !

[ बॅरिस्टर के. एल्. गोबा यांच्या ' The Murder of Shamshad Bai ' वरून ]



[ मणी मांसाचा माथ्यावरचा................पृष्ठ ७८ वरून ]

" कोण घालते रंग गंध या–
    पुष्पामधल्या मृदु दलातून ?
कोण गातसे तार स्वराने–
    घरघरणाऱ्या घन मेघांतून ?
मेघा पाहुन मयुरा अंगी–
    सळसळणाऱ्या तीव्रकळा का ?
आकाशाच्या भव्य विताना–
    लोभविणारा रंग निळा का ?
ध्यास असा का सरितेपोटी–
    रात्रंदिन नित धावायाचा ?
कसा तळपतो कधी न विझता–
    नील नभातील दीप रवीचा ?
शिशिर येता पर्ण झाडी–
    वसंतात ये नवी पालवी–
वृक्षामधली दावुन किमया–
    कोण जगाचे डोळे दिपवी ?
मधमाशीचे पोळे असते–
    कडेकपारी खूप उंचसे–
मरंद शोधित वनात फिरता–
    वाट तिथेची कशी न भुलते ?
कोळी आपुले जाळे विणतो–
    कृमीकीटकांनी पोट भराया–
त्या किटकांचा त्याच्या उदरी–
    कोण करितसे अखंड धागा ?
एकसारखी हलवित शेपूट–
    पाण्यामध्ये वलये घेतो–
रात्रीचा मग मीन परंतु–
    नीद्रा घ्याया कोठे जातो ?
एक पेरता दाणा उगवे–
    ठासुन भरले कणिस तयाचे–
कोण तयाला धरती पोटी–
    घास भरविते जीवरसाचे ?

निसर्गाचं हे एवढं अंगभूत आकर्षण महाभारतात दोनच व्यक्तींत प्रकर्षानं दिसून येतं. बृहस्पतीच्या पुत्रांत कचामध्ये व दुसरे अश्वत्थाम्यामध्ये.

एकीकडं निसर्गाची ही अंगभूत ओढ अश्वत्थाम्याला साद घालीत असतानाच त्याला पित्याच्या आग्रहाखातर शस्त्रशालेतील अस्त्रविद्येचं ज्ञानही शिकावं लागलं. सर्व राजपुत्रांसमवेत तो त्रिशूल, तोमर, गदा यांचे हात शिकू लागला आणि कुरूंच्या या अस्त्रशालेत अश्वत्थाम्याच्या जीवनातील तिसरी महत्त्वाची घटना घडली.

राजमाता कुंतीदेवीनं ज्याचा त्याग केला होता आणि जो एका प्रभाती अधिरथाला गंगेच्या लाटावर हिंदोळताना सापडला होता तो सूर्यपुत्र असूनही सूतपुत्र मानला गेलेला कर्ण आपल्या पालनकर्त्या पित्याबरोबर अधिरथाबरोबर कुरूंच्या अस्त्रशालेत आला !

अश्वत्थामा आणि कर्ण एका भावविश्वात आले. त्या दोघांची नाती अचूक काय होती हे व्यासांनी संदिग्ध ठेवलं असलं तरीसुद्धा त्यांना लाभलेली मांसल मण्यांची देणगी लक्षात घेतली की सर्व प्रश्न उकलतात. सामाजिक संकेत, व्यवहार सर्व सर्व भेदून जाणारा स्नेह त्यांच्यांत त्यांना नकळतच निर्माण झाला. अश्वत्थाम्याला प्रियतम स्नेही मिळाला. अगदी अचूक शब्दांत सांगायचं तर–

"कथा रंगली दोन मनांची–
झगमगणाऱ्या तीन मण्यांची–
नाती जडली दोन ध्रुवांची–
विप्रवरासत एक सूताची ! !"

असंच म्हणता येईल.

कुरूंच्या शस्त्रशालेत अश्वत्थामा शरीरानं बलदंड झाला. या कालावधीत एक गोष्ट मात्र सूक्ष्मपणे सिद्ध होऊन गेली ती ही की, साक्षात द्रोणाचा पुत्र असूनही तोही त्यांचा मानसपुत्र वाटावा एवढा द्रोणांनी अर्जुनाला जवळ केला. याला एकच घटना घडली ती नारायणास्त्राची. द्रोणांनी अत्यंत मौलिक असं नारायणास्त्र फक्त दोघांनाच दिलं. एक अश्वत्थाम्याला आणि दुसरं अर्जुनाला ! नारायणास्त्राच्या प्राप्तीनं बलदंड झालेला अश्वत्थामा सर्व राजपुत्रांच्या मालिकेत शोभावा असा तोडीस तोडीचा योद्धा झाला. खदिर वृक्षासारखा वाटणारा, वेदविद्यापारंगत असल्यानं नितळ सतेज दिसणारा अश्वत्थामा गुरुपुत्र या नात्यानंच नव्हे तर एक समर्थ योद्धा म्हणून सर्वांना प्रिय झाला. त्याची वाणी रसाळ होती, ब्रह्मविद्येचं अपूर्व तेज त्याच्या चर्येवरून ओसंडत होतं. वाढत्या वयाबरोबर त्याच्या मस्तकावरचा मांसल मणी दिवसेंदिवस तळपत होता. कर्णाच्या हिरण्यवर्णी कानांतील प्रकाशमान कुंडलं पाहता पाहता अश्वत्थाम्याला स्वतःच्या मस्तकावरील मण्याचं स्मरण होत होतं. ही कस्तुरी आपणाला का लाभली याचा वेध घेण्यासाठी त्यानं केलेल्या चिंतनातून त्याच्यातील अध्यात्मपुरुष विकास पावत होता. पण – पण चका-

कणारं सारंच सोनं नसतं हे सिद्ध व्हावं यासाठी धडपडणारी, असंख्य मी मी म्हण-विणाऱ्यांना नतमस्तक करणारी नियती अश्वत्थाम्याला तरी कशी वगळणार ? कदाचित हस्तिनापुरात न आल्यामुळं अश्वत्थाम्याचं एखाद्या महान तपस्व्यात रूपांतर झालंही असतं—पण घडायचं जे जे असतं ते ते घडूनच जातं. बलदंड झालेल्या कौरव-पांडवांत अपसमजाची – हेव्यादाव्याची, प्रथम दुर्लक्षनीय वाटावी अशी भेग पडली आणि क्षणाक्षणाला तिचा विस्तार वाढतच गेला. द्रौपदीच्या वस्त्रहरण-प्रसंगानं तर कुरुकुलाच्या शुभ्रधवल कीर्तीला काळिमा फासला गेला. कौरव-पांडव हे सरळ सरळ दोन पक्ष तयार झाले. यामध्ये लोंबकळत, टांगत, फरफटत गेले ते द्रोण, कर्ण आणि अश्वत्थामा. द्रोणांचा राजगुरू म्हणून युद्धाशी संबंध होता. कर्णाचा तर रक्तानं अटळ संबंध – पण – पण अश्वत्थामा भारतीय युद्धाच्या खाईकडं केवळ त्याच्या दैवगतीनंच खेचला गेला असंच म्हणावं लागेल.

कौरवपांडवांच्या दुभंगलेल्या मनांना सांधण्याचा, शिष्टाई करून श्रीकृष्णानं प्रयत्न केला. त्याच्या वाक्‌कौशल्याचा, प्रच्छन्न टीकेचा, दहशतवादाचा कोणताच परिणाम दुर्योधनावर झाला नाही. युद्ध हे अटळ सत्यच बाहेर आलं. साऱ्या आर्यावर्तातील समर्थ आणि चतुरंगदलसंपन्न सेना कुरुक्षेत्राभोवती आपल्या जीवनाचा अर्थ शोधण्यासाठी एकवटल्या.

आणि एका हिवाळ्यात कुरुक्षेत्राभोवती सुस्तावलेले धुक्याचे ढग त्या चाळीस लक्ष गर्भसमर्थ योद्ध्यांच्या हर्षरवांनी उधळून लावले. कौरव-पांडवांतील युद्धाला तोंड फुटलं.

आणि या युद्धात, मस्तकात आध्यात्मिक कल्लोळ आणि अंगावर योद्ध्याचा वेश घेऊन उतरला तो एकटा अश्वत्थामा ! पहिले दहा दिवस पितामह भीष्म कुरूंचे सेनापती म्हणून लढले. दहाव्या दिवशी ते विकलांग होऊन पडले. दोन्ही सैन्यांना धक्का बसला. अश्वत्थामा आपली मानसिक उतरंड त्या घटनेनं एक पायरी उतरून खाली आला !

अकराव्या दिवशी त्याचा परम प्रिय पिता द्रोण कुरूंचा सेनापती झाला. द्रोण पाच दिवस लढले. एव्हाना अनेक नामवंत योद्धे कामी आले होते. युद्धाच्या पंधराव्या दिवशी सेनेमध्ये कुणीतरी एक हूल उठविली. "अश्वत्थामा पडला ! अश्वत्थामा पडला !" आपला एकुलता एक मुलगा पडला या जाणीवेनं बधीर झालेल्या द्रोणांनी हातांतील शस्त्रं खात्री टाकून डोळे मिटून रथावरच पद्मासन घातलं. या संधीचा फायदा घेऊन द्रौपदीचा बंधु धृष्टद्युम्न हातात तळपणारं खड्ग घेऊन आपल्या रथातून खाली झेपावला. मागचापुढचा कसलाही विचार न करता द्रोणांनी एकत्र बांधलेले त्यांच्या मस्तकावरचे पांढरे शुभ्र केस हातात धरून त्या खड्गानं त्यांचं मस्तक धडावेगळं करून त्यानं ते सरळ धरणीवर फेकून दिलं ! दोन्ही सेनांना आता नात्याची ओढ उरली नाही. द्रोणांच्या त्या क्रूर वधाची अश्व-

त्याम्यावर एवढी सखोल प्रतिक्रिया झाली की, तो पुन्हा मानसिक दृष्टचा अनेक पायऱ्यांनी खाली कोसळला! याच वेळी त्यानं धृष्टद्युम्न्याच्या वधाची घोर प्रतिज्ञा केली. आता अश्वत्थाम्याचा जीवनसमुद्र ओहोटीला लागला होता. त्याचं, विकासाची ओढ असलेलं जीवनाकाश डोळ्यासमोरच्या काळचा घटनांच्या मेघांनी काळवंडू लागलं होतं. तरी तो बेहोष नव्हता. आपल्या मित्राला—कर्णालाच सेनापतिपदाचा अभिषेक कर असा आग्रह त्यानं दुर्योधनापाशी धरला.

सोळाव्या दिवशी कर्ण सेनापती झाला. तो दोनच दिवस सेनापती म्हणून लढला. पण पूर्वीच्या पंधरा दिवसांत झाला नव्हता एवढा घनघोर संहार कर्णानं दोन दिवसांत केला! पण त्याच्या रथाचं आणि कुरूंच्या दैवरथाचं चक्र धरतीत फसलं! त्या एका क्षणाचा अचूक लाभ घेऊन कर्णाला अर्जुनानं वधलं. ते पाहताना मात्र जीवनातील सत्यावरचा अश्वत्थाम्याचा विश्वासच उडाला. जणू काळाचं रथचक्रच आता मृत्यूच्या दलदलीत कुठंतरी खोल खोल घुसत चाललं आहे असं त्याला वाटलं! कर्ण पडला आणि अश्वत्थाम्याची उरलीसुरली मानसिक उभारी पार ढासळली.

युद्धाच्या अठराव्या व शेवटच्या दिवशी दुर्योधनाला भीमानं गदायुद्धात मांडी चिरून ठार मारलं. आता वास्तविक खऱ्या अर्थानं युद्धाचा शेवट झाला होता कारण दोन्ही

# साभार स्वीकार

## दैनंदिनी

ज्युपिटर पेपर मार्ट
रमेश क्षीरसागर
रघुनाथ लिथो वर्क्स
संगम प्रेस प्रा. लि.
हैद्राबाद मशिनरी कं. औरंगाबाद

## दिनदर्शिका

ज्युपिटर पेपर मार्ट
सोव्हिएट देश
ब्रिटिश इन्फर्मेशन सर्व्हिस
एम. आर. जोशी
व्हील्स बुक स्टॉल
नायक्रोम मेटल वर्क्स
प्रोफिशियंट शार्टहँड व टाईप. इत्यादि
मॉडर्न पेपर स्टोअर्स
रघुनाथ लिथो वर्क्स
देसाई पटेल पेपर कं
कोहिनूर एजन्सीज

[संपादक 'माणूस' साप्ताहिक]

पक्षांकडील मिळून दहावीस योद्ध व श्रीकृष्ण एवढेच विजय पाहण्यासाठी उरले होते. श्रीकृष्ण वगळता पांडव-द्रौपदीचे पुत्र-धृष्टद्युम्न आणि कौरवांकडील कृप, अश्वत्थामा व कृतवर्मा ही सर्व जिवंत मंडळी मनानं, शरीरानं, श्रांत झाली होती. संध्याकाळच्या मेसूर छाया सर्व रणभूमीवर पसरल्या होत्या. कुणीतरी पूर्वी पेटविलेले चुकार पलिते कुठल्यातरी शिबिरात जळत होते. दोन्ही पक्षांकडील थकलेले योद्धे आपापल्या शिबिरांत निद्राधीन झाले होते. एकट्या अश्वत्थाम्याला झोप येत नव्हती. त्याच्यातील तत्त्वचिंतक तडफडून गतप्राण झाला होता. उरला होता प्राकृतिक सूड ! धृष्टद्युम्न्याचा सूड ! पांडवांचा सूड ! तो तळमळत होता. आणि त्याला शिबिराच्या छतातील जाळीदार वीणेतून एक भयाण दृश्य दिसलं ! एक भूकग्रस्त घुबड वटवृक्षावरल्या कावळीच्या घरट्यात शिरून तिची पिल्लं आपल्या टणक चोचीनं खात होतं ! पिल्ले ओरडत होती ! अश्वत्थाम्यातील तत्त्वचिंतक शांत होत होता ! कुरूंचाच काय पण साऱ्या आर्यावर्ताचं राज्य दिलं असतं तरी त्याच्यातील तत्त्वचिंतक जे करू धजला नसता तेच कृत्य करण्यासाठी त्याच्यातील योद्धा तयार झाला ! हातात नग्न खड्ग घेऊन तो आपल्या शिबिराबाहेर आला. द्रौपदीचे पाच पुत्र ज्या शिबिरात विजयाची स्वप्नं पाहत झोपले होते त्या शिबिरात तो चोरपावलांनी आला. एकदा--फक्त एकदाच त्यानं आपल्या माथ्यावरच्या मण्यावरून हात फिरविला आणि दुसऱ्याच क्षणी आपल्या हातातील खड्गानं धृष्टद्युम्न आणि द्रौपदेयांना, द्रोणांना मान तुटताना काय वाटलं असेल ते दाखविण्यासाठी सरळ कापून काढलं ! अश्वत्थाम्याला आता मानसिक पायरीच नव्हती त्यामुळं ती उतरण्याचा प्रश्नच नव्हता !

दुसऱ्या दिवशी द्रौपदीला ही वार्ता समजली. तिनं पुत्रांसाठी आक्रोश मांडला. आणि जी चूक सूडापोटी अश्वत्थाम्यानं केली होती तीच चूक शोकापोटी द्रौपदी करू इच्छीत होती. अश्वत्थाम्याचा वध ! पण अश्वत्थामा चिरंजीव होता ! त्याला मारता येणं शक्य नव्हतं. परत पांडवांना राजकीय सल्ला देणाऱ्या श्रीकृष्णाची कसोटी आली ! त्यानं अचूक मार्ग काढला. अश्वत्थाम्याच्या माथ्यावरचा मांसाचा मणी कापून घेण्याचा ! ! तो मणी कापून घेताच चिरंजीव म्हणून जन्माला आलेला अश्वत्थामा 'चिरंजीव मरण' जगणार होता ! !

या कामासाठी भीम पुढं सरसावला. अश्वत्थाम्याचं आणि भीमाचं घनघोर युद्ध जुंपलं. कोणीच कोणाला शरण जाईना. कुरूंचा शेवटचा सेनापती म्हणून लढणारा अश्वत्थामा निर्बंध होता. तो हटत नव्हता. शेवटी श्रीकृष्ण मध्ये उभा ठाकला ! त्यानं अश्वत्थाम्याला सुचवलं की 'आता हे न संपणारं युद्ध थांबव आणि माथ्यावरचा मणी कापून देऊन दिसेल त्या दिशेनं चिरंजीवित्व शोधीत जा !' श्रीकृष्णाच्या नीलवर्णाकडं डोळाभर पाहत अश्वत्थाम्यानं हातातील तेच खड्ग उचललं की, ज्यानं त्यानं द्रौपदीची मुलं कापली होती. आणि क्षणाचाही विलंब न लावता

त्यानं त्याला न कळलेला-न पेलवलेला तो जन्मजात मांसल मणी शाकटून भीमाच्या हातावर ठेवला ! अश्वत्थाम्याच्या मस्तकातून भळभळणारी जखम वाहू लागली. त्याहून अधिक त्याचं फुलापाखरांशी रमणारं निसर्गवेडं मन वाहू लागलं ! पाय रखडत ओढत तो क्षितिजाच्या दिशेनं न संपणाऱ्या काळाचा आणि आपल्या चिरंजीवित्वाचा वेध घेण्यासाठी निघून गेला. जणू आजही तडफडणाऱ्या, आक्रोशणाऱ्या, कोंदटलेल्या मानवतेच्या रूपात अश्वत्थामा जिवंतच आहे ! कलियुगातील, माणुसकीचा मणी काढून घेतलेला मानव असाच असेल हे संदिग्धपणे व्यासांना सुचवायाचे तर नाही काय ? असे अश्वत्थाम्याच्या जीवनरेखेकडे पाहताना एकसारखं चाटून जातं ! आणि लोकविलक्षण मांसल मणी मिळून त्यानं काय कमावलं व तो देऊन त्यानं काय गमावलं हेच कळत नाही. म्हणूनच राहते ती एक अनामिक हुरहूर ! आणि मग सहज उद्गार—केवळ उद्गार बाहेर पडतात—

" मणी मांसाचा माथ्यावरचा—
झगमग झगमग चमके त्याचा !! "

○

## युक्रांद

पुणे

' येथील ' युक्रांद ' (युवक क्रांती दल) या संघटनेने अभिनव पद्धतीने यंदाचा प्रजासत्ताक दिन साजरा केला. सुमारे पन्नास युवकयुवतींनी पुण्याहून सात मैलांवर असलेल्या नांदेड या गावी पदयात्रा करीत जाऊन तेथे ध्वजवंदनाचा कार्यक्रम केला. गावातील मंडळी, शाळेतील मुले व युक्रांदच्या ६०–७० सभासदांची सभा झाली. गावकऱ्यांतर्फे गावातील एका शिक्षकाने गावातील परिस्थितीचा आढावा घेऊन तेथल्या गरजा विशद केल्या. ' युक्रांद 'तर्फे एका सभासदाने आपल्या भाषणात विज्ञानाची आवश्यकता सांगितली. खेड्यांच्या पुनर्रचनेसंबंधीच्या योजनांची माहिती सांगितली. सभेनंतर गावकऱ्यांची व युक्रांदच्या सभासदांची बैठक झाली. त्या बैठकीत युक्रांदतर्फे चाललेल्या त्या गावातील दवाखान्यात वाढ करण्यात यावी, मुलांच्या शिक्षणवर्गाचेदेखील ' युक्रांद 'ने जास्त काम वाढवावे असे ठरले. ' युक्रांद 'च्या मे महिन्यातील सोमनाथ शिबिरात शेतीची आधुनिक तंत्रे शिकण्यासाठी गावकऱ्यांनी सामील व्हायचे ठरविले. चहापानानंतर २॥ वाजता सभासद परतले.

# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

## भीक मागण्याचा जन्मसिद्ध हक्क

जन्मसिद्ध हक्कांची टूम लोकमान्यांनी काढल्यापासून परिस्थिती मोठी कठीण होत चालली आहे. उदाहरणार्थ, भीक मागण्याच्या आपल्या जन्मसिद्ध हक्कावर येऊ पाहणारी पोलिसी गदा टाळण्यासाठी दिल्लीचे भिकारी म्हणे ट्रेड युनियन स्थापन करणार आहेत. म्हणजे आहे की नाही ? ट्रेड युनियन म्हटले की मागण्यांचा जाहीरनामा आलाच. भिकाऱ्यांच्या मागण्या काय असू शकतील याची ढोबळ कल्पना हवी असेल तर भारत-सरकार परदेशांकडे सारख्या मागण्या करीत असते त्या पाहिल्या म्हणजे झाले. तरीदेखील मोठे सरकारी भिकारी व लहान खासगी भिकारी असा थोडा-फार फरक अपरिहार्य असल्याने दिल्लीचे सरकार व दिल्लीचे भिकारी यांच्या मागण्या शंभर टक्के सारख्या असणे शक्य नाही. म्हणून या प्रायव्हेट सेक्टर भिकाऱ्यांना आपल्या मागण्यांचा जाहीरनामा तयार करताना सरकारी मसुदा जसाच्या तसा न वापरता स्वतःचे डोके चालवावे लागणार आहे. ( अर्थात फक्त डोके ! हातपाय चालवले तर भिकारी हा भिकारी न राहता कामकरी होण्याची भीती असते.) आता (परदेशी) भिकेला (योजनाबद्धपणे) लागलेल्या आपल्या देशात भिकारी व लेखकू यांच्यांतला सांपत्तिक फरक नगण्य असल्याने मी युनियन मेंबर नसूनही काही मागण्या सुचवू शकेन.

१. भीक मागणे हा आपल्याकडे सरकारमान्य व्यवसाय असल्याने फक्त फूटपाथवरच्या भिकाऱ्यांच्या मागे पोलिसांचा ससेमिरा लावण्याचा पक्षपात करण्यात येऊ नये. पोलीस मागे लावायचेच असतील तर ते मंत्रालयातल्या भिकाऱ्यांच्या मागेही लावावेत.

२. हल्ली भारत सरकारला भीक घालताना अमेरिका जसा कद्रूपणा करीत आहे तसाच अक्षम्य कद्रूपणा रस्त्याने जाणारी मंडळी फूटपाथवरच्या भिकाऱ्यांच्या बाबतीत दाखवीत आहेत. तेव्हा




पोलिसांचा ससेमिरा

भिकाऱ्यांशी कसे वागावे याचे उदाहरण अमेरिकेने भारत सरकारशी उदारपणे वागून घालून द्यावे.

३. काही लोक तर " भीक मागण्यापेक्षा काम का करीत नाहीत ?" असा उद्धट सवाल करतात. असल्या लोकांवर सरकारी खर्चाने विनय-भंगाचा खटला करावा.

४. सर्व-साधारण लोअर-डिव्हिजन-क्लार्कपेक्षा भिकाऱ्याचे मासिक उत्पन्न अधिक असते. पण कारकुनाचा महागाई-भत्ता भारखा वाढत असताना भिकाऱ्यांना मात्र ही सवलत मिळत नाही. तेव्हा दर दहा पैशांच्या भिकेमागे एक पैसा महागाई-भत्ता मिळाला पाहिजे.

५. फूटपाथ हे पादचाऱ्यांसाठी नसून भिकाऱ्यांसाठी आहेत असा कायदा झाला पाहिजे. सुदैवाने दिल्लीच्या फूटपाथवर पादचाऱ्यांची गर्दी नसते, कारण पाणी-पुरीवाल्यापासून मोटर-गॅरेजवाल्यांपर्यंत निरनिराळ्या प्रकारच्या दुकानांनी येथले फूटपाथ संपूर्णपणे अडविलेले आहेत. पण भिकाऱ्यांच्या हक्काच्या जागेवरील हे अतिक्रमणदेखील दूर झाले पाहिजे.

६. दिल्ली हे परदेशी पाहुण्यांच्या वर्दळीचे ठिकाण आहे. तेव्हा त्यांना समजेल अशी भीक मागता यावी म्हणून सर्व भिकाऱ्यांना सरकारी खर्चाने इंग्रजी शिकविण्यात यावे. केरळमधले भिकारी "वन् अॅना साऽऽर," अशी साहेबी भीक प्राचीन काळापासून मागत आले आहेत आणि राजधानीतल्या सरकारच्या वित्त-मंत्र्यांचीही " वन् मिलियन डॉलर्स,




**साहेबी भीक**

सर " अशी साहेबाकडे भीक मागण्याची उज्ज्वल परंपरा आहे, तेव्हा राजधानीतल्या प्रायव्हेट भिकाऱ्यांना इंग्रजीत असेच शेमलेस होता येऊ नये ही शेमफुल गोष्ट आहे.

७. शास्त्रशुद्ध भीक कशी मागावी याचे शिक्षण देण्यासाठी सरकारने एक पॉलिटेक्निक उघडावे. त्यात दान करणाऱ्याचे मानस-शास्त्र हा विषय प्रामुख्याने शिकवावा. शिवाय डोळे असून अंधळेपणा कसा भासवावा, आवाज मोठा येईल पण पोटाला लागणार नाही अशी चापटी पोटावर कशी मारीत राहावे याचे फिजिकल ट्रेनिंगही द्यावे. एखाद्या माणसाबरोबर चालणाऱ्या काळ्या-कुरूप बाईकडे दुर्लक्ष करून त्याची खुशामत "बाबूजी, भगवान तेरेको गोरी मेम देगा " अशा शब्दांत कशी करावी हेही मुद्दाम शिकविण्यात यावे.

८. सरकारी साधूंना आयडेंटिटी कार्ड वाटण्याची कल्पना मागे एका सरकारी साधु-पुरुषाने काढली होती, त्याच धर्तीवर गव्हर्मेंट–रेकग्नाइज्ड भिकाऱ्यांना


आमचा बळशाली निर्धार!
20 वर्षापूर्वी
स्वातंत्र्यासाठी...
आणि
आज
अन्नधान्य स्वयंपूर्णतेसाठी...
भरपूर धान्य पिकवून धन्य होऊ या !
संचालक प्रसिद्धि विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई

कार्डस् वाटण्यात यावीत. भिकाऱ्यांना त्यांचा उपयोग व्हिजिटिंग कार्ड म्हणून करता येईल.

सरकारला इशारा जाता जाता : या मागण्या सरकारने पुरवल्या नाहीत तर आम्ही भिकारी भूक-हरताळ करू – व गोळा केलेले अन्न कारकून, मराठी जिल्हापत्रांचे उपसंपादक इत्यादी गोर-गरिबांना वाटून टाकू. त्यातूनही सरकार बधले नाही तर मात्र आम्ही निर्वाणीचा उपाय म्हणून संप करू – म्हणजे मागण्या मान्य होईपर्यंत भीक मागणे अजिबात बंद ठेवू व नाइलाजाने काहीतरी काम-धंदा करू.

युनिअन मेंबरांच्या विचारार्थ सूचना :

१. चिकाटी हा जन्मजात भिकाऱ्याचा गुणधर्म आहे. तेव्हा पंधरा मिनिटांच्या आत जो भिकारी एखाद्या संभाव्य गिऱ्हाइकाचा पिच्छा सोडील तो भिकारी म्हणवून घ्यायला लायक नाही, सबब त्याची मेंबरशिप कॅन्सल करावी.

२. "भिकाऱ्याला पैसा दे भगवान" हा ट्रेड-सिग्नल आता कालानुरूप बदलून "भिकाऱ्याला कमीत कमी दहा पैसे दे भगवान" असा करण्यात यावा.

३. जी गिऱ्हाइके पंचवीस किंवा अधिक पैसे देतील त्यांना एक्स्ट्रा पुण्य लाभण्याची स्पेशल गॅरंटी द्यावी. ○


## कोल्हापूर नगरपालिका वाहतूक संचलन खाते

# कोल्हापूर

*जनतेची सेवा हेच आमचे ध्येय*

जनतेचे सहकार्य मिळवून सुलभ, स्वस्त दळणवळणाची सोय करण्यात अधिकाधिक दक्ष राहून, नागरिकांच्या जीवनास गती देण्याचे कार्य के. एम. टी. करीत आहे.

**१. सध्या असलेली बस वाहने : ४३**

**२. एकूण मार्ग: ५८**

**३. दररोज प्रवास करणारे प्रवासी : ४७,०००**

**४. सरासरी उत्पन्न : दररोज रु. ८,६००**

**५. सरासरी धाव : दररोज ७,७०० किलो मीटर्स.**

| आर. वाय्. पाटील | आर. वाय. शिंदे | एम. के. जाधव |
|---|---|---|
| ट्रॅन्स्पोर्ट मॅनेजर | चीफ ऑफिसर | नगराध्यक्ष |

# कोल्हापूर नगरपालिका

# ऑस्ट्रेलियन दौरा ?

। क्री डां ग ण ।

। म नो ह र रे गे ।

ॲडिलेड, मेलबर्न, ब्रिस्बेन आणि सिडनेच्या चारही कसोटी सामन्यांत भारतीय क्रिकेट संघाने ऑस्ट्रेलियाकडून पराभव पत्करला. त्यामुळ भारतीय क्रिकेट वर्तुळात आणि सामान्य शौकिनांत नराश्याची लाट पसरली असल्यास मुळीच नवल नाही. भारताने गेल्या ३५ वर्षांत परदेशाच्या क्रीडांगणावर अजून एकही कसोटी सामना जिकला नाही. तेव्हा यंदाही आपला संघ भारताची बेअब्रू करून परतला की काय याची उलट सुलट चर्चा होत आहे. म्हणूनच वस्तुस्थितीचे सूक्ष्म अवलोकन करून भारतीय पराभवात आपण काय गमावले, आपण काय कमावले, आपण काय शिकलो आणि कोणता बोध घ्यावयास पाहिजे, याची कारण-मीमांसा आणि चिकित्सा करण्याचा हा प्रयत्न.

ब्रिस्बेनचा तिसरा कसोटी सामना भारताला जिंकणे अशक्य नव्हते. अखेरच्या दिवसाचे भाकित करताना माजी ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू आणि सुप्रसिद्ध समीक्षक जॅक फिंगल्टन म्हणाले, "उद्या भारतीय क्रिकेट संघ एक मोठा विजय मिळवू शकेल काय? सहा तास आहेत, सहा विकेट्स आहेत आणि ४ बाद १७७ वरून आणखी २१८ धावा सामना जिंकावयास हव्या आहेत. अर्थात ऑस्ट्रेलियाच्या बाजूने मी अधिक

कौल देईन. पण भारतीय फलंदाज आज इतके सुंदर खेळले की उद्याच्या विजयाची संधी मी त्यांच्याकडून हिरावून घेत नाही. भारतीय क्रिकेट अगदी अतर्क्य आहे. उद्या काय घडेल हे काहीच सांगता येत नाही. भारतीय संघ एक महान विजय मिळवून जाईल. किंवा पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे त्यांचे फलंदाज कोसळून पडतील !" एवढा समतोल बुद्धीचा समालोचक पण फिंगल्टननासुद्धा सामन्याचा निर्णय सांगता येईना. पण भारतीय क्रिकेटच्या प्रकृतीचे इतके अचूक निदान आजपर्यंत त्यांच्याइतके कुणी केले नसेल. दुर्दैव असे की हा सामना आपण फक्त ३९ धावांनी हरलो.

ऑस्ट्रेलियाचे माजी लेगब्रेक गुगली गोलंदाज बिल् ओरेली यांनी तर ब्रिस्बेनप्रमाणे सिडनेचा चौथा कसोटी सामनाही भारताने जिंकावयास पाहिजे होता असे मत व्यक्त केले, "सिडनेचा सामना कुणी हरावयास हवा होता तर तो ऑस्ट्रेलियानेच" अशी रास्त अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

ऑस्ट्रेलियामधील चारही कसोटी सामन्यांत भारतीय संघाने अनुकूल परिस्थितीचा फायदा घेतला नाही. बेफिकीरपणे क्रीडांगणावर वागून त्यांनी अनेक संकटे ओढवून घेतली आणि नंतर जेव्हा त्यांना खडबडून जाग आली तेव्हा त्या संकटाचे निवारण करण्याचा अवघड गड ते चढू लागले. त्यातच विजयाचा घास जवळ येत असता पराजयाने मिठी मारली.

## प्रसन्नांची प्रभावी चेंडूफेक

अशी पराभवाची खंत बाळगताना भारताच्या काही फार चांगल्या गोष्टी पदरी पडल्या असल्यास नवल नाही. फलंदाजीत अबीदअल्लीसारखा नवोदित निसर्गदत्त फलंदाज लाभला तर प्रसन्नांनी टेफिल्ड, लेकर, गिब्ज या ऑफ्-ब्रेक गोलंदाजांच्या पंक्तीत बसून २५ विकेट्स काढल्या ! तसा पराक्रम या तिघांनाही ऑस्ट्रेलियात सावता आला नाही. येत्या एप्रिलमध्ये ऑस्ट्रेलियाचा संघ इंग्लंडच्या दौऱ्यावर जाणार आहे. ऑस्ट्रेलियाच्या निवड-समितीला कुणी एखादा भारतीय उसना हवा असेल तर त्यांनी प्रसन्नांना इंग्लंडच्या दौऱ्यावर खुशाल न्यावे ! इंजिनियर यांनी उत्कृष्ट यष्टिरक्षण केले. फलंदाजीत सुरतींनी जबाबदारीचा धीमा खेळ सातत्याने केला. इंजिनियर, वाडेकर, बोर्डे, सुब्रह्मण्यम प्रसंगी चांगले चमकून गेले. जयसिंहांनी ऑस्ट्रेलियाच्या खेळपट्टयांचा काहीच अभ्यास नसताना एकदम जाऊन ब्रिस्बेनला शतक ठोकले. कर्णधार पतौडीची फलंदाजी तर अलौकिक श्रेणीत बसण्यासारखीच झाली. मेलबर्नला ४ बाद २५ वरून त्यांनी भारताचा घसरलेला डाव पहिल्या दिवशी ८ बाद १५६ पर्यंत सावरण्याचा धीरोदात्त प्रयत्न केला व नाबाद ७० धावा झळकाविल्या. पाय दुखावला असताही रनर न घेता त्यांनी असामान्य धाडस, उत्कृष्ट तंत्र आणि सफाईदार फटकेबाजी केली. वेगवान गोलंदाज रेनेंबर्ग यांना कट् व हुक्चे नेत्रदीपक टोले लगावून व चॅपेलचे लोंबते चेंडू पुढे सरसावून जाऊन त्यांनी चोपले. आत्मविश्वास व कौशल्य यांचा सुंदर समन्वय त्यांनी साधला.

## नव्या नेतृत्वाची गरज

एवढे म्हणूनही भारतीय क्रिकेट कंट्रोल बोर्डाने या दौऱ्यापासून अनेक गोष्टी शिकल्या पाहिजेत. पहिली गोष्ट नेतृत्वाची. पहिल्या कसोटी सामन्यात बोर्डे यांनी भारताचे नेतृत्व केले. त्या वेळचा एकोपा नंतरच्या कसोटी सामन्यांत आढळला नाही या सामन्यात पहिल्या दिवशी ऑस्ट्रेलियाने ६ बाद ३११ धावा केल्या. खेळपट्टीकडून मंद वा द्रुतगती गोलंदाजीला काहीच मदत मिळत नव्हती. सिम्प्सन—लॉरी, शीहन-कॉपर, व कॉपर—जारमन यांनी तीन भागीदारींत २९४ धावा टोलविल्या. पण



भारतीय क्षेत्ररक्षकांकडून एकदाही ढिलाईचे वर्तन दिसून आले नाही. निश्चय आणि दुप्पट उत्साहाचे वातावरण सर्वत्र पसरले होते पण जेव्हा दुसऱ्या कसोटी सामन्यापासून पतौडीकडे नेतृत्व आले तेव्हा हीच जिद्द आणि हाच उत्साह कुठच्या कुठे पळून गेला. त्यानंतर पतौडींनी अनेक चुका केल्या. नाणेफेक जिंकून खेळपट्टीचा अंदाज न आल्याने कधी फलंदाजी तर कधी क्षेत्ररक्षण असे फशी पडणारे निर्णय घेतले. त्यामुळे संकटे सुरुवातीपासूनच अंगावर येऊ लागली. १९६२ सालापासून ५ वर्षेपर्यंत पतौडी संघात एकोपा आणि हिरीरी निर्माण करू शकले नाही. नशिबाचा कौल पडूनही ते अजूनही नेतृत्व चाचपडतच आहेत. कलंदर वृत्ती आणि खुशालचेंडू वागणुकीमुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व कल्पकता व बुद्धिमता असूनही भारतीय खेळाडूंत ठसत नाही. लहरी स्वभावामुळे त्यांनी भारताच्या संघनायकत्वाची जबाबदारी यशस्वी रीत्या पार पाडलेली नाही. भारतात वेगवान गोलंदाज नाही म्हणून अजूनही ते रडतच बसले आहे. गेल्या तीस वर्षांत अमरसिंग, अमरनाथ, सुरेंद्रनाथ, फडकर, दिवेचा, देसाई हे मध्यमगती गोलंदाज भरघोस यश मिळवून गेले ते कशापायी ? गोलंदाज हा काही केवळ गतीवर श्रेष्ठ ठरत नसतो. चेंडूची दिशा, अचूक टप्पा, दोन्ही स्विंगजवर ताबा व फलंदाजांचे दोष शोधून त्यावर हुकमी गोलंदाजी करणारे गोलंदाजच परिणामकारक ठरतात. त्या दृष्टीने रमाकांत देसाई, अबीदअल्ली, सुब्रह्मण्यम् यांचा पतौडींना उपयोग करून घेता आला असता. त्यांच्यामधील वैयक्तिक कर्तृत्वगुणांचा जास्तीत जास्त फायदा भारताला करून देता आला असता. पण पतौडींना ते जमले नाही.

पतौडींचा जसा वेगवान गोलंदाजीवर विश्वास नाही तसा बोडर्यांचा मंदगती फिरक्या गोलंदाजीवर भरवसा नाही म्हणूनच प्रसन्ना पतौडींच्या हाताखाली यशस्वी ठरले तर बोडर्यांच्या नेतृत्वाखाली अबीदअल्ली ६ विकेट्स मिळवून गेले. आहेत त्या गोलंदाजांचा जास्तीत जास्त चांगला उपयोग करून घेण्यासाठी आता नवा नेता निवडावयास हरकत नसावी. आता सर्वांचे लक्ष रुसी सुरतीकडे लागून राहिले आहे. इतका ठाकठीक, क्रीडानिपुण, प्रामाणिक आणि तळमळीचा शिवाय सौजन्यपूर्णतेचा क्रिकेटपटू तूर्त भारतीय संघात नाही. त्यांना योग्य संधी दिली गेली तर भारतीय क्रिकेटला एक नवीन वळण लागण्याची शक्यता आहे.

भारतीय गोलंदाजांनी ऑस्ट्रेलियाला बहुतेक वेळा तीनशेच्या आसपासच फिरकू दिले. भारताचे क्षेत्ररक्षण अधिक चपळ आणि चलाख असते तर किमान दोन कसोटी सामने आम्ही सहज खिशात टाकले असते. प्रसन्न, सुरती, अबीदअल्ली यांनी प्रभावी गोलंदाजी केली. रमाकांत देसाई व बापू नाडकर्णी यांचा यापेक्षाही चांगला उपयोग करून घेता आला असता. भारतीय क्षेत्ररक्षकांनी, तीक्ष्ण दृष्टी, शारीरिक तन्दुरुस्ती किंवा वेळेचे भान ठेवले नाही. एकाग्रचित्त ढळले की क्षेत्ररक्षणात अनेक घोडचुका होतात. मेलबर्नच्या सामन्यात तर भारताचे क्षेत्ररक्षण 'दिव्य'


**अधिक धान्योत्पादन**
**आजची एकमात्र गरज**

*अधिक धान्योत्पादनाच्या मोहिमेवर*

१. 'किर्लोस्कर' डिझेल व इलेक्ट्रिक पंपिंग सेटस्
२. 'स्वस्तिक' गॅरेण्टेड रबर होजेस
३. अमेरिकन स्प्रिंग अँण्ड प्रेसिंग वर्क्सची
पीक संरक्षण अवजारे सज्ज आहेत

*अधिकृत विक्रेते :*

**हैद्राबाद मशिनरी कंपनी**

**औरंगाबाद ✦ जालना ✦ नांदेड**
**वैजापूर ✦ बीड ✦ परभणी**

झाले. चॅपेलनी १५१ धावा काढल्या. पण त्यांचे १६, ५२ व ८२ वर सोपे झेल सोडले गेले. ऐन वेळी चित्त विचलित होणे किंवा काही करण्याचा अंगात त्राण न राहणे यांमुळे भारताला हाती आलेली संधी पकडता आली नाही. झेल सुटल्याने गोलंदाजांचा धीर सुटतो व फलंदाजांचा आत्मविश्वास वाढतो. पुण्याच्या खडकवासल्याला प्रत्येक भारतीय खेळाडूंची वैद्यकीय चाचणी घेतली होती मग बाहेरच्या सामन्यात असे का होते हा एक प्रश्नच आहे.

## दृष्टिक्षेपात चार सामने

**१ :** ॲडिलेड–२३ ते २८ डिसेंबर – ऑस्ट्रेलिया ३३५ (कॉपर ९२, शीहन ८१, सिप्सन ५५, लॉरी ४२; अबीद अली ६/५५, प्रसन्ना ३/६०). भारत ३०७ (इंजिनियर ८९, सुरती ७०, बोर्डे ६९; कॉनली ४/५४). ऑस्ट्रेलिया ३६९ (कॉपर १०८, सिप्सन १०३; सुरती ५/७४). भारत २५१ (सुब्रह्मण्यम ७५, सुरती ५३; रेनेबर्ग ५/३९).

**२ :** मेलबर्न - ३० डिसेंबर ते ३ जानेवारी–भारत १७३ (पतौडी ७५; मॅकेंझी ७/६६). ऑस्ट्रेलिया ५२९ (चॅपेल १५१, सिप्सन १०९, लॉरी १००, जारमन ६५; प्रसन्ना ६/१४१). भारत ३५२ (वाडेकर ९९, पतौडी ८५, सुरती ४३, इंजिनियर ४२).

## क्रिकेट कंट्रोल बोर्डातील राजकारण


भारतीय क्रिकेट कंट्रोल बोर्डाने अचानक जयसिंहांना पाठवून निवडसमितीचा मूर्खपणा सर्वांना पटवून दिला. आणि जयसिंहांनी लगोलग शतक फडकावून त्यावर शिक्कामोर्तब केले. याचा अर्थच बोर्डाने निवडसमितीवर अविश्वास दाखविला. पतौडी-गुलाममहंमद या सर्व प्रकारात एक मोठे राजकारण खेळून गेले. जयसिंहांना का पाठविले ? त्या वेळी कुणी आजारी होते का ? त्याच्याऐवजी सक्सेना, सुब्रह्मण्यम् यांना संधी का दिली नाही ? असे अनेक प्रश्न उपस्थित होतात. निदान यापुढे तरी भारतीय संघ निवडताना तो पहिल्या दर्जाच्या उत्तमोत्तम खेळाडूंचा बनलेला असावा याची काळजी निवड-समिती कटाक्षाने घेईल असा विश्वास वाटतो.

पतौडी-जयसिंहांप्रमाणे इंजिनियर, वाडेकर, बोर्डे, सुब्रह्मण्यम् यांनी प्रसंगी चमकदार फलंदाजी केली. अबीदअल्लींनी अग्रेसर खेळ करून भारतीय फलंदाजीत एक चैतन्य निर्माण केले. पण आपल्या फलंदाजीत सातत्य कधीच आढळले नाही. अनुकूल परिस्थितीत सामन्यावर पकड घेणे त्यांना जमले नाही. उदाहरण म्हणून पहिला कसोटी सामना दाखविता येईल. ३ बाद २५० वरून भारताचा डाव दुसऱ्या दिवसअखेर ८ बाद २८८ धावांवर गडगडला. बोर्डे, सुरती, नाडकर्णी, सुब्रह्मण्यम असे

**३ :** ब्रिस्बेन– १९ जानेवारी ते २५ जानेवारी– ऑस्ट्रेलिया ३७९ (वॉल्टर्स ९३, लॉरी ६४, शीहन ५८, कॉपर ५१). भारत २७९ (पतौडी ७४, जयसिंहा ७४, सुरती ५२). ऑस्ट्रेलिया २९४ (वॉल्टर्स नाबाद ६२, रेडपाथ ७९, लॉरी ४५; प्रसन्ना ६/१०४). भारत ३५५ (जयसिंहा १०१, सुरती ६४, पतौडी ४८, बोर्डे ६३, अबीद अली ४७; कॉपर ४/१०५).

**४ :** सिडने–२६ जानेवारी ते ३१ जानेवारी– ऑस्ट्रेलिया ३१७ (लॉरी ६६, शीहन ७२, वॉल्टर्स नाबाद ९४). भारत २६८ (वाडेकर ४९, पतौडी ५१; फ्रिमन ४/८६). ऑस्ट्रेलिया २९२ (लॉरी ५२, कॉपर १६५; प्रसन्ना ४/९६). भारत १९७ (अबीद अली ८१; कॉपर ४/४९, सिंप्सन ५/५९).

वाकवगार फलंदाज भराभर कोसळले. त्यामुळे ऑस्ट्रेलियाची ३३५ ही धावसंख्या ओलांडण्यास २८ धावा भारताला कमीच पडल्या. त्यामुळे कोणत्याही सामन्यावर पकड घेणे आपल्याला जमले नाही. भारतीय फलंदाजीत योजकता आढळली नाही. कोणत्या प्रसंगी कसे खेळावे याची मानसिक घडण किंवा व्यवहारज्ञान भारतीय फलंदाजांनी दाखविले नाही. फलंदाजीचे तंत्र अपुरे पडले. चेंडूच्या रेषेत पाय न आणता भारतीयांनी चेंडू चोपण्याचे प्रयत्न केले. ऑफ्स्टंपच्या बाहेर वेगाने जाणारे चेंडू पाय न हलविताच फटकाविण्याचा खास 'ट्रेड मार्क' भारताने पुन्हा दर्शविला. सामना जिंकण्यासाठी प्रतिकूल परिस्थितीवर मात कशी करावी, याचा सांघिक विचार नव्हता नि म्हणूनच मनाला वाटेल तशी बेफिकीर फलंदाजी भारतीयांनी केली. त्याचे प्रायश्चित्त त्यांना लगेच मिळाले, कधी नव्हत अखेरच्या कसोटी सामन्यात आम्ही सुरवातीला ८३ धावांची भागीदारी केली. पण त्यानंतरचे फलंदाज पराक्रम गाजवू शकले नाहीत. जेव्हा पहिले चार-पाच गडी लवकर बाद होत तेव्हा नंतरचे चांगले खेळत. मॅकेंझी, फ्रीमन, रेनेबर्ग या वेगवान गोलंदाजांनी प्रत्येक वेळी आमचा धुव्वा उडविला, पण त्यांच्या अचूक माऱ्याप्रमाणेच आमची बेछूट फिरवाफिरवी अंगलट आली. सर फ्रँक वॉरेल यांनी नॉर्मन यार्डले यांना एकदा त्यांच्या फ़लंदाजीचे सुंदर नीतितत्त्व सांगितले होते. सर फ्रँक म्हणाले की माझ्याकडे सात दर्जेदार फलंदाज आहेत. त्या सर्वांना मी धाडसी खेळ करावयास सांगतो. त्यातले दोन टिकले की माझ्या संघाचे काम होते. वॉरेलना "अशा दोघांनी" नेहमीच साथ दिली. मात्र भारताकडे सात उत्कृष्ट फ़लंदाज असूनही एकदाही कुणा दोघांची डाळ शिजली नाही. अर्थात हे काम एकट्या फलंदाजाचेच नाही तर त्यांना कप्तान व व्यवस्थापकांनी एकत्र आणून योग्य मार्गदर्शन करण्याचे आहे. पण पतौडी– गुलाम त्या कामगिरीत



चवथी सचित्र आवृत्ती

□□

# राजा शिवछत्रपति

□□

ब. मो. पुरंदरे

□□

मूल्य : रुपये बेचाळीस फक्त

□□

राजहंस प्रकाशन
पुणे

अपुरे पडले. भारताचे कर्णधार बोर्डे व व्यवस्थापक हेमू अधिकारी असते तर यापेक्षाही अधिक चांगली कामगिरी भारताने निश्चित बजावली असती.

## त्रयस्थ पंच हवेत

आस्ट्रेलियातील पंचांचे अनेक निर्णय वादग्रस्त ठरले. पहिल्या कसोटी सामन्यात सिम्पसनविरुद्धचे एल्. बी. डब्ल्यू. चे अॅपील फेटाळले. मेलबर्नला सुरती ४३ वर मागे झेलबाद झाल्यावर त्यांनी पंचांना चेंडू बॅटला नसून टोपीला लागला असे हाताने खुणावले. तीच परिस्थिती पुढच्या ब्रिस्बेन सामन्यात घडली. इंजिनियरला रेनेबर्गच्या गोलंदाजीवर शून्यावर झेलबाद ठरविले. जारमन यांनी उजव्या अंगाला उडी मारून झेल पकडला. पण इंजिनियर यांनी मान झटकून आपण नाबाद असल्याचा खुलासा केला. ऑस्ट्रेलियाचे माजी यष्टिरक्षक ग्राऊट यांनी आपल्या आत्मचरित्रात भारतीय पंचांची नमुनेदार गोष्ट सांगितली आहे. मद्रासच्या कसोटी सामन्यात पतौडी शून्यावर पायचीत होते पण त्यांना पंचांनी नाबाद ठरविले. अशीच गोष्ट हनुमंतसिंग यांच्या बाबतीत घडली. हिंदुस्थानातले पंच अजूनही संस्थानिकांच्या आहारी गेलेले दिसतात असा टोला ग्राऊट यांनी मारला आहे. भारतीय पंचांच्या कामगिरीबद्दल ऑस्ट्रेलियाच्या व्यवस्थापकांनीही मोठी तक्रार केली होती. येत्या एप्रिल महिन्यात ऑस्ट्रेलियाचा संघ इंग्लंडच्या दौऱ्यावर जात आहे. वेस्ट इंडीज व दक्षिण आफ्रिकेकडून पराभव पत्करल्यानंतर निदान भारताविरुद्ध तरी बेअब्रू नको असा त्यांनी पंचांच्या द्वारे विचार केलेला दिसतो. पहिल्या कसोटी सामन्यात चंदू बोर्डेंना ६९ धावांवर पंचांनी लटकाविले. ऑस्ट्रेलिया कठीण परिस्थितीत सापडले असताना पंचांनी त्यांना मदत केली. क्रिकेटचे कायदेकानू घडविताना त्यांत नीतिमूल्यांना फार किंमत दिली आहे. पण दुर्दैवाने सर्वच देश परिस्थितीप्रमाणे त्याविरुद्ध वागत असतात. आता दोन देशांमधील सामन्यांना त्रयस्थ पंचच ठेवणे प्राप्त आहे असे म्हणणाऱ्यांपैकी मी एक आहे. भारतीय पराभवाला ऑस्ट्रेलियाच्या संघाबरोबर त्यांचे पंचही कारणीभूत झाले ही गोष्ट विसरून चालणार नाही.

## खेळाडूंत देशाचा विचार हवा

बोर्डे–नाडकर्णींनी निवृत्ती जाहीर करावी अशी ओरड आता सर्वत्र सुरू झाली आहे. ऑस्ट्रेलियाचा दौरा हाती लागेल म्हणून निवृत्ती मागे घेऊन मांजरेकर पुढे आले. ही भारतीय प्रवृत्ती आहे. तेव्हा बोर्डे–नाडकर्णींच्या निवृत्तीचा विचार त्यांनी स्वत:च करावा हे चांगले. विजय मर्चंट १९५२–५३ साली क्रिकेटमधून बाहेर पडले तेव्हा एकाने विचारले, तुम्ही निवृत्त का झालात ? तेव्हा मर्चंट उत्तरले "या प्रश्नातच माझे उत्तर सामावलेले आहे....' तुम्ही निवृत्त का होत नाही ?' असे मला यापुढे तुम्ही कधी विचारणार नाही." भारतीय क्रिकेटपटूंनी जळी स्थळी काष्ठी देशाचाच विचार केला पाहिजे. मग ते चार काय दहा कसोटी सामने जरी हरले तरी आम्हांला त्याचे वाईट वाटणार नाही ? ○

# तुमचे भविष्य आमचा अंदाज

श्री. गो. जोशी, सायनाचार्य

१७ ते २३ फेब्रुवारी-भविष्य

**मेष :** सध्या तुमच्या व्ययस्थानावर श. मं. रा. चा अंमल असल्यामुळे, हात राखून खर्च करावा, वगैरे गोष्टी त्यांना मंजूर नाहीत. त्यांच्याच तंत्राने तुम्हांला नाक मुठीत धरून वागणे भाग पडेल. समाधानाची गोष्ट एवढीच की, गुरु, सूर्याची तुमच्यावर कृपादृष्टी असल्यामुळे, अशा खडतर कालातही तुमची प्रतिष्ठा निष्कलंक राहील, नोकरीधंद्यावरही फार मोठे आघात होऊ शकणार नाहीत. हवामान काळजी करण्याइतके दूषित होणार नाही.

कोणतीही गोष्ट करण्यापूर्वी निदान १० वेळा विचार करा, पुढे पाऊल टाकण्यापूर्वी सध्या आपण कुठे आहोत आणि पुढचा टप्पा किती दूर आहे, याची खातरजमा करून घेऊन मगच पाऊल उचला. साडेसातीच्या कालात एवढी पथ्ये पाळायला हवीतच ! दि. २१ ते २३ फे. हा काल थोडेफार यश, स्वास्थ्य देणारा जाणवेल.

**वृषभ :** शनी मंगळ भयंकर तामसी ग्रह सहसा कुणावर प्रसन्न होत नाहीत. कधी काळी ते प्रसन्न झाले तर, कोणीही देणार नाहीत इतकं अमाप देऊन जातील, पैसा, प्रतिष्ठा, अधिकारही. सुदैवाने ते भाग्य तुमच्या वाट्यास आलेले आहे. या पराक्रमी ग्रहांचा जेवढा उपयोग करून घेता येईल तितका घ्या. असा योग ३०–३२ वर्षे तरी पुन्हा लाभणार नाही.

या काली आपले अनेक प्रश्न भराभर सुटायला लागतील. नोकरीतील सर्वोच्च अधिकार लाभेल, व्यापारधंद्यात तर दैव फळफळेल ! दि. १९–२१–२३ या कालाची नोंद करा.

**मिथुन :** भाग्य-दशमातून अनेक विशाल तेजोगोल संचारत आहेत. ही भावी प्रगतीची प्रसादचिन्हेच होत. दशमातील शनी, मंगळादी ग्रह अनेकांना भीतिप्रद वाटत असले तरी तुम्हांला मात्र ते जिवलग मित्राप्रमाणे ठरतील.

या आठवड्यात फारच मोठमोठ्या जबाबदाऱ्या तुम्हांला उचलाव्या लागतील. नवे भव्य कार्यक्रम हाती घ्यावे लागतील, त्याला धनिकांचे सक्रीय साहाय्य लाभेल.

मिथुनराशी व्यक्तींचे साहित्य-काव्य-लेखन हे खास क्षेत्र. त्या क्षेत्रातही तुम्ही आवाज उठवू शकाल.

एकच गोष्ट खटकेल की, आगामी शनि-मंगळ योगाच्या आसपासचा काल व्यावसायिक क्षेत्रात–नोकरीधंद्यात स्फोटक, संघर्षात्मक जाणवायला लागेल. त्या वेळी

थोडा संयम पाळलात तर अनवस्था प्रसंग टळेल. दि. १९–२१–२३ शुभ काल.

**कर्क :** भाग्यस्थानातील शनि-मंगळांनी तुम्हांला अभिवचन देऊन ठेवलेलेच आहे की, " या वेळी तुम्ही कुठेही जा आम्ही तुम्हांला हवी ती मदत देऊ. " तुमचे व्यावसायिक क्षेत्र अधिकाधिक कसे विस्तारेल, याचे प्रात्यक्षिक करून दाखवू.

आता तुम्हांला कोणत्याही बाबतीत माघार घ्यायचे कारण उरणार नाही. प्रगती विलक्षण वेग घेऊ लागेल. उच्च अधिकार लाभेल, वैज्ञानिक संशोधने हातून घडतील, सामाजिक पुढारीपण लाभेल, नवे आकर्षक क्षेत्र हस्तगत होईल, बदली बढतीचे योग कोणत्याही क्षणी येतील.

या वेळच्या शनि-मंगळ योगातच तुमच्या प्रगतीचा आलेख अधिकाधिक उंचावण्याचे सामर्थ्य आहे. दि. २१ ते २३ या कालाकडे विशेष लक्ष द्या.

**सिंह :** एका बाजूने गुरूची अधिकाधिक अनुकूलता तर दुसऱ्या बाजूने शनि-मंगळाचा छळवाद अशा परस्परविरोधी वातावरणात तुम्ही सापडला आहात. फार काल ही अनिष्टता टिकणार नाही. हे जरी खरे असले तरी नजीकच्या भविष्यकालात तुम्हांला सतत जपून व सावधगिरीनेच वागावे लागणार आहे. प्रतिष्ठेवर कसलाही अनिष्ट परिणाम होणार नाही–पण आरोग्य आणि पैसा यावर थोडाफार तरी अनिष्ट परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही.

फार मोठ्या कामाला हात घालू नका. काहीसे दुसऱ्याच्या सल्ल्याने आणि सहकार्यानेच वागणे भाग पडेल. दि. १९ ते २२ या वेळी अनेक समस्या सुटू लागतील.

**कन्या :** या वेळी तरी निदान अपेक्षित यश पदरी पाडून घेण्यासाठी अगदी जिवाचे रान करावे लागेल. वादविवाद, व्यावसायिक मतभेद, कौटुंबिक कटुता यांना अगदी ऊत येईल. कितीही धडपड केली तरी धवधवीत यश मिळण्याची आशाच कमी. आलेल्या आणि येणाऱ्या प्रसंगांना निर्धाराने तोंड देण्याशिवाय अन्य उपाय नाही.

वादविवादाच्या प्रसंगापासून चार हात दूरच राहा. कितीही मतभेदाचे प्रसंग निर्माण झाले तरी कोर्टकचेरीत पाऊल टाकण्याचा अविचार करू नका. वाढत्या खर्चाचा लोंढा थोपविण्याचा शिकस्तीचा प्रयत्न करा.

दि. २१ ते २३– अपयशातूनही यश शोधण्याचा प्रयत्न केला जाईल.

**तूळ :** आजवरचे तुमचे सारे परिश्रम, सारी तपस्या या कालापासूनच फलदायी ठरू लागेल. दगदग धडपडीचे प्रसंग आहेतच. ती तर तुमच्या पाचवीला पुजलेली आहे. पण त्या श्रमाचे श्रेय निश्चितच मिळेल.

कला, विज्ञान, यंत्रतंत्र, या क्षेत्राशी घनिष्ठ संबंध असणाऱ्यांना तर या कालाइतका सर्वांगीण प्रगतीचा काल यापूर्वी क्वचितच अनुभवण्यास मिळालेला असेल.

नवे स्नेहसंबंध जुळून यायला लागतील, मंगलकार्यासाठी केलेले प्रयत्न यशस्वी ठरतील. वरिष्ठ अधिकारी तुमच्यासाठी काही भरीव कार्य करतील.

दि. २० ते २३ या कालीच अनंत अपेक्षा-साफल्याच्या घटना घडाव्यात.

वृश्चिक : उग्र ग्रहांच्या कोंडीतून आपण बाहेर पडला आहात. आता तुम्हांला कशाचीही डर नाही, कोणत्याही गोष्टीबद्दल फिकीर नाही. तुमच्या व्यावसायिक जीवनात एक नवा पर्वकाल निर्माण होत आहे. अभिनव योजना नजीकच्या भविष्यकालातच आकार घेणार आहेत. उच्च अधिकार लाभण्याची लक्षणे स्पष्टपणे दिसायला लागतील.

राजकीय क्षेत्रातही तुमच्या उपस्थितीची नितांत गरज भासू लागेल. राजकारणातील अनेक अवघड समस्या तुमच्यामुळे-केवळ तुमच्यामुळेच सुटू शकतील अशी वरिष्ठांची खात्री होऊन चुकेल. वैद्यक अर्थशास्त्र–परराष्ट्रीय राजकारण यासंबंधी आपल्या हातून विधायक कार्य घडावे.

१७–१८–२१–२२ फे. या काली माझ्या म्हणण्याचा प्रत्यय येईल.

धनू : सुखस्थानातील हे श. मंगळादी ग्रह म्हणजे अस्तनीतील निखारेच. ते कोणत्या वेळी दगा देतील याचा नेमच नाही. भाग्यस्थ गुरू एवढेच करील की, या पेचप्रसंगामधून आपण लवकरच बाहेर पडू शकाल. सांपत्तिक ताण, मानसिक यातना, कौटुंबिक कटुता, अनारोग्य आणि राहत्या जागेच्या वाढत्या कटकटी–यांपैकी काहीही कोणत्याही वेळी आपणांस अनुभवावे लागेल.

काही दिवस सहन केल्याशिवाय गत्यंतरच नाही. वातावरण प्रतिकूल आहे, म्हणून निराश होऊ नका. निर्धार-निष्ठेचे व्रत आचराल तर हेही दिवस आपण निभावून न्याल. पैशा-आडक्याच्या व्यवहारात तर सतत डोळ्यांत तेल घालून पाहावे लागेल. दि. १९–२०–२१ या काली अनेकांचे हार्दिक सहकार्य लाभू शकेल.

मकर : पराक्रमस्थ शनि-मंगळादी ग्रह तुमच्या कर्तृत्वाला उधाण आणतील. नवे साहस, नवे धाडस करण्यास उद्युक्त करतील. व्यावसायिक क्षेत्रात तर तुम्हांला प्रतिस्पर्धीच शिल्लक ठेवणार नाहीत. कोणत्याही क्षेत्रात आवाज उठवायला ही एकच सुवर्णसंधी आहे.

भारताची मान उंच करणाऱ्या
अन्न-स्वावलंबन-संचलनास
आमचा हार्दिक पाठिंबा

**- विज्ञान मंदिर -**

सर्व प्रकारच्या विज्ञान साहित्याचे वितरक
व कैलास खडूचे निर्माते
**औरंगपुरा, औरंगाबाद**

आठव्या गुरुबद्दल खंत न बाळगता निर्धार आणि निर्भयता यांची शिदोरी बरोबर घेऊन वाटचाल करायला लागा—यश घे घे म्हणून पाठीशी लागेल.

१८ फेब्रुवारीच्या शुक्र-हर्शल-त्रिकोणामुळ नवे क्षेत्र हाती गवसेल, प्रतिभेचा उन्मेष वहरेल, व्यक्तिमत्त्वाभोवती तेजोवलय विलमू लागेल.

या आठवड्यापासून अनेक कार्यक्रम घाईगर्दीने पार पाडावे लागतील. दूरचा प्रवासही करावा लागेल. दि. १८ ते २० प्रवास, बदल, स्थानांतर अशा गोष्टी घडतील.

**कुंभ :** तुमच्या राशीच्या आगेमागे अनेक उग्र ग्रहांचा तळ पडलेला आहे. त्यांची लहर सांभाळूनच तुम्हांला वाटचाल करावी लागेल. आततताईपणाने काही कामे करायला जाल आणि त्यामुळे पश्चात्तापाशिवाय काहीच पदरी पडणार नाही.

संथपणाने, दूरवर विचार करूनच योजना आखाव्या लागतील. सांपत्तिक चणचण, प्रकृति-अस्वास्थ्य, अशाही गोष्टींना मधून-मधून तोंड द्यावे लागेल.

दरच्या प्रवासाचे आणि नव्या व्यवसाय-धंद्याचे विचार डोक्यातून काढून टाका. काही दिवस जुळते-मिळते घेतल्याशिवाय गत्यंतर नाही. कालाची पावले ओळखून दूरदर्शीपणाने वागण्याचे ठरवा.


दि. १८-२०-२१ या काली सध्याच्या अनिष्ट कालामधूनही इष्ट घटना घडतील.

**मीन** : सध्या महिना-दीड महिना तरी निदान तुमच्या बाबतीत फारसे चांगले मी लिहू शकणार नाही. कालच असा आहे त्याला काय करणार ?

साडेसाती आणि त्यातून मंगळ-राहूचे आक्रमण—अशा वेळी थोरांचा सल्ला आणि संयम यांचाच उपयोग होईल.

मन त्रस्त व बेभान बनेल, आरोग्य नरमगरम राहील, सांपत्तिक बाजूही दुबळी बनू लागेल, आणि नोकरी-धंद्यातील यश जिवाचे रान करूनही अपेक्षेप्रमाणे लाभेनासे होईल. दि. २१ ते २३ या कालात थोडेफार सहकार्य इष्टमित्रांचे लाभावे.

घाई-गर्दीने ोणताही निर्णय घेऊ नका. प्रतिकूल परिस्थितीला धडका देणे परिणामी शहाणपणाचे ठरत नाही. या वेळी प्रकृतीची विशेष काळजी घ्या. ○



# बोल्शेव्हिक क्रांतीच्या उफाळलेल्या ज्वाला

साऱ्या रशियाला या ज्वालांनी
वेढून टाकले होते.
विरोधकांना भस्मसात
केल्यानंतरच
ही आग शांत झाली.

आणि
त्यानंतर

अंतर्गत सत्तासंघर्षाला
जोराने तोंड फुटले.

विसाव्या शतकातील
एका रोमहर्षक कालखंडाचे
दर्शन घडविणारी लेखमाला

# व्होल्गा जेव्हा लाल होते !

लेखक : वि. स. वाळिंबे

क्रमशः प्रसिद्ध होत आहे.
पुढील अंकात—अंतर्गत संघर्षाचे अंतरंग

किसनदास

पेमराज

मुथा

फॅन्सी पातळांचे

ठोकबंद व्यापारी

व

कमिशन एजंट,

इचलकरंजी

कोल्हापूर

MANOOS (Weekly) : One Rupee : Regd. No M H-649


# दि कोल्हापूर शुगर मिल्स लिमिटेड,

कोल्हापूर

महाराष्ट्राच्या साखर कारखानदारीच्या क्षेत्रातील
दि कोल्हापूर शुगर मिल्सची वैशिष्टयपूर्ण प्रगती—

## *या अभिमानास्पद प्रगतीचे काही ठळक विशेष*

✦ १९३४ साली साखरेच्या उत्पादनास सुरुवात. ✦ १९४४ मध्ये डिस्टिलरी सुरू होऊन स्पिरिटच्या उत्पादनास सुरुवात झाली. ✦ १९६०–६१ साली उत्पादन शक्तीत महाराष्ट्रात अग्रेसर ठरलेल्या या कारखान्याने साखर उत्पादनाचा उच्चांक गाठला, ✦ १९६२–६३ साली महाराष्ट्रात अग्रेसर राहून भारतामध्ये दुसऱ्या क्रमाकांचे साखर-उत्पादन केले. ✦ अॅब्सोल्यूट अल्कोहोलचे महाराष्ट्रातील एकमेव उत्पादक.

## *आणि आता प्रगतीचा नवा टप्पा–*

कोल्हापुरात अॅसेटिक अॅसिडच्या, ब्युटिल अल्कोहोल व ब्युटिल अॅसिटेटच्या उत्पादनास सुरुवात झाली आहे.

या कारखान्यातून प्रथम श्रेणीची उत्तम, शुभ्र, कणीदार साखर, डिनेचर्ड स्पिरिट, फर्निचरसाठी उपयुक्त असे फ्रेंच पॉलिश व ऑईल मिल विभागांतून येणेल तेल यांचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन व पुरवठा केला जातो.

आमचा माल महाराष्ट्र राज्य, म्हैसूर राज्य, भारत सरकारचे संरक्षण खाते व भारतात इतरत्रही पुरविला जात असून मालाच्या चांगुलपणाबद्दल सर्वत्र ख्याती आहे.

अद्यावत सुधारणा, कलात्मक रचना व अद्यावत यंत्रसामग्री हे आमच्या कारखान्याचे आगळे वैशिष्टय आहे.

मॅनेजिंग एजंटस्
**दि युनायटेड एजन्सीज प्रायव्हेट लिमिटेड,**
कोल्हापूर.


राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९